१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार | दि. १५ नोव्हेंबर २०२६ | अंक १५९ | पृष्ठ १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



लाचखोर दुय्यम निबंधक एसीबीच्या जाळ्यात

पेण : शासकीय कामांसाठी नागरिकांना वेठीस धरणाऱ्या भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पुन्हा दणका दिला आहे. पेण येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील एका अधिकाऱ्याला नोंदणी प्रक्रियेच्या कामासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने जाळ्यात पकडल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे पेणच्या प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांत आपली कामे करून घेण्यासाठी अनेकदा हेलपाटे मारावे लागतात. कामात विनाकारण अडथळे निर्माण करून आर्थिक •➤पान २ वर

वे|ध|क

पती-पत्नीचा शेतकऱ्यावर हल्ला

पोलादपूर : स्वतःच्या मालकीच्या शेतजमिनीत काय सुरू आहे, याची विचारणा करणे एका शेतकऱ्याला चांगलेच महागात पडले. पेंड्याचा माच उभारण्यासाठी खड्डे खोदण्यास मज्जाव केल्याच्या रागातून पत्नीने शेतकऱ्याची गचांडी पकडून त्याला जमिनीवर पाडले, तर पतीने लोखंडी पाईने थेट डोक्यावर वार करून गंभीर जखमी केले. पोलादपूर तालुक्यातील वडघर पाटीलवाडी येथे घडलेल्या या प्रकाराने खळबळ उडाली असून, हल्लेखोर पती-पत्नीविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नामदेव गोविंद कदम (५२) हे गुरांना चारा देण्यासाठी आपल्या मालकीच्या शेतात गेले होते. त्यावेळी अशोक पांडुरंग कदम (३२) हा त्यांच्या जागेत पेंड्याचा माच उभारण्यासाठी खड्डे खोदत •➤पान २ वर

महामार्गांवर वाहतूक कोंडी

रायगड : दिवाळीच्या सुट्ट्यांना शनिवार-रविवारची जोड मिळाल्याने मुंबई आणि उपनगरांतील नागरिक मोठ्या संख्येने पर्यटनासाठी बाहेर पडले आहेत. त्यामुळे मुंबईतून बाहेर पडणाऱ्या प्रमुख महामार्गांवर वाहनांची प्रचंड गर्दी झाली असून, अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर वाहनांच्या ५ ते ६ किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. दिवाळीच्या सुट्ट्यांसाठी विशेषतः कोकणाला पर्यटकांची पसंती मिळत असल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

आ. दळवींची जीभ घसरली

माणगाव : रायगडच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेला लाज वाटावी, अशी खालच्या पातळीवरील भाषा शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांनी माणगाव येथील एका कार्यक्रमात वापरली. खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका करताना दळवी यांची जीभ अक्षरशः घसरली. त्यांनी राजकीय टीकेची पातळी सोडल्याचे दिसून आले. कोणाचेही राजकीय साम्राज्य उद्ध्वस्त करण्याची भाषा करणे हा राजकीय आत्मविश्वास नसून, सत्तेचा उन्माद असल्याची टीका करण्यात येत आहे. सत्तेच्या जोरावर दुसऱ्यांना संपविण्याच्या वल्गना करणाऱ्यांनी लोकशाहीत जनताच अंतिम निर्णय घेते, हे विसरू नये, असा इशारा राष्ट्रवादीकडून देण्यात आला आहे. आ. दळवींच्या बुद्धीची कीव करावीशी वाटत असून, राजकीय दिवाळखोरीचेच लक्षण असल्याची टीका राष्ट्रवादीकडून केली आहे.

जिल्हा परिषदेच्या आवारात

गाड्यांचा भंगार

पाच सरकारी गाड्या वर्षभरापासून धूळखात

दंश करणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढण्याची भीती

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांसह सभापतींच्या दिमतीला असलेल्या सरकारी गाड्यांची क्षमता संपल्याने त्या आता भंगारात जमा झाल्या आहेत. मात्र, या पाच गाड्यांचा लिलाव करण्यात जिल्हा परिषद प्रशासनाला अद्याप यश आलेले नाही. दोन वेळा निविदा काढूनही प्रतिसाद मिळाला नसल्याने गेल्या वर्षभरापासून या गाड्या जिल्हा परिषदेच्या आवारात धूळखात पडून आहेत. कॅन्टीन आणि महिला व बालकल्याण विभागाच्या कार्यालयासमोरच या गाड्यांचा खच पडल्याने परिसराच्या विद्रूपतेसह अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.



अलिबागमधील कुंटेबाग येथील जिल्हा परिषद इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या कॅन्टीन तसेच महिला व बालकल्याण कार्यालयासमोर पाच गाड्या बंद अवस्थेत पडून आहेत. यामध्ये एमएच ०६ बीयू ६०३१, एमएच ०६ बीयू ६०२८, एमएच ०६ बीयू ६०२७, एमएच ०६ बीयू ६०२९ आणि क्रमांक नसलेल्या एका जीपचा समावेश आहे. वापराची क्षमता संपल्याने या गाड्या भंगारात काढण्यात आल्या आहेत.

या गाड्यांचा लिलाव करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून दोन वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, एकाही निविदेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे लिलावाची प्रक्रिया रखडली असून, या गाड्या वर्षभरापासून त्याच ठिकाणी पडून आहेत. विशेषतः जीपची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे.

कार्यालयीन परिसरातच भंगार गाड्या पडून असल्याने त्या ठिकाणी दंश करणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. कॅन्टीन आणि महिला व बालकल्याण कार्यालयात येणारे कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी हा संभाव्य धोका ठरू शकतो. त्यामुळे लिलावाला प्रतिसाद मिळत नसल्याने भंगार गाड्यांचा प्रश्न नेमका कधी मार्गी लागणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

> जिल्हा परिषदेच्या आवारात असलेल्या गाड्या भंगारात काढण्यात आल्या आहेत. या गाड्यांचा लिलाव करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या; परंतु त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.
> - जलिंदर पाठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन, जिल्हा परिषद

माथेरानच्या पर्यटनावर पाणीटंचाईचे संकट



। नेरळ । प्रतिनिधी ।

पर्यटनासाठी देशभरातून पर्यटकांची पावले माथेरानकडे वळत असतानाच आता शहरावर पाणीकपातीचे संकट ओढवले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने १६ नोव्हेंबरपासून विभागनिहाय पाणीकपात जाहीर केल्याने माथेरानच्या पर्यटन व्यवसायाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. आठवड्यातील तीन दिवस प्रत्येक विभागाचा पाणीपुरवठा बंद राहणार असून, केवळ रविवारी संपूर्ण शहराला पाणी मिळणार आहे. हॉटेल, लॉजिंग आणि अन्य पर्यटन व्यवसाय पूर्णपणे पाण्यावर अवलंबून असताना घेतलेल्या या निर्णयामुळे माथेरानकर संतप्त झाले आहेत. जीवन प्राधिकरणाने पाणी कपातीऐवजी योग्य •➤पान २ वर

- **१६ नोव्हेंबरपासून विभागनिहाय पाणीकपात**
- **आठवड्यातील तीन दिवस नळ कोरडे**
- **व्यावसायिकांसह ग्रामस्थ बुधवारी एकवटणार**

> माथेरानमधील सर्व प्रकारचे व्यवसाय पाण्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे पाणीकपातीचा निर्णय येथील पर्यटन व्यवसाय संपुष्टात आणणारा ठरू शकतो. याविरोधात बुधवारी सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन आवाज उठवण्याचा निर्णय घेऊ. व्यावसायिकांनीही एकजुटीने या लढ्यात सहभागी व्हावे.
> - शिवाजी शिंदे

बेलकडे-कुरुळचा प्रवास त्रासदायक

एमएसआयडीसीच्या नियोजनशून्य कामाचा पर्यटकांसह स्थानिकांना फटका

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग-रोहा मार्गावरील बेलकडे ते कुरुळदरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाने प्रवाशांचा प्रवास अक्षरशः कोंडीत अडकवला आहे. सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम हाती घेताना पर्यायी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करण्यात एमएसआयडीसी अपयशी ठरल्याने शनिवार-रविवारी पर्यटकांसह स्थानिकांना वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला. अवघ्या सात ते दहा मिनिटांत पार होणाऱ्या अंतरासाठी पाऊण ते एक तास लागत असल्याने सुट्टीचा आनंद घेण्यासाठी निघालेल्या पर्यटकांचा प्रवासच त्रासदायक ठरला. तीन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्याने प्रवाशांना तासन्तास •➤पान २ वर



> सुट्टीचा आनंद घेण्यासाठी मुरूडला फिरायला आलो होतो. कुरुळमार्गे बेलकडे येथून मुरूडकडे जात असताना रस्त्याचे काम सुरू असल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. कुरुळपासून बेलकडेपर्यंतचे अवघ्या सात मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी एक तासापेक्षा जास्त वेळ लागला. त्यामुळे नियोजित ठिकाणी वेळेत पोहोचणेही शक्य झाले नाही.
> - अमर पवार, पर्यटक

वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रशांत नाईक मैदानात!

■ अलिबागच्या मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण, डांबरीकरण सुरू

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पर्यटननगरी अलिबागला भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर आता ठोस उपाययोजना सुरू झाल्या आहेत. पर्यटकांची वाढती गर्दी, वाहनांची संख्या आणि शहरातील अरुंद रस्त्यांमुळे निर्माण होणारी कोंडी फोडण्यासाठी माजी नगराध्यक्ष तथा वीज व बांधकाम समिती सभापती प्रशांत नाईक यांनी पुढाकार घेतला आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण आणि डांबरीकरण हाती घेण्यात आले असून, या कामांमुळे अलिबागच्या वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.





पर्यटननगरीला मिळणार मोकळा श्वास, शहराच्या सौंदर्यातही पडणार भर

शहरातील वाहतुकीचा सर्वाधिक ताण असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील सर्कल परिसराचे तसेच पुढे आर्यन डेव्हलपर्स •➤पान २ वर

> अलिबागचा विकास हा केवळ रस्ते रुंदावण्यापुरता मर्यादित नाही. प्रत्येक अलिबागकराचा प्रवास सुकर व्हावा आणि पर्यटकांसाठी शहराचा अनुभव अधिक सुखद व्हावा, हा या कामांमागील मुख्य उद्देश आहे. अलिबागची पर्यटननगरी म्हणून ओळख अधिक समृद्ध करताना नागरिकांच्या सुविधांना नेहमीच प्राधान्य देणार आहोत. **- प्रशांत नाईक, माजी नगराध्यक्ष तथा वीज व बांधकाम समिती सभापती, अलिबाग नगरपरिषद**

विलिनीकरणावर पूर्णविराम

। मुंबई । प्रतिनिधी ।

सुप्रिया सुळेंचे स्पष्टीकरण

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाल्याचे स्पष्ट संकेत खासदार सुप्रिया सुळे यांनी दिले आहेत. अजित पवार होते तोपर्यंतच विलिनीकरणाबाबत चर्चा सुरू होती. मात्र, त्यांच्या निधनानंतर हा विषय माझ्यासाठी आणि माझ्या पक्षासाठी संपला आहे, असे स्पष्ट करत सुळेंनी राजकीय वर्तुळातील चर्चांना पूर्णविराम दिला. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीएसोबत सत्तेत जाणार नसल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

दोन्ही राष्ट्रवादींच्या संभाव्य विलिनीकरणावरून गेल्या काही दिवसांपासून राजकीय चर्चांना उधाण आले होते. बैठका, भेटी आणि नेत्यांच्या विधानांमुळे



विलिनीकरणाच्या शक्यतेला बळ मिळत होते. या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रिया सुळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

माझा भाऊ होता तोपर्यंत विलिनीकरणाची चर्चा होती. त्यासाठी तारीखही ठरली होती. मात्र, ज्या दिवशी माझा भाऊ गेला, त्याच दिवशी माझ्या मनात आणि माझ्या पक्षात •➤पान २ वर

'एसआयआर'मध्ये सव्वा कोटी मतदारांना दिलासा

। मुंबई । प्रतिनिधी ।

- **कागदपत्रांची पूर्तता केल्याने ९९.९४ टक्के नावे मतदार यादीत कायम**
- **केवळ ७ हजार ३४२ मतदारांची प्रक्रिया अपूर्ण**
- **३० नोव्हेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध होणार**

राज्यातील विशेष सखोल मतदार फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेत नोटीस बजावण्यात आलेल्या सव्वा कोटीहून अधिक मतदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक आयोगाकडून कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नोटीस पाठविण्यात आलेल्या मतदारांपैकी तब्बल ९९.९४ टक्के मतदारांनी आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे सादर केले आहेत. त्यामुळे या मतदारांची नावे प्रारूप मतदार यादीत कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एसआयआर प्रक्रियेनंतर अंतिम मतदार यादी ३० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, राज्यात एसआयआर मोहिमेंतर्गत एकूण १ कोटी २२ लाख २४ हजार ७ मतदारांना नोटीस बजावण्यात आली होती. त्यापैकी तब्बल १ कोटी २२ लाख १६ हजार ६६५ मतदारांनी आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे सादर करून आपली पात्रता सिद्ध केली आहे. त्यामुळे या मतदारांची नावे मतदार यादीत कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नोटीस बजावण्यात आलेल्या एकूण मतदारांपैकी केवळ ७ हजार ३४२ मतदारांची कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नाही. त्यामुळे नोटीस बजावण्यात आलेल्या मतदारांपैकी जवळपास सर्वच •➤पान २ वर

केटी बंधाऱ्याला गळती



(छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

- **लाखो लीटर पाण्याची उघड्यावर नासाडी**
- **काही दिवसांपूर्वी बसवलेल्या लोखंडी प्लेटीही निष्प्रभ**

पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना किकवी-चिल्हार नदीवरील केटी बंधाऱ्यातून मात्र लाखो लीटर पाणी वाहून जात आहे. बंधाऱ्याच्या गळतीवर उपाय म्हणून काही दिवसांपूर्वीच पिवळ्या रंगाच्या लोखंडी प्लेटी बसवण्यात आल्या होत्या. मात्र, या प्लेटी बसवूनही गळती थांबलेली नाही. उलट, पाचही गेटमधून पाण्याचे जोरदार फवारे बाहेर पडत असल्याने बंधाऱ्यातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. पाटबंधारे विभागाच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण •➤पान २ वर

लोकसभा, विधानसभा निवडणुकीतील पैसे मिळेना | निवडणूक विभागाला पडलाय विसर

दोन वर्षांनंतरही पोलिसांचे मानधन रखडले

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका शांततेत पार पाडण्यासाठी रात्रंदिवस बंदोबस्त करणाऱ्या रायगड पोलिसांच्या परिश्रमाची निवडणूक विभागाला विसर पडल्याचे चित्र आहे. निवडणुका होऊन दोन वर्षे उलटली, शासनाकडून परिश्रमिक मानधन मंजूर झाले, वाटपाचे आदेशही निघाले; मात्र पोलिसांच्या हातात अद्याप दमडीही पडलेली नाही. स्वतःच्या हक्काच्या मानधनासाठी पोलिसांनाच प्रतीक्षा करावी लागत असल्याने पोलीस दलात नाराजी व्यक्त होत आहे.

२०२४ मध्ये रायगड जिल्ह्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर होती. उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते अंतिम उमेदवार जाहीर होईपर्यंतच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवणे, राजकीय सभा, बैठका यांची माहिती घेणे, आचारसंहितेचे उल्लंघन रोखणे, ईव्हीएम मशीनची सुरक्षा आणि मतदान व मतमोजणी केंद्रांवरील बंदोबस्त अशी कामे पोलिसांनी पार पाडली.



निवडणूक काळात पोलिसांनी रात्रंदिवस कर्तव्य बजावले. या कामासाठी मानधन देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र, निवडणुका संपून दोन वर्षे उलटली तरी मानधन मिळालेले नाही. विशेष म्हणजे, राज्य शासनाने हे मानधन मंजूर केले असून, ३१ ऑगस्ट आणि ६ ऑक्टोबर रोजी वाटपाचे आदेशही निर्गमित करण्यात आले आहेत. तरीही प्रत्यक्ष वाटप रखडले आहे. याबाबत पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

पोलीस महासंचालकांकडे तक्रार

मानधन मंजूर होऊनही वाटप होत नसल्याने एका पोलीस अधिकाऱ्याने राज्याचे पोलीस महासंचालक यांच्याकडे लेखी तक्रार केल्याची माहिती समोर आली आहे. मानधन प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, परिश्रमिक मानधनाची रक्कम व्याजासह द्यावी आणि तक्रारीची दखल न घेणाऱ्या जबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

> मतदान केंद्रावर तैनात असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्याच दिवशी मानधन देण्यात आले आहे. मात्र, अन्य पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतंत्र मानधन दिले जात नाही. ते त्यांच्या ड्युटीचा भाग म्हणून ओळखले जाते.
> - नितीन वाघमारे, उपजिल्हाधिकारी, निवडणूक विभाग, रायगड

आज रामराज येथे भातगिरणीचे उद्घाटन

अलिबाग : शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते मोहन धुमाळ यांच्या ज्ञानी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या भातगिरणीचा उद्घाटन सोहळा उद्या, रविवार दि. १५ नोव्हेंबर रोजी रामराज येथे आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ वाजता शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार जयंत पाटील आणि शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते भातगिरणीचे उद्घाटन होणार आहे. या सोहळ्याला परिसरातील नागरिक, शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



पनवेलच्या शवागारात क्षमतेपेक्षा जास्त मृतदेह

■ ऑक्टोबरमध्ये तब्बल ५२ बेवारस मृतदेह ठेवण्याची वेळ

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत आढळणारे बेवारस मृतदेह शवविच्छेदन आणि पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी या रुग्णालयात आणले जातात. नियमानुसार अशा मृतदेहांची सात दिवसांपर्यंत जपणूक करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावणे अपेक्षित असते. मात्र, सात दिवसांनंतरही पोलीस मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी येत नसल्याने शवागारात मृतदेहांचा साठा वाढत असल्याचे रुग्णालय प्रशासनाचे म्हणणे आहे.

रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. शिवाजी पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, शवागारातील फ्रीजरचे तापमान वाढत असल्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑगस्ट महिन्यात इशारा दिला होता. त्यानंतर संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त आणि पोलीस ठाण्यांना याबाबत कळविण्यात आले होते. ऑक्टोबरपासून नवीन मृतदेह स्वीकारण्यावर मर्यादा घालण्यात आल्या असून, काही मृतदेह उरण येथील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.



■ पोलिसांकडून अंत्यसंस्काराच्या प्रक्रियेला विलंब

■ रुग्णालय प्रशासनाचा दावा

विशेष म्हणजे, पनवेलमधील शवागारात १६ ताजे आणि आठ कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह ठेवण्याची व्यवस्था आहे. तर उरण येथील ग्रामीण रुग्णालयात केवळ चार मृतदेह ठेवण्याची क्षमता असतानाही ऑक्टोबरमध्ये तेथे सात मृतदेह ठेवण्यात आल्याचे वृत्तात म्हटले आहे. या परिस्थितीमुळे मृतदेहांची विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेला गती देणे, तसेच पोलीस आणि रुग्णालय प्रशासन यांच्यात समन्वय वाढविणे आवश्यक झाले आहे.

मुरुड नगरपालिका मराठी शाळेच्या मुळावर?

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड नगरपरिषदेच्या मराठी शाळा क्रमांक ३ च्या आवारातून रहदारीचा रस्ता काढण्याच्या निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे. शाळेची सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत माजी विद्यार्थी, पालक, नगरसेवक आणि नागरिक आक्रमक झाले आहेत. शाळेच्या परिसरात उभारण्यात आलेले कंपाऊंड तातडीने हटवावे आणि प्रस्तावित रस्त्याचा ठराव रद्द करावा, अशी मागणी करत त्यांनी शनिवारी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांना निवेदन दिले.

नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी व स्थायी समितीने शाळेच्या आवारातून रहदारीचा रस्ता देण्याचा ठराव केल्याचे चर्चेदरम्यान समोर आले. मात्र, शाळेचे मुख्याध्यापक, व्यवस्थापन समिती, पालक आणि माजी विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता बांधकाम सुरू करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यापूर्वीही अशाच प्रकारचे धोकादायक बांधकाम करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळी विरोधानंतर ते हटविण्यात आले होते. आता पुन्हा हा विषय उपस्थित झाल्याने संताप व्यक्त होत आहे.



■ शाळेच्या आवारातून रहदारीचा रस्ता काढण्यास तीव्र विरोध

■ अनधिकृत कंपाऊंड हटविण्याची माजी विद्यार्थी, पालकांची मागणी

संबंधित ठराव बेकायदेशीर असून तो रद्द करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागणार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. शाळेत शहराच्या ३० ते ४० टक्के भागातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. अशा परिस्थितीत शाळेच्या आवारातून रहदारी सुरू करणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरू शकते, अशी भूमिका पालकांनी मांडली.

यावेळी मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी नगरसेवक आदेश दांडेकर, रुपेश पाटील, देवयानी गुरव, श्रद्धा अपराध, प्रमिला माळी, प्रांजली मकू, तामीम ढाकम, शाळा समितीचे किशोर माळी, माजी विद्यार्थी स्वप्निल म्हसळकर, अच्युत चव्हाण, प्रकाश चव्हाण, आदित्य वाडकर, दिपेश राजपूरकर, नवीद खतीब, प्रा. डॉ. विश्वास चव्हाण, ॲड. मनिष माळी, मनसेचे किरण गुरव, कुणाल सतविडकर, अरविंद गायकर, शंकर नाईक, दिलीप शिरवणकर, रमेश माळी, ऋषिकेश पोतदार, अनंत म्हसळकर, अविनाश कोतवाल, दत्तात्रेय राजपूरकर, नितेश भोसले, शैलेश काते, संजय नाईक, निखिल मुळेकर, सचिन करंदेकर, करण काते आणि राहुल तळेकर यांच्यासह परिसरातील माजी विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

आपट्यात गावतळे बुजविण्याचा डाव?

■ प्रशासनाचे दुर्लक्ष; मातीचा भराव टाकण्याचे काम सुरू

| आपटा | प्रतिनिधी |

आपटा गावातील नवीन पिंपळ आळी आणि नवीन कोळीवाडा परिसरातील गाव तलाव बुजविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप होत आहे. तलावात माती चा भराव टाकला जात असून, आजूबाजूला अतिक्रमणही वाढत आहे. मात्र, ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, काही वर्षांपूर्वी तब्बल ३० वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या या तलावाची साफसफाई करण्यात आली होती. त्यावेळी तलावाच्या संवर्धनाबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली होती. मात्र, अवघ्या दोन-तीन वर्षांतच तलावाची अवस्था पुन्हा दयनीय झाली आहे. तलावात मातीचा भराव टाकण्याचे काम तातडीने थांबवून अतिक्रमणाची चौकशी करावी. ग्रामविकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तलावाचे अस्तित्व टिकवण्यासाठी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



कर्जतमधून १५ वर्षीय मुलगा बेपत्ता

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरातील मुद्रे रेव्हन्यू कॉलनी येथून १५ वर्षीय अल्पवयीन मुलाला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना १२ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडली. मुलगा अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही अज्ञात व्यक्तीने त्याला फूस लावून नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार रोकडे करीत आहेत.

५,६७५ कोटींचा प्रकल्प ५६ कोटींवर

| सातारा | प्रतिनिधी |

तारळी धरणावरील अदाणी ग्रीन एनर्जीच्या १,५०० मेगावॅट क्षमतेच्या पम्प्ड स्टोरेज प्रकल्पावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. सुरुवातीला ५ हजार ६७५ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव असलेल्या या प्रकल्पाची किंमत कंपनीने सुधारित प्रतिज्ञापत्रात थेट ५६.७५ कोटी रुपये दाखवली. त्यामुळे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या वन्यजीव संवर्धनासाठी अपेक्षित २२७ कोटींचा निधी घटून २.२७ कोटींवर आला आहे. या धक्कादायक प्रकाराविरोधात अभिनेते सयाजी शिंदे यांनी आंदोलनाची हाक दिली आहे.

येत्या १५ नोव्हेंबरला दुपारी २ वाजता कराडजवळील तारळी गावात हे आंदोलन होणार आहे. विद्यार्थी नेते विवेकानंद पाटीलही यामध्ये सहभागी होणार आहेत. ५ हजार ६०० कोटींचा प्रकल्प थेट ५६ कोटींवर कसा आला? सह्याद्री पेटवला जात आहे, त्याचे वाळवंट केले जात आहे. सह्याद्रीचा वाघ मारला जात आहे. हे होऊ द्यायचे नसेल तर सर्वांनी ताठ मानेने उभे राहून आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन सयाजी शिंदे यांनी केले आहे.

■ अदाणींच्या कारभारावर सयाजी शिंदेंचा एल्गार

■ १५ नोव्हेंबरला तारळी येथे आंदोलनाची हाक

एका इंग्रजी वृत्तपत्राने या प्रकरणातील कागदपत्रांसह वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर खळबळ उडाली आहे. प्रकल्पाच्या खर्चातील ५ हजार ६२० कोटींच्या तफावतीबाबत तक्रार दाखल झाल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मंत्रालय आणि राज्य वन विभागाने चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, प्रकल्पासाठी खासगी जमीन वापरण्यात येत असून पर्यावरण आणि वन्यजीवांवर विपरीत परिणाम होणार नसल्याचा दावा अदाणी समूहाने केला आहे. मात्र, वन्यजीव संवर्धन निधीतील मोठ्या कपातीमुळे या प्रकल्पाविरोधातील संताप वाढत आहे.

वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्ह्यात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. १३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण २५९ जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवाईत संबंधितांकडून २ लाख ३३ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. त्यामुळे सर्व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पान १ वरुन

माथेरानच्या पर्यटनावर पाणीटंचाईचे संकट

नियोजन करावे, अशी मागणी करत बुधवारी ग्रामस्थ आणि व्यावसायिक एकवटणार आहेत.

माथेरान हे वर्षभर पर्यटकांनी गजबजलेले थंड हवेचे ठिकाण आहे. दरवर्षी दहा लाखांहून अधिक पर्यटक या पर्यटनस्थळाला भेट देतात. शहरातील नागरिकांसह पर्यटकांच्या पिण्याच्या पाण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले आहे. त्यातूनच प्राधिकरणाने पाणीकपातीचा निर्णय घेतला आहे. माथेरानला ब्रिटिशकालीन शार्लोट तलावातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून उल्हास नदीतूनही मोठ्या प्रमाणात पाणी उपसा केला जातो. कुंभे, नेरळ, जुम्मापट्टी येथील जलवाहिनी आणि पंपिंग यंत्रणेद्वारे हे पाणी सुमारे ८०० मीटर उंचीवरील माथेरानमध्ये पोहोचवले जाते. एवढा लांबचा प्रवास करून पाणी आणले जात असतानाही माथेरानकरांना देशातील सर्वाधिक दराने पाणी विकत घ्यावे लागत असल्याची नाराजी आहे. त्यातच आता पाणीकपातीचा निर्णय लादल्याने नागरिकांच्या संतापात भर पडली आहे.

उन्हाळी पर्यटन हंगामात पाण्याची मागणी वाढते. हॉटेल आणि लॉजिंग व्यवसायाला मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. मात्र, माथेरानची उंची आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता टँकरने पाणी आणणेही सहज शक्य नाही. त्यामुळे पाणीकपात कायम राहिल्यास पर्यटन व्यवसायासमोर मोठे संकट उभे राहणार आहे. उन्हाळी हंगामातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी कपात आवश्यक असल्याचे प्राधिकरणाकडून सांगितले जात असले, तरी त्याचा थेट परिणाम स्थानिकांच्या रोजगारावर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

विभागनिहाय पाणीकपातीचे वेळापत्रक

सोमवार, बुधवार, शुक्रवार : जुना मेरी रोड, ऑलिम्पिया मेन व पीव्हीसी, पार्क व्ह्यू साईट, कोतवाल नगर, संत रोहिदास नगर, छत्रपती शिवाजी महाराज नगर, शेलार गल्ली.

मंगळवार, गुरुवार, शनिवार : मुस्लिम मोहल्ला, वाल्मिकी नगर, पार्क व्ह्यू पॉइंट नवीन, मंकी पॉइंट, दस्तुरी, बाजार पीव्हीसी, इंदिरा नगर, ऑलिम्पिया एसी.

रविवार : कोणत्याही विभागात पाणी कपात नाही.

शहरातील नागरिक पाणी जपूनच वापरतात. मात्र, प्रतिहजार लीटर पाण्याचे दर पाहिले तरी घाम फुटतो. एवढे महाग पाणी देऊनही कपातीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आधी पाण्याचे योग्य नियोजन करावे आणि त्यानंतरच पाणीकपातीचा विचार करावा. – चंद्रकांत जाधव

वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रशांत नाईक मैदानात!

परिसरातील रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत आहे. या भागातील रस्त्याची रुंदी वाढल्याने वाहनांना मार्गक्रमण करणे अधिक सोयीचे होणार असून, वाहतुकीचा खोळंबा कमी होण्यास मदत मिळणार आहे.

याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महावीर चौक या महत्त्वाच्या मार्गाच्या डांबरीकरणाचे कामही सुरू करण्यात आले आहे. खड्डेमुक्त आणि सुस्थितीतील रस्त्यांमुळे वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. तसेच रस्त्याची उंची वाढविण्यात येत असल्याने पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्येवरही काही प्रमाणात उपाय होणार आहे.

अलिबागमध्ये प्रवेश करतानाच नागरिक आणि पर्यटकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. विशेषतः सुट्ट्या आणि पर्यटन हंगामात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. याचा परिणाम स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन प्रवासावरही होतो. त्यामुळे रस्त्यांची केवळ डागडुजी न करता वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या ठिकाणांवर सुधारणा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, जोग इन्फ्रास्ट्रक्चर परिसरातील रस्त्याच्या रुंदीकरणाचाही प्रस्ताव आहे. या ठिकाणी असलेले सर्कल हटविण्याबाबत पोलिसांकडून सूचना करण्यात आल्या आहेत. मात्र, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचे प्रशांत नाईक यांनी स्पष्ट केले.

अलिबागची ओळख पर्यटननगरी म्हणून अधिक भक्कम करण्यासाठी रस्ते, वाहतूक आणि मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सुरू झालेली कामे पूर्ण झाल्यानंतर शहरातील वाहतुकीचा ताण कमी होण्यासोबतच अलिबागच्या सौंदर्यातही भर पडणार आहे.

बेलकडे-कुरुळचा प्रवास त्रासदायक

एकाच ठिकाणी ताटकळत राहावे लागले.

दिवाळीच्या सुट्टीनंतर सोमवारपासून शाळा पुन्हा सुरू होणार असल्याने सुट्टीचे शेवटचे दोन दिवस पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अलिबागसह नागाव, काशीद, मुरूड येथील समुद्रकिनारे तसेच कुलाबा आणि जंजिरा किल्ल्यांना भेट देण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक रायगडमध्ये दाखल झाले आहेत. शनिवारी सकाळपासूनच आक्षी, नागाव, रेवदंडा, काशीद आणि मुरूडकडे जाणाऱ्या वाहनांची गर्दी वाढली होती. मात्र, कुरुळ ते बेलकडेदरम्यान सुरू असलेल्या सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीचा पूर्ण बोजवारा उडाला.

नागाव-बेलकडेकडे जाणाऱ्या आणि तेथून परतणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. सात ते दहा मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी तब्बल तासाभराहून अधिक वेळ लागत असल्याचे पर्यटकांनी सांगितले. त्यामुळे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांना रस्त्यावरच वेळ घालवावा लागला. वाहतूक पोलिसांनी कोंडी फोडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र वाहनांची प्रचंड संख्या आणि अपुऱ्या पर्यायी व्यवस्थेमुळे त्यांचीही दमछाक झाली.

अलिबाग-रोहा हा मार्ग कायमच वर्दळीचा असून, दररोज हजारो वाहनांची या मार्गावरून ये-जा सुरू असते. असे असतानाही रस्त्याचे काँक्रीटीकरण सुरू करण्यापूर्वी पर्यायी वाहतुकीचे नियोजन करण्यात आले नाही. परिणामी, विकासकामाचा फटका थेट नागरिक आणि पर्यटकांना सहन करावा लागत आहे. रस्त्याचे काम महत्त्वाचे असले तरी प्रवाशांना वेठीस धरून ते करण्याची पद्धत कितपत योग्य, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

केटी बंधाऱ्याला गळती

करणाऱ्या या प्रकारामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

किकवी-चिल्हार नदीवरील या बंधाऱ्याच्या पाचही गेटमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहात असल्याचे चित्र आहे. काही दिवसांपासून ही गळती सुरू असून, लाखो लीटर पाणी वाया जात आहे. गळती रोखण्यासाठी लोखंडी प्लेटी बसवण्याची उपाययोजना करण्यात आली; मात्र ती निष्फळ ठरल्याचे प्रत्यक्ष परिस्थितीवरून दिसत आहे. त्यामुळे दुरुस्तीच्या कामावर झालेला खर्च आणि त्याचा दर्जा याबाबतही सवाल उपस्थित होत आहेत. या बंधाऱ्यावर किकवी, चिल्हारसह परिसरातील अनेक गावांतील शेतकरी आणि नळपाणी योजना अवलंबून आहेत. रब्बी हंगामातील शेती, भाजीपाला लागवड, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची गरज तसेच ग्रामस्थांच्या नळपाणीपुरवठ्यासाठी हाच पाणीसाठा महत्त्वाचा आहे. मात्र, साठवलेले पाणी अशा प्रकारे वाहून जात असल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

विशेषतः लोभेवाडी ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी या प्रकाराबाबत चिंता व्यक्त केली आहे. गळती वेळीच रोखली नाही, तर शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो. त्यामुळे पाटबंधारे विभागाने तातडीने लक्ष घालून बंधाऱ्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी आणि पाण्याची होणारी नासाडी थांबवावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे.

विलिनीकरणावर पूर्णविराम

या विषयाला पूर्णविराम मिळाला, असे त्या म्हणाल्या. अजित पवार यांच्यासोबत जे ठरले होते, ते त्यांच्यापुरतेच होते. त्यानंतर आमच्या पक्षाकडून विलिनीकरणाबाबत कोणतेही विधान करण्यात आलेले नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एनडीएसोबत जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे स्पष्ट करत त्यांनी सत्तेत सहभागी होण्याच्या चर्चाही फेटाळून लावल्या. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादींच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबत सुरू असलेल्या राजकीय चर्चांना सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट शब्दांत पूर्णविराम दिला आहे.

पती-पत्नीचा शेतकऱ्यावर हल्ला

असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यापूर्वीच संबंधित जागेत वाडा बांधलेला असल्याने माच उभारण्यासाठी खड्डे थोडे पुढे खोदावेत, असे नामदेव कदम यांनी अशोक याला समजावून सांगितले.

मात्र, याच गोष्टीचा राग आल्याने अशोक याची पत्नी विशाखा कदम (२८) हिने पुढे येत नामदेव कदम यांना शिवीगाळ केली. 'ही जागा तुझी आहे का?' असे म्हणत त्यांची गचांडी पकडून जमिनीवर पाडले. त्यानंतर अशोक कदम याने खड्डे खोदण्यासाठी वापरली जाणारी लोखंडी पारई नामदेव कदम यांच्या डोक्यात मारली. या हल्ल्यात त्यांना गंभीर दुखापत झाली. एवढ्यावरच न थांबता, भावांना पुण्याहून बोलावून घेऊन जीवे ठार मारण्याची धमकीही देण्यात आली.

याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात हवालदार शिंदे यांनी फिर्याद नोंदवून घेतली. त्यानुसार पती-पत्नीविरोधात गुरुवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलादपूर पोलीस ठाण्याचा प्रभारी कार्यभार सांभाळणारे महाड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नेवसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सरोदे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

लाचखोर दुय्यम निबंधक एसीबीच्या जाळ्यात

लाभाची अपेक्षा ठेवणाऱ्या काही भ्रष्ट प्रवृत्तींमुळे संपूर्ण प्रशासनाची प्रतिमा मलिन होत आहे. दुय्यम निबंधक कार्यालयातील या लाचखोरीच्या प्रकाराने पुन्हा एकदा सरकारी कार्यालयांतील भ्रष्टाचाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासकीय कामे पारदर्शकपणे आणि निर्धारित वेळेत होणे अपेक्षित असताना, त्यासाठी लाचेची मागणी होणे ही गंभीर बाब आहे. एसीबीच्या या कारवाईमुळे लाचखोर अधिकारी-कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

एसआयआरमध्ये सव्वा कोटी मतदारांना दिलासा

मतदारांनी आयोगाच्या सूचनेनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

विशेष सखोल मतदार फेरतपासणीचा मुख्य उद्देश मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करणे हा आहे. या प्रक्रियेत मतदारांची नोंद, ओळख आणि पात्रता यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने संबंधित मतदारांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. नोटीस मिळाल्यानंतर मतदारांनी निर्धारित प्रक्रियेनुसार आपले पुरावे आणि कागदपत्रे सादर केली. त्यांची पडताळणी केल्यानंतर पात्र मतदारांची नावे यादीत कायम ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

एसआयआर प्रक्रियेमुळे मतदारांमध्ये आपल्या नावाबाबत काही प्रमाणात संभ्रम आणि चिंता निर्माण झाली होती. विशेषतः नोटीस मिळालेल्या मतदारांना आपले नाव मतदार यादीत कायम राहणार की नाही, याबाबत उत्सुकता होती. मात्र, आवश्यक कागदपत्रे सादर केलेल्या ९९.९४ टक्के मतदारांची नावे कायम राहणार असल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे.

मतदार यादीत पात्र नागरिकांची नावे कायम राहणे आणि अपात्र नोंदींची पडताळणी होणे, या दोन्ही बाबी निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे एसआयआर मोहिमेतील प्रत्येक टप्प्याकडे राजकीय पक्षांसह नागरिकांचेही लक्ष लागले आहे. कागदपत्रांची पूर्तता न झालेल्या मतदारांबाबत आयोगाकडून पुढे कोणती कार्यवाही केली जाते, याबाबतही उत्सुकता आहे. दरम्यान, ३० नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याने या दिवशी राज्यातील मतदार नोंदणीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. आपले नाव मतदार यादीत कायम आहे की नाही, याची खात्री करून घेणे मतदारांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः नोटीस मिळालेल्या मतदारांनी अंतिम यादीत आपल्या नावाची नोंद तपासावी, असे आवाहन या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे आहे.

भाजपाकडून नेहरूंना व्हिलन ठरवण्याचा प्रयत्न

| मुंबई | प्रतिनिधी |

केंद्रातील मोदी सरकार रोजगारनिर्मितीची जबाबदारी विसरले असून, १२ वर्षांत २४ कोटी रोजगार देण्याचे आश्वासन पूर्ण झालेले नाही. उलट लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. शिक्षण व्यवस्था आणि रोजगार क्षेत्रासमोर मोठे संकट उभे राहिले आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबईतील वाशी येथे आयोजित बालदिन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना सपकाळ म्हणाले की, नेहरूंनी स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासाचा पाया घातला. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकी समाजनिर्मितीवर त्यांनी भर दिला. मात्र, आज भाजपाकडून देशातील प्रत्येक समस्येसाठी नेहरूंना जबाबदार धरून त्यांना व्हिलन ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षित समाजात वाढणारी अंधश्रद्धा चिंताजनक असून, देशाच्या सद्यस्थितीला फॅसिस्ट विचारसरणी जबाबदार असल्याची टीकाही त्यांनी केली. यावेळी माजी खासदार कुमार केतकर, आबा दळवी, गुरुचरण बच्छर आदी उपस्थित होते.

■ हर्षवर्धन सपकाळ यांचे टीकास्त्र

दरम्यान, राहुल गांधी यांच्यासह देशातील महत्त्वाच्या व्यक्तींचे पेगासस स्पायवेअरच्या माध्यमातून फोन टॅपिंग होत असल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला. केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांचे नाव एपस्टीन प्रकरणाशी जोडले जात असतानाही त्यांच्यावर कारवाई झाली नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. नेहरू जयंतीनिमित्त काँग्रेसच्या टिळक भवन मुख्यालयात 'भारतगाथा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते सुरेंद्र राजपूत आणि आलोक शर्मा यांनी नेहरूंच्या देशाच्या जडणघडणीतील योगदानाचा गौरव केला. नेहरूंनी जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा उंचावली; मात्र आजच्या नेतृत्वाकडून त्यांच्या योगदानाची बदनामी केल्याची टीका हर्षवर्धन सकपाळ यांनी यावेळी केली.

किरकोळ गैरसमजातून तरुणावर चाकूहल्ला

| कर्जत | प्रतिनिधी |

किरकोळ गैरसमजातून झालेल्या वादाचे रूपांतर चाकूहल्ल्यात झाल्याची घटना कर्जत तालुक्यातील मोहिली-निकोप रस्त्यावर घडली. यामध्ये एका तरुणाच्या पाठीवर चाकूने चार ते पाच वार करण्यात आले असून, त्याचे आई-वडीलही जखमी झाले आहेत. १२ नोव्हेंबर रोजी रात्री ९.४० वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. कार मित्राच्या बाजूने नेल्याच्या गैरसमजातून विधिसंघर्षित बालकाने तरुणाला फोन करून शिवीगाळ केली. त्यानंतर संबंधित बालक आणि अन्य दोन आरोपींनी तरुण व साक्षीदारांशी वाद घातला. यावेळी एका महिलेच्या डाव्या हाताच्या दंडावर चाकूने वार करण्यात आला. तरुण भांडण सोडवण्यासाठी पुढे आला असता त्याच्या पाठीवर चाकूने चार ते पाच वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचे वडील मध्यस्थी करण्यासाठी आले असता त्यांच्याही पाठीवर चाकूने वार करण्यात आले.

■ चौघांवर वार; आई-वडीलही जखमी

याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपींना १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.२४ वाजता अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वरक करीत आहेत.

पनवेलकरांना ३६ तास पाण्याची प्रतीक्षा

।। १७ नोव्हेंबरपासून पाणीपुरवठा बंद ।। जलशुद्धीकरण केंद्रातील कामांसाठी शटडाऊन

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटाची झळ आता पनवेलकरांना बसू लागली आहे. उपलब्ध जलसाठा जपण्यासाठी पनवेल शहर आणि परिसरातील नागरिकांना नोव्हेंबर महिन्यात पुन्हा पाणीपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जावे लागणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या न्हावा-शेवा उपप्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विविध देखभाल आणि दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार असल्याने १७ आणि १८ नोव्हेंबर रोजी सलग ३६ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.



मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून बुधवार, १८ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजेपर्यंत हा शटडाऊन राहणार आहे. या कालावधीत हेटवणे बायपास, भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र तसेच विविध जलवाहिन्यांवरील दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत.

पाणीपुरवठा यंत्रणेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विद्युत, स्थापत्य आणि जलवाहिन्यांशी संबंधित अनेक कामांचे नियोजन करण्यात आले आहे. वायाळ हेडवर्क्स येथील इंटेक चॅनलमधील कचरा रोखण्यासाठी लोखंडी जाळी बसविणे, गाळ काढणे, तसेच वायाळ आणि भोकरपाडा येथील विद्युत व स्थापत्यविषयक कामे करण्यात येणार आहेत.

याशिवाय एक्स्प्रेस हायवे ते रानवारा ढाबा आणि लोथलीवली गाववाडी परिसरातील जुन्या जलवाहिन्या बदलण्याचे कामही हाती घेतले जाणार आहे. भोकरपाडा येथे नवीन एम. बी.आर. आणि ११०० मिमी व्यासाची जलवाहिनी कार्यान्वित करणे, तसेच नवीन पनवेलमधील पुष्पधाम परिसरात नवीन जलवाहिनी सुरू करण्यासाठी आवश्यक कामे केली जाणार आहेत.

या कामांमुळे नागरिकांना ३६ तास पाणीपुरवठ्याविना राहावे लागणार आहे. त्यामुळे पनवेलकरांनी शटडाऊन सुरू होण्यापूर्वीच घरात आवश्यक पाणीसाठा करून ठेवावा असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केले आहे.

विशेष म्हणजे, शटडाऊन संपल्यानंतरही पुढील दोन ते तीन दिवस पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणीपुरवठा पूर्ववत होईपर्यंत नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले आहे.

हवामान बदल

वाढत्या तापमानामुळे पावसाचे स्वरूप बदलले असून, अनियमित पाऊस आणि दीर्घकाळ पडणाऱ्या दुष्काळामुळे गोड्या पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वृक्षतोडीमुळे पर्जन्यचक्र विस्कळीत होते आणि जमिनीत पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता कमी होते.

वृक्षतोडीविरोधात संविधान कट्ट्यावर शोकसभा

पर्यावरण वाचविण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

भीमाशंकर, कर्जतसह महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या वृक्षतोडीविरोधात खांदा कॉलनीतील संविधान कट्ट्यावर शुक्रवारी (दि.१३) नोव्हेंबर रोजी प्रतीकात्मक शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. संविधान कट्टा गट, संविधानप्रेमी नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने सेक्टर १३ येथील संविधान कट्ट्यावर सायंकाळी सात वाजता झालेल्या या सभेत पर्यावरणाच्या ऱ्हासाबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली.



भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून शोकसभेला सुरुवात करण्यात आली. यावेळी सुभाष बसवेकर, कविता वाघमारे, नागेश हिरवे, प्रफुल्ल सपकाळ, महेंद्र नाईक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

विकासाच्या नावाखाली होत असलेली बेसुमार वृक्षतोड ही केवळ झाडांची हानी नसून पर्यावरणाचा समतोल, जैवविविधता आणि वन्यजीवांच्या अधिवासावर होणारा गंभीर आघात आहे. याचे दुष्परिणाम भविष्यात मानवी जीवनावरही होणार असल्याची चिंता वक्त्यांनी व्यक्त केली. निसर्गाचा ऱ्हास रोखण्यासाठी नागरिकांनी केवळ चर्चा न करता संघटितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले. वृक्षतोडीविरोधातील लढा हा संविधानिक आणि लोकशाही मार्गानेच पुढे नेला पाहिजे. पर्यावरण संवर्धन ही केवळ एखाद्या संस्था किंवा संघटनेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

निवडक




माझेरी येथे घराला आग

महाड : रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील डोंगराळ भागात असलेल्या माझेरी गावात नारायण श्रीपत पवार यांच्या घराला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. सकाळच्या सुमारास घडलेल्या या दुर्घटनेत घरातील संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले असून पवार कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच ग्रामस्थांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यानंतर महाड एमआयडीसी आणि महाड नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पवार कुटुंबातील तीन भाऊ एकत्र राहत असल्याने या आगीत संपूर्ण कुटुंबाचे मोठे नुकसान झाले असून या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही. या दुर्घटनेमुळे कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले असून शासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत व योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

माहेरवाशिणींची सासरकडे परतीची लगबग

धाटाव : दिवाळीचा आनंदोत्सव, फराळाची गोडी आणि नातेवाईकांच्या भेटीगाठींचा सुखद सोहळा संपताच आता माहेरवाशिणींची सासरी परतण्याची लगबग सुरू झाली आहे. तर माहेरच्या माणसांमध्ये दिवाळी सणाच्या सुट्टीतील आनंद डोळ्यात साठवून माहेरवाशिणींची पावले आता सासरकडे वळू लागल्याचे पहावयास मिळत आहे. दिवाळी सणानिमित्त अनेक माहेरवाशिणी मुलांना शाळेला सुट्टी असल्यामुळे आपल्या आई-वडिलांना भेटण्यासाठी, भाऊ-बहिणींसोबत सणाचा आनंद लुटण्यासाठी माहेरी आल्या होत्या. काही दिवस माहेरच्या अंगणात मनसोक्त आनंदाचे क्षण अनुभवत त्यांनी दिवाळी साजरी केली. माहेरच्या घरातील फराळ,आईच्या हातचे जेवण, भावंडांसोबतच्या गप्पा आणि बालपणीच्या आठवणींनी त्यांच्या आनंदात आणखी भर घातली.मात्र सणाचे दिवस संपताच आता पुन्हा सासरी परतण्याची वेळ आल्याने अनेक माहेरवाशिणींच्या मनात हुरहूर निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, सण संपताच पुन्हा संसाराच्या जबाबदाऱ्या खुणावू लागल्याने माहेरवाशिणींची सासरकडे जाण्याची तयारी सुरू झाली आहे.कुणी (लालपरी) एसटी बसने,कुणी खासगी वाहनाने,तर कुणी रेल्वेने आपल्या सासरच्या घराकडे रवाना होताना दिसत आहेत. लेकीला निरोप देताना आईच्या डोळ्यांत दाटणारे अश्रू, वडिलांच्या चेहऱ्यावरील भावूक शांतता आणि भावाच्या मनातील बहिणीच्या आठवणी हे दृश्य अनेक घरांमध्ये पाहायला मिळाले. तर माहेर कितीही दूर असले तरी तिथली माया कधीच कमी होत नाही हे मात्र अशा गोड धोड सणांमधून पुन्हा एकदा समोर येताना दिसत आहे.

बालदिनानिमित्त दिव्यांग मुलांना फराळ वाटप



खांदा कॉलनी : बालदिन हा केवळ मुलांच्या आनंदाचा दिवस नसून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची आणि त्यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन देण्याची संधी आहे. याच भावनेतून रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठान, करंजाडे-पनवेल यांच्या वतीने शनिवारी (दि.१४) नोव्हेंबर रोजी बालदिनाचे औचित्य साधून मानखुर्द येथील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम दिव्यांग बालगृहातील विद्यार्थ्यांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ आणि दिवाळीच्या फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंद्रकांत गुजर, उपाध्यक्ष रमेश आगरे, दिनेश धामणस्कर, समीक्षा भाइजे, वैभव गुरसाळे, प्रीती शेलार, दिनेश नरळकर उपस्थित होते.

बेवारस मृतदेह सापडला

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहर पोलिसांना ४० ते ४५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला आहे. पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. मृत इसम रंगाने सावळा असून दाढी वाढलेली आहे.

अंगात पिवळ्या रंगाचा शर्ट, पांढऱ्या रंगाची हाफ बाहयाची बनियान, पांढऱ्या रंगाचा लेहंगा घातलेला आहे. त्याला उपजिल्हा रुग्णालयात नेले असता मृत घोषित करण्यात आले. या इसमाबाबत माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वांगणीत विजेचा खांब धोकादायक

थातुर मातुर काम केल्याचा आरोप

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठणेजवळील वांगणी ता.रोहा गावात जाणाऱ्या रस्त्यालगत व बौद्धवाडा परिसरात नव्याने उभारण्यात आलेला विजेचा खांब वीज वितरणच्या ठेकेदाराने थातुर मातुर पद्धतीने उभा केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे हा खांब कोसळून काही अपघात वा जीवित हानी झाल्यास त्यास संबंधित ठेकेदार व वीज वितरण कंपनीचे कर्मचारी जबाबदार असतील असा इशारा वांगणी गावातील सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र तेलंगे यांनी दिला आहे. याप्रसंगी वांगणीतील मोरेश्वर भिसे, चंद्रकांत कदम आदी यावेळी उपस्थित होते.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार वांगणी गावात जाणाऱ्या रस्त्यालगत व बौद्धवाडा परिसरात सुमारे एक ते दीड महिन्यापूर्वी हा विद्युत खांब उभारण्यात आला होता. विजेचा खांब उभारण्यासाठी ज्या ठिकाणी खड्डा खोदण्यात आला होता, त्या ठिकाणी खड्ड्यात खडी व सिमेंट काँक्रीटचे कोणतेही मिश्रण न टाकता केवळ मातीने हा खड्डा भरून विजेचा खांब उभारण्यात आला असल्याचे उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले आहे.



त्यामुळे हा विद्युत खांब धोकादायक स्थिती असून तो कधीही पडू शकतो अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. तसेच हा विजेचा खांब उभारताना वीज वितरणचे ठेकेदार तसेच कामगारांनी कोणतीही काळजी घेतली नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळेच हे काम करताना जलवाहिनी तुटल्याचा आरोपही वांगणी ग्रामस्थांनी केला आहे.

जलवाहिनीची दुरुस्ती करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी हा खड्डा पुन्हा खोदला असता खड्डा केवळ मातीनेच भरल्याचे तसेच त्यामुळे विद्युत खांब कोणत्याही आधाराविना उभा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

दरम्यान, विजेचा खांब उभारताना त्यावेळी कोणत्याही प्रकारे जलवाहिनीचे नुकसान झाले नसल्याचे वीज वितरणचे सहाय्यक अभियंता सत्येंद्र सिंग यांनी सांगितले.

वीज दुरुस्तीची कामे करण्यासाठी शट डाऊन घेणे शक्य नसल्याने येत्या मंगळवारी संबंधित ठेकेदाराची गँग बोलवून वांगणी येथील विजेचा खांब सुस्थितीत करण्यात येईल असेही सिंग यांनी सांगितले.

स्वच्छता दूतांनी पुन्हा खुलले सौंदर्य

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या निमित्ताने पनवेल शहरातील उरण नाका तसेच जुन्या भाजी मार्केट परिसरात नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. विविध भागांतून व्यवसायासाठी आलेले फेरीवाले, फुलविक्रेते, भाजीविक्रेत्यांचा बाजारपेठेतील स्वच्छतेवर परिणाम झाला होता.



मात्र, महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने आपली जबाबदारी चोखपणे पार पाडत तब्बल ४० टन कचरा गोळा करण्यात आला. विशेष म्हणजे, फटाक्यांमुळे रस्त्यांवर साचलेला कागद, फटाक्यांचे अवशेष आणि इतर कचराही स्वच्छता कर्मचाऱ्यांनी साफ केले. सणाच्या आनंदात नागरिकांकडून निर्माण होणारा कचरा उचलण्याची जबाबदारी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी मात्र कोणतीही सुट्टी न घेता पार पाडली. त्यांच्या या कामामुळेच पनवेल शहराचे सौंदर्य पुन्हा खुलले.



● मुरुड एकदराखाडीत सुंदर सूर्योदय पर्यटकांना पाहायला मिळत आहे. सुट्टीत मुरुडला पर्यटक याठिकाणी खास येत असतात.
(छायाचित्र- सुधीर नाझरे)

मिनी ट्रेनच्या अपुऱ्या फेऱ्यांमुळे पर्यटक नाराज

। माथेरान । प्रतिनिधी ।

नेरळ-माथेरान मिनी ट्रेन सफारीकरिता देश विदेशातून अनेक पर्यटक येत असतात. हेरिटेज दर्जा प्राप्त असलेली माथेरानचे वैभव असणारी मिनी ट्रेनच्या अपुऱ्या फेऱ्यांमुळे पर्यटकांमध्ये नाराजी आहे. याचा माथेरानच्या पर्यटनावर परिणाम होत आहे. या फेऱ्यांच्या संख्येमध्ये तातडीने वाढ व्हावी अशी मागणी माथेरानमध्ये येणारा प्रत्येक पर्यटक करीत आहे.

पर्यटन जीवनवाहिनी ही मिनी ट्रेन आहे. येथे अनेक वर्षांपासून सातत्याने येणाऱ्या पर्यटकांच्या



अनेक गोड आठवणी या मिनी ट्रेनच्या सफरीशी जोडल्या गेलेल्या आहेत. त्यामुळेच आपल्या मुलांसह ही सफर पुन्हा करण्याकरता अनेक पर्यटक मात्र मध्ये येत असतात. परंतु नेरळ-माथेरान दरम्यान सकाळच्या वेळी फक्त दोनच फेऱ्या सुरू असल्याने या पर्यटकांचा हिरमोड होत असतो.

काही वर्षांपूर्वी नेरळ-माथेरान दरम्यान पाच ते सहा मिनी ट्रेन धावत असत, ज्यामध्ये संध्याकाळी सात वाजता येथे वस्ती करता ही एक ट्रेन येत असे परंतु आता फक्त दोनच ट्रेन रेल्वे प्रशासनाने या मार्गावर सुरू ठेवल्या आहेत. मिनी ट्रेनच्या फेऱ्या कमी झाल्यामुळे माथेरानमधील लॉजिंग व्यवसायिकानाही त्याचा फटका बसला असून थेट गावांमध्ये पर्यटक येत असल्याने त्यांना चांगला व्यवसाय मिळत असे परंतु आता मिनी ट्रेनच्या फेऱ्या कमी असल्याने हे पर्यटक विखुरले गेले आहेत त्याचप्रमाणे याचा थेट फटका नेरळ मात्र घाटावरती होत आहे. घाटामध्येही ट्रॅफिक जाम होत असते.

मिनी ट्रेन बंद झाल्यापासून याचे प्रमाणात दिवसेंदिवस वाढत आहे. पूर्वी लोक नेरळ येथे गाडी पार्क करून माथेरान मिनी ट्रेननेवर येत असत. ज्यामुळे दस्तुरी नाका प्रवेशद्वार येथे गर्दी कमी होती. संध्याकाळी शेवटची गाडी येताच सर्व कर्मचाऱ्यांचे नेरळमध्ये जाण्याकरता धावपळ सुरू असल्याचे चित्र या ठिकाणी नेहमीच पहावयास मिळते, त्यामुळे संध्याकाळच्या ट्रेन सेवे करिता कर्मचारी आग्रही नसल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

मुरूड समुद्रकिनारा पर्यटकांनी बहरला

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

दिवाळी सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी मुरूड समुद्रकिनाऱ्याकडे मोठ्या प्रमाणात धाव घेतली असून समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची तुफान गर्दी पाहायला मिळत आहे.

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे मुरूड समुद्रकिनारा पर्यटकांनी गजबजून गेला आहे. निसर्गरम्य समुद्रकिनारा, अथांग समुद्राच्या लाटा आणि मनमोहक वातावरण पर्यटकांना आकर्षित करत आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारणे, लाटांमध्ये खेळणे आणि छायाचित्रे काढण्याचा आनंद घेत आहेत. पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे स्थानिक व्यावसायिक, हॉटेल व्यावसायिक तसेच पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना चांगला फायदा होत आहे.

किनाऱ्यावरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सवरही पर्यटकांची वर्दळ दिसून येत आहे. पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता मुरूडमधील पर्यटन हंगामाला या गर्दीमुळे चांगलीच रंगत आली आहे असे बोलले जात आहे.

शंभर टन वजनाची लोखंडी प्लेट निसटली | जेएनपीटी महामार्गावर वाहनांच्या रांगा

कळंबोलीत वाहतुकीचा बोजवारा

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी।

जेएनपीटी महामार्गावर अवजड वाहनांच्या वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास कळंबोली सर्कलजवळ मुंब्राच्या दिशेने जाणाऱ्या महामार्गावर एका कंटेनर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यावेळी कंटेनरवर वाहून नेण्यात येत असलेली शंभर टनांहून अधिक वजनाची भलीमोठी लोखंडी प्लेट निसटून अर्धी रस्त्यावर आली. त्यामुळे कंटेनरही एका बाजूला झुकून पलटी होण्याच्या स्थितीत आला होता.



विशेष म्हणजे, कलंबोली वाहतूक पोलीस ठाण्याच्या अगदी बाजूलाच हा प्रकार घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. महामार्गावर लोखंडी प्लेट निसटल्याने वाहतुकीचा मार्ग अडवला गेला. परिणामी, कलंबोली सर्कलसह आजूबाजूच्या मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. सकाळच्या कामावर जाण्याच्या वेळेतच ही घटना घडल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

घटनेची माहिती मिळताच कलंबोली वाहतूक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र, लोखंडी प्लेटचे प्रचंड वजन आणि कंटेनरची धोकादायक स्थिती यामुळे वाहतूक व्यवस्थापन करताना अडचणी निर्माण झाल्या.

या प्रकरणी कंटेनर चालक आणि वाहनमालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळत आहे. अवजड साहित्याची वाहतूक करताना योग्य सुरक्षितता, बांधणी आणि नियमांचे पालन केले जाते का, असा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाला आहे.

अवजड वाहनांमधील मालाची सुरक्षित बांधणी तपासण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? अशा घटनांमुळे दररोज प्रवाशांचा वेळ वाया जात असताना जेएनपीटी महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि सुरक्षेच्या प्रश्नावर प्रशासन कधी ठोस उपाययोजना करणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

जेएनपीटी महामार्गावर अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. अशा वाहनांमधून लोखंडी प्लेट, कंटेनर आणि अन्य जड साहित्याची वाहतूक करताना अपघात घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महामार्ग वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन विभाग आणि संबंधित महामार्ग प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

उरणमधील कंटेनर व्यवसाय संकटात

। चिरनेर । प्रतिनिधी ।

न्हावा-शेवा परिसरात शासकीय यंत्रणेच्या असहकार्यामुळे २१ हजारांहून अधिक कंटेनरची हाताळणी आणि हजारो स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणारा रिकाम्या कंटेनर डेपोंचा व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यामुळे देशाच्या आयात-निर्यात व्यापार साखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या १२० हून अधीक रिकाम्या कंटेनर डेपो व्यवसायायिकांवरील वाढत्या अन्यायकारी धोरणाविरोधात आवाज उठविण्याची तयारी सुरू केली आहे. त्यांना सर्वच शासकीय यंत्रणेकडून न्याय व सन्मानाची वागणूक मिळावी, अशी मागणी न्हावा-शेवा डेपो कंटेनर असोसिएशनने केली आहे.

उरण तालुक्यातील जेएनपीए व न्हावा-शेवा परिसरात १२० हून अधिक रिकामे कंटेनर डेपो कार्यरत आहेत. जेएनपीटी बंदरातुन दरमहा सुमारे ६३ लाख कंटेनर आयात-निर्यात केली जाते. त्यामध्ये परिसरातील या रिकाम्या कंटेनर



- **शासकीय यंत्रणेच्या असहकार्यमुळे अडचणीत वाढ**
- **अन्यायकारक कार्यपद्धतीबाबत व्यावायिकांमधून गंभीर चिंता**

डेपोंतुन दरमहा सुमारे ६.४० लाख कंटेनर हाताळणी केली जाते. मात्र, भारताच्या आयात-निर्यात व्यापार साखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक असलेला व्यवसाय विविध शासकीय यंत्रणेच्या असहकार्यमुळे याआधीच अडचणीत आला आहे. त्यामध्ये आता जेएनपीएने २५८० कोटी रुपये खर्चून ६२ एकरमध्ये सुरू केलेल्या सुमारे ५० हजार रिकाम्या कंटेनर साठवणूक क्षमतेच्या कंटेनर यार्डमुळे रिकाम्या कंटेनर डेपो व्यवसायायिकाच्या अडचणीत आणखीनच भर पडली आहे. महिन्याकाठी सुमारे १ कोटी भुईभाडे मिळत असल्याने जेएनपीएनेही नव्याने सुरू केलेल्या रिकाम्या कंटेनर डेपोलाच अधिक फायदा करून देण्यासाठी विविध प्रकारचे षडयंत्र सुरू केले आहेत. यासाठी संबंधित विविध शासकीय यंत्रणेकडूनही सहकार्य मिळत असल्याचा आरोप न्हावा-शेवा डेपो कंटेनर असोसिएशनकडून केला जात आहे.

विशेषतः डेपो चालकांवर वाढत असलेल्या अनावश्यक प्रशासकीय मागण्या, नियामक तपासणी आणि दैनंदिन कामकाजा संदर्भातील माहिती सादर करण्याच्या वाढत्या अपेक्षा हे चिंतेचे विषय ठरले आहेत. तसेच, रिकामे कंटेनर डेपो उद्योगावर अधिकाधिक प्रशासकीय दबाव आणि विविध माहिती संकलनाच्या मागण्यांद्वारे अधिक लक्ष केंद्रित केले जात असल्याचे दिसून येत आहे. या अनाठायी मागण्यांची आवश्यकता, संबंधित अधिकारक्षेत्र आणि त्यामागील स्पष्ट कार्यपद्धती याबाबत पुरेशी स्पष्टता किंवा संबंधित घटकांशी अर्थपूर्ण चर्चा झालेली दिसत नाही. येथील कार्यरत असलेल्या बंदरांतील व्यापाऱ्याला गती मिळावी, सागरी व्यापारात प्रगती व विकास यासाठी सर्व घटकांची सामूहिक जबाबदारी महत्त्वाची आहे. मात्र, नेमक्या याच बाबींकडे संबंधित विभागाशी संलग्न असलेल्या शासकीय यंत्रणांकडूनच जाणीवपूर्वक दुर्लक्षच केले जात आहे. परिणामी १२ हजारांहून अधिक स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणारा उरण, जेएनपीए, न्हावा-शेवा परिसरात १२० हून अधिक रिकाम्या कंटेनर डेपोंचा व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यामुळे रिकामे कंटेनर डेपो उद्योगासंदर्भात सध्या अवलंबल्या जात असलेल्या अन्यायकारक कार्यपद्धतीबाबत व्यावसायिकांमधून गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

कंटेनर व्यावसायिकांना दुय्यम वागणूक

सर्व शासकीय विभाग, नियामक संस्था, बंदर प्रशासन, शिपिंग लाइन्स आणि इतर संबंधित उद्योग घटकांशी रचनात्मक चर्चा, सहकार्य करण्यास कंटेनर डेपो व्यावसायिकांनी कटिबद्ध असल्याचे याआधीच वारंवार स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर रिकामे कंटेनर डेपो उद्योगाच्या वैध व्यावसायिक हितांचे संरक्षण करणे इत्यादी सामूहिक समस्या योग्य त्या व्यासपीठावर प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारीही डेपो कंटेनर व्यावसायिकांकडून सातत्याने पार पाडली जात आहे. त्यानंतरही रिकामे डेपो कंटेनर व्यावसायिकांना दुय्यम वागणूक दिली जात आहे, असे न्हावा-शेवा डेपो कंटेनर असोसिएशनचे म्हणणे आहे.

किल्ले स्पर्धेचा निकाल जाहीर

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जतमधील शिवशंभो युवा हायकर्स संस्थेच्या माध्यमातून दीपावली निमित्त किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याचा निकाल संस्थेच्यावतीने जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेत मोठा व छोटा गटात एकूण २० जणांनी भाग घेतला होता. या किल्ले स्पर्धेसाठी शाहीर गणेश ताम्हाणे व गड दुर्ग संवर्धक समाधान पाटील यांनी परिक्षक म्हणून काम बघितले. यावेळी मोठ्या गटात ओंकार नवतरुण मित्र मंडळाच्या सरसगड किल्ल्याला प्रथम, तर शंतनू मालुसरेच्या राजमाची ते भिवगड ते लोहगड गडकोट मोहिमेला द्वितीय आणि राधाकृष्ण अपार्टमेंटच्या लोहगडाला तृतीय क्रमांक देण्यात आला. छोट्या गटात जरी मरी आईच्या प्रतापगडाला प्रथम क्रमांक, तर शिवमल्हार गटाच्या तोरणा किल्ल्याला द्वितीय, वृंदावन गार्डन-डेफोडिल सोसायटीच्या विजयदुर्ग किल्ल्याला तृतीय आणि राधा गॅलक्सी मित्र मंडळाच्या सिंहगड किल्ल्याला चतुर्थ क्रमांक देण्यात आला. त्याचबरोबर शिवस्मृती युवा मित्र मंडळाचा शिवनेरी किल्ला, हर्षवर्धन बोराडेचा मुरूड-जंजिरा किल्ला यांना विशेष उत्तेजनार्थ म्हणून गौरविण्यात आले. तसेच, आणखी सहा जणांना उत्तेजनार्थ म्हणून गौरविण्यात आले.

रायगडमध्ये सामूहिक मुंजीबंधन सोहळा

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

दैवज्ञ समाज रायगड यांच्यावतीने रविवार (दि.१५) सामूहिक मुंजीबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा माणगाव येथील खरवली फाटा परिसरातील हॉटेल ओपन अंब्रेला येथे संपन्न होणार आहे. या सामुहिक मुंजीबंधना मध्ये मुरुड शहरातील ६ मुलांचा सहभाग असणार आहे. प्रत्येक बटूसोबत चार व्यक्तींना विनामूल्य सहभागी होता येणार असून, त्यापेक्षा अधिक व्यक्तींसाठी प्रत्येकी ५०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे.

ठाकरे गटाकडून उपजिल्हा रुग्णालयाची पाहणी

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत-खालापूर विधानसभा संपर्कप्रमुख वेदिका कांबळी आणि नागपूर संपर्कप्रमुख मंदाकिनी भावे यांचा मतदारसंघात दौऱ्याच्या दरम्यान जिल्हा संघटक, माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी आणि सर्व महिला आघाडी पदाधिकाऱ्यांच्या समवेत कर्जत उपजिल्हा रुग्णालयाची पाहणी केली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक अडकमोल आणि त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांकडून आवश्यक माहिती घेण्यात आली. तसेच, पंचायत समितीच्या कार्यालयाला देखील भेट दिली. दरम्यान, तालुक्यातील महिला पदाधिकाऱ्यांची शिवालय येथे आढावा बैठक घेण्यात आली.


(छायाचित्र : संजय गायकवाड)

यावेळी उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुकाप्रमुख बाजीराव दळवी, शहर प्रमुख निलेश घरत, युवा सेना शहर अधिकारी गौरव भानुसघरे, तालुका संघटक करुणा बडेकर, मयुरी गजमल, नीता मांडे, योगिता डागा, जिल्हा परिषद सदस्य सुनिता मोरे, पंचायत समिती सदस्य नमिता श्रीखंडे, नगरसेविका सुचिता खोत, महिला पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

श्रीवर्धनच्या कलाकाराची भरारी

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

- **राजेश नागवेकर यांचा स्तुत्य उपक्रम**

मूळचे श्रीवर्धन येथील रहिवासी राजेश नागवेकर हे शालेय जीवनापासूनच एक उत्तम कलाकार व पेंटर आहेत. श्रीवर्धनच्या र.ना. राऊत विद्यालयात शिकत असताना त्यांनी अनेक चित्रे रेखाटली होती. तसेच, दरवर्षी रांगोळी प्रदर्शनात देखील उत्स्फूर्त सहभाग असायचा. मागील काही वर्षापासून ते नोकरीधंद्यानिमित्त उरण या ठिकाणी वास्तव्यास आहेत. मागील पाच वर्षांपासून त्यांनी उरणमध्ये देखील रांगोळी प्रदर्शन भरवण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.

उरण येथील एन.आय. हायस्कूलमध्ये मागील पाच वर्षांपासून राजेश नागवेकर हे रांगोळी प्रदर्शन आयोजित करीत आहेत. यावर्षी देखील हे रांगोळी प्रदर्शन दि.१० नोव्हेंबर पासून १५ नोव्हेंबरपर्यंत सर्वांसाठी रांगोळी प्रदर्शन खुले असणार आहे. उरण येथे आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांपासून ते शिक्षकांपर्यंत ज्यांना रांगोळी काढण्याची कला उत्तम येते, अशा सर्व कलाकारांनी आपल्या विविध कला सादर केल्या आहेत. स्वतः राजेश नागवेकर यांनी एक व्यंगचित्राची रांगोळी काढली असून, माणसाला तिखट लागल्यानंतर माणसाच्या चेहऱ्यावरती काय भाव असतात याचे उत्तम व्यंगचित्र त्यांनी साकारले आहे. तर, या रांगोळी प्रदर्शनात नटसम्राट नाना पाटेकर यांची देखील अतिशय सुंदर रांगोळी काढण्यात आलेली आहे. या रांगोळी प्रदर्शनात दोन खेकड्याच्या रांगोळ्या काढलेल्या असून, एक खेकडा शिजवल्यावर कसा दिसतो, आणि जीवंत खेकडा कसा दिसतो अशा दोन रांगोळ्या आहेत.

तळ्यात रंगणार भक्तिचा महासोहळा

। तळा । प्रतिनिधी ।

जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा पादुका दर्शन सोहळा सोमवारी (दि.१६) सकाळी १० वाजता तळा तालुक्यातील आनंदवाडी, येथील क्रिकेट मैदानात होणार आहे. या सोहळ्याचे आयोजन रामानंद संप्रदाय - जिल्हा दक्षिण रायगड यांच्यावतीने करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी उत्तराधिकारी कानिफनाथ महाराज यांची विशेष उपस्थिती लाभणार असून, यावेळी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी यांच्या पादुकांचे दर्शन भाविकांना घेता येणार आहे.

पनवेल-खालापूर दिंडीचे आयोजन

। रसायनी । प्रतिनिधी ।

पनवेल-खालापूर पायी कोकण दिंडी ट्रस्ट, मोहोपाडा यांच्यावतीने यंदाही आळंदी देवाची येथे जाणाऱ्या पायी कोकण दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा दिंडी सोहळा दि.२६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत पार पडणार आहे. दि. २६ नोव्हेंबर रोजी शिरढोण येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरातून सकाळी दिंडीचे प्रस्थान होणार आहे. चिंचवण, नास्टा, स्वामी मंदिर, सांगुर्ली फाटा, तिनबत्ती नाका मार्गे चिरवद येथे दिंडी पोहोचणार आहे. पुढे तुरमाळे येथील शिवमंदिरात मुक्काम होणार आहे. दि.२७ नोव्हेंबर रोजी तुरमाळे येथून दिंडीचे प्रस्थान होऊन नारपोली येथे आगमन होईल. त्यानंतर सावळे येथे दिंडीचा मुक्काम होईल. दि.२८ नोव्हेंबर रोजी सावळे येथून रसायनीमार्गे पराडे कॉर्नर येथे दिंडी पोहोचणार आहे. आपटा मार्गे येणारी दिंडी गुळसुंदे येथील शिवमंदिरातून पराडे कॉर्नर येथे मुख्य दिंडीत सहभागी होईल. त्यानंतर सर्व दिंडी मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिरात दाखल झाल्यानंतर दांडफाट्याकडे प्रयाण करणार आहे. त्यानंतर दि. ६ डिसेंबर रोजी आळंदी येथे सकाळी काल्याचे कीर्तन होणार असून संस्थेच्यावतीने काल्याच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाकरे सेनेची शिवालयात बैठक

। नेरळ । प्रतिनिधी ।

राज्यात पूर्वी शिवसेनेची महिला आघाडी सर्व राजकीय पक्षामधील सर्वात भक्कम महिला आघाडी फळी म्हणून ओळखली जायची. त्याच धर्तीवर राज्यभर महिला आघाडीचे संघटना वाढवण्याचे उद्धिष्ट शिवसेना ठाकरे पक्षाने ठेवले आहे. त्यानिमित्ताने कर्जत तालुक्यात शिवसेना ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीने मंथन करीत महिला आघाडी भक्कम करण्यासाठी ठोस पाऊले उचलनताचे धोरण निश्चित केले. महिला आघाडीच्या संघटनात्मक बांधणीसाठी शिवसेनेची आढावा बैठक आणि कर्जत तालुक्यातील महत्त्वाच्या स्थळांना भेटी देऊन तेथील महिलांच्या समस्या फीडबॅक यांची माहिती घेण्यासाठी मुंबई येथील निरीक्षक कर्जत येथे आले होते. त्यानंतर शिवालय या संपर्क कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी निरीक्षक वेदिका कांबळे, नागपुर संपर्क प्रमुख मंदाकिनी भावे यांच्यासह उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, अनिता पाटील, सुनीता मोरे, करुणा बडेकर, पंचायत समिती सदस्य नमिता श्रीखंडे यांच्यासह असंख्य महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

वाचनप्रेमींसाठी दिवाळी अंकांची पर्वणी

। महाड । प्रतिनिधी ।

- **७० हून अधिक अंक वाचकांसाठी उपलब्ध**

शंभर वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या महाड शहरातील मूलचंद रा. करवा ग्रंथालयात यंदाही दिवाळी अंक योजना सुरू करण्यात आली आहे. यावेळी वाचनप्रेमींसाठी ७० हून अधिक दर्जेदार दिवाळी अंक उपलब्ध करून देण्यात आले असून, या उपक्रमामुळे महाडमधील साहित्यप्रेमींना वाचनाची अनोखी मेजवानी मिळणार आहे.

मूलचंद रा. करवा ग्रंथालयाच्या दिवाळी अंक योजनेचा उद्घाटन सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



यावेळी ग्रंथालयाच्या अध्यक्षा सीमा मपारा, उपाध्यक्ष सुनील अग्रवाल, प्रकाश मेहता, आप्पा बाळ, विद्या देसाई, नगरसेवक भाऊ दोशी, शीला साबळे, शुभांगी शेठ, शीतल गांधी, डॉ. विजय शेठ, जाधव, संजय शिंदे यांच्यासह ज्येष्ठ वाचक, संचालक मंडळाचे सदस्य, कर्मचारी आणि वाचनप्रेमी उपस्थित होते. अध्यक्षा सीमा मपारा यांनी सांगितले की, महाडमधील वाचकांच्या मागणीनुसार गेल्या काही वर्षांपासून लायब्ररीत दिवाळी अंक उपलब्ध करून दिले जात आहेत. या उपक्रमाला महाडकरांकडून दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यंदाही विविध विषयांवरील ७० हून अधिक दिवाळी अंक वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले असून, वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम यापुढेही सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

स्वच्छता दूत, पोलीसांना दिवाळी भेट | **बालकांच्या हस्ते ग्रंथ, शुभेच्छापत्रांचे वाटप**

खांदा कॉलनी, करंजाडेत कृतज्ञतेचा जागर

। पनवेल । प्रतिनिधी ।

समाजाच्या स्वच्छतेसाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या स्वच्छता कर्मचारी व पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जीवनविद्या मिशनच्यावतीने खांदा कॉलनी आणि करंजाडे येथे दिवाळीनिमित्त विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत स्वच्छता दूत आणि पोलीस कर्मचाऱ्यांना ग्रंथ, पणत्या तसेच बालकांनी स्वतः तयार केलेली शुभेच्छापत्रे भेट देण्यात आली.



खांदा कॉलनीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना नगरसेवक एकनाथदादा गायकवाड यांच्या हस्ते सद्गुरू श्री. वामनराव पै लिखित शरीर साक्षात परमेश्वर आणि स्त्रियांशी हितगुज या ग्रंथांचे ७३ संच भेट देण्यात आले. तसेच, करंजाडे येथील १० स्वच्छता कर्मचाऱ्यांनाही शरीर साक्षात परमेश्वर हा ग्रंथ देण्यात आला. आरोग्याचे महत्त्व आणि शरीराची काळजी घेण्याविषयी जागृती निर्माण करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

खांदेश्वर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप माने यांनी बालकांच्या उपक्रमाचे कौतुक केले. करंजाडे पोलीस चौकीतील पोलीस कॉन्स्टेबल जीवन धोत्रे आणि पठाण यांनीही भेटवस्तूंचा स्वीकार केला. यावेळी जीवन धोत्रे यांनी बालकांना सुरक्षिततेविषयी मार्गदर्शन करत कोणतीही अनुचित घटना घडल्यास पालकांना व पोलिसांना त्वरित माहिती देण्याचे आवाहन केले. आपत्कालीन मदतीसाठी ११२ हा हेल्पलाइन क्रमांकही त्यांनी सांगितला. स्वच्छता कर्मचारी आणि पोलीस बांधवांच्या सेवाभावी कार्याची दखल घेत त्यांच्याप्रती आदर व्यक्त करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. बालकांनी स्वतः तयार केलेल्या भेटवस्तूंमधून सामाजिक कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. माणसाने माणसाशी माणसासम वागणे हा सद्गुरू श्री. वामनराव पै यांचा विचार कृतीतून जपत जीवनविद्या मिशनने दिवाळीच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

देवन्हावेत किल्ले स्पर्धकांचा सन्मान

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते बंटी नलावडे यांच्या संकल्पनेतून देवन्हावे येथे गेल्या अनेक वर्षांपासून किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाही उत्साहात पार पडलेल्या स्पर्धेत २२ किल्ले स्पर्धकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी रामदास पाटील, किशोर नामदेव पाटील, प्रभाकर ठोंबरे, संजय कडव, भूषण कडव, संदेश चौधरी, नितीन चौधरी, दिनेशजी नलावडे व उज्ज्वल पाटील, शैलेश आंबवणे आदी उपस्थित होते.

निवडक



भावाच्या आठवणीत अनमोल भेट

माणगाव : प्रशांत सदू पवार यांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांच्या भगिनी सुवर्णा पालकर यांनी मागणाव येथील उपजिल्हा रुग्णालयात चार बॉक्स सलाईन बॉटल्स भेट देऊन भावाला अनोख्या पद्धतीने आदरांजली अर्पण केली. आपला भाऊ आज आपल्यात नाही, ही मनाला चटका लावणारी जाणीव असतानाही त्याच्या आठवणी केवळ स्वतःच्या मनात जपण्याऐवजी त्या समाजाच्या उपयोगी पडाव्यात, या उदात्त भावनेतून त्यांनी हा सेवाभावी उपक्रम राबविला. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरजू रुग्णांना आवश्यक वैद्यकीय साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या उपचारांना हातभार लागावा, हा या मदतीमागील माणुसकीचा भाव विशेष उल्लेखनीय आहे.चार बॉक्स सलाईन बॉटल्सची ही भेट आकड्यांच्या दृष्टीने कदाचित छोटी वाटेल; मात्र, तिच्यामागे दडलेली भावना अतिशय मोठी आहे. एका बहिणीने आपल्या दिवंगत भावाच्या स्मृतींना दिलेली ही प्रेमाची भेट आहे. आजच्या स्वार्थी आणि धावपळीच्या जगात स्वतःच्या दुःखालाही समाजसेवेचे रूप देणारी माणसे समाजासाठी खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरतात. प्रिय व्यक्तीच्या स्मृती जपण्याचे अनेक मार्ग असतात; मात्र त्या स्मृतींच्या माध्यमातून गरजूंच्या आयुष्यात मदतीचा हात पोहोचविणे हा सर्वांत सुंदर आणि चिरंतन मार्ग आहे.



चौकमधील किल्ले स्पर्धा उत्साहात

रसायनी : नेताजी पालकर मंडळ चौक तर्फे दिवाळीनिमित्त किल्ले स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे परीक्षण दीपावली पडावा बलिप्रतिपदेच्या दिवशी निसर्ग मित्र संस्था पनवेलचे प्रकाश पाटील, संजय कुमठेकर, प्रिया अक्कानवरू, मानसी वर्तक व हरीकिरण शेट्टी यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुप्रसिद्धच प्रतापगड, रायगड, राजगड, सिंहगड, तोरणा, सिंधुदुर्ग, पन्हाळा यासह अनेक अपरिचित किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार केल्या व त्याविषयी ऐतिहासिक माहिती सांगितली. रायगड भूषण यशवंत सकपाळ हे ७५ व्या वर्षीही या स्पर्धा गेल्या ४० वर्षांपासून आयोजित करीत आहेत. त्यांच्या सोबतीला कार्यकर्ते भूषण पिंगळे, अनिल खंडागळे, अरुण घोडके, सुदेश महागावकर, अशोक मोरे, जितेंद्र ठाकूर, फिरोज शेख, राजेंद्र दुर्गे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. स्पर्धेचे परीक्षण पूर्ण झाले असून पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि.२२)श्री हनुमान मंदिर, नेताजी पालकर जन्मस्थळ येथे होणार असल्याचे नेताजी पालकर मंडळाचे संघटक कवी यशवंत सकपाळ यांनी सांगितले.

रिक्षाचालकांसाठी दिवाळी लकी ड्रॉ

पनवेल : दिवाळीनिमित्त आमले मोटर्स आणि आपला इन्शुरन्स मित्र यांच्यावतीने रिक्षाचालकांसाठी आयोजित करण्यात आलेला रोख बक्षिसांचा लकी ड्रॉ सोहळा शेकडो रिक्षाचालकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या उपक्रमात चार भाग्यवान विजेत्यांना एकूण २५ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात आली. आमले मोटर्सचे संचालक डॉ. संतोष शिवदास आमले आणि खांदेश्वर रिक्षाचालक संघटनेचे अध्यक्ष मच्छिंद्र पाटील यांच्या पुढाकारातून कामोठे, जुई, नौपाडा, धाकटा खांदा व मोठा खांदा परिसरातील रिक्षाचालकांसाठी या लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख यांच्या हस्ते लकी ड्रॉ काढण्यात आला. यावेळी कळंबोली वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक किरण शिकलकर उपस्थित होते. यामध्ये कामोठे येथील मंगेश म्हात्रे यांनी १० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. नौपाडा येथील पंढरी भगत यांना ७ हजार, जुई येथील नरेश पाटील यांना ५ हजार, तर मोठा खांदा येथील जयदास गोधळी यांना ३ हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. या कार्यक्रमाला नगरसेविका हेमलता गोवारी, नगरसेवक दिलीप पाटील, भाऊ भगत, सुनील गोवारी, रितिक्षा गोवारी, मनिषा म्हात्रे, माजी नगरसेवक प्रमोद भगत, अनंता म्हात्रे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि रिक्षा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



चिमुकल्यांनी साकारला किल्ले लोहगड

पाली/गोमाशी : यंदाच्या दिवाळीत लहानग्यांनी मेहनत, कल्पकता आणि शिवप्रेमातून अप्रतिम किल्ले लोहगड साकारला आहे. माती, दगड, हिरवळ आणि छोट्या मावळ्यांच्या प्रतिकृतींमधून हा किल्ला हुबेहूब उभारण्यात आला आहे. या किल्ल्यावर भगवे झेंडे, तटबंदी, बुरुज आणि पायऱ्या अत्यंत बारकाईने बनवल्या आहेत. रात्रीच्या दिव्यांच्या प्रकाशात हा किल्ला आणखीच उठून दिसतो. हा किल्ला बनविण्यासाठी चिमुकल्यांनी अनेक दिवस मेहनत घेतली. यातून इतिहासाची आवड, शिवरायांबद्दलचा अभिमान आणि एकत्र काम करण्याची वृत्ती दिसून येते.हा किल्ला रुद्र काटकर, यश काटकर, मुग्धा काटकर, गायत्री काटकर, ओम काटकर, पूर्वा काटकर, गौरी काटकर आणि सार्थक थळे या बाळ मावळ्यांनी साकार केला. या सर्व चिमुकल्यांचे परिसरातून कौतुक होत असून पुढची पिढी शिवविचार जपत आहे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ नोव्हेंबर

१) श्री.सय्यदहुसेन अब्दुल वहाब कादरी
महादेव आळी, अलिबाग,
दि.१५-११-१९५५

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

पनवेलमध्ये वाहनांच्या बॅटऱ्यांची चोरी



दोन महिला आरोपींना अटक
ओएनजीसी गेट परिसरातील घटना

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेलमधील ओएनजीसी गेट परिसरात उभ्या असलेल्या डंपर आणि पोकलेनमधील चार बॅटऱ्या चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा पनवेल शहर पोलिसांनी छडा लावला आहे. याप्रकरणी मानखुर्द येथील दोन महिलांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या चारही बॅटऱ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

याप्रकरणी काळुंद्रे गावातील रहिवासी रविंद्र पाटील (वय ७२) यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या मालकीचा डंपर (एमएच ४६ बीबी ९७४०) आणि हुंदाई कंपनीची पोकलेन देखभाल-दुरुस्तीसाठी पनवेल ओएनजीसी गेटजवळील श्रद्धा हॉटेलसमोरील मोकळ्या जागेत उभी करण्यात आली होती. याच ठिकाणाहून अज्ञात चोरट्यांनी दोन्ही वाहनांमधील प्रत्येकी दोन अशा एकूण चार ॲमरॉन कंपनीच्या बॅटऱ्या चोरून नेल्या होत्या. या बॅटऱ्यांची एकूण किंमत २० हजार रुपये आहे.

या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी सुनीता उपाध्ये (वय ३५) आणि सुजाता उपाध्ये (वय ३५, दोघीही रा. पीएमजी कॉलनी झोपडपट्टी, भाजी मार्केटजवळ, मानखुर्द) यांना अटक केली. त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या चारही बॅटऱ्या हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कारवाई केली. या पथकात विशाल दुधे, सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, सचिन कोर, अभिजीत गडकरी आणि साईनाथ मोकळ यांचा समावेश होता. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण करीत आहेत.

स्कूटीची चोरी

पनवेल : केतकी बुथ, प्रभाग क्रमांक १९ परिसरातून ८० हजार रुपये किमतीची सुझुकी ॲक्सेस १२५ स्कूटी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी विनायक मंगवानी (रा.वाल्मीक नगर) यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांनी आपली सुझुकी ॲक्सेस स्कूटी कार्यालयाजवळ पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने संधी साधून स्कूटी चोरून नेली. परिसरात शोध घेऊनही स्कूटी न मिळाल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

रंगांच्या दुनियेत कलाकारांचा जलवा

। उरण । प्रतिनिधी ।

रांगोळी म्हणजे केवळ रंगांची उधळण नव्हे, तर कल्पकतेला मिळालेली कलात्मक दाद! उरणमध्ये रंगवली कला दर्शन संस्थेच्या वतीने दिवाळीनिमित्त आयोजित रांगोळी प्रदर्शनाने यंदा कलाप्रेमींची मने जिंकली. सहा दिवस चाललेल्या या प्रदर्शनात २२ कलाकारांनी आपल्या कुंचल्याऐवजी बोटांच्या जादूने रंगांची अशी काही बरसात केली की, पाहणाऱ्यांच्या नजरा अक्षरशः खिळून राहिल्या.



उरणमधील एन.आय. हायस्कूल येथे भरविण्यात आलेल्या प्रदर्शनात विविध विषयांवरील रांगोळ्यांनी कलात्मकतेचा नवा आविष्कार घडविला. विशेषतः दिवंगत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची साकारलेली हुबेहूब रांगोळी प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरली. स्थानिक नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि रांगोळी कलेची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, या उदात्त हेतूने संस्थेने या प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

प्रदर्शनाला उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, संतोष पवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट देऊन कलाकारांच्या कलाकृतींचे कौतुक केले.

कोलाडमध्ये आढळला मृतदेह

कोलाड : कोलाड टोल नाका परिसरात (दि.१२) नोव्हेंबर रोजी अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. सदर इसमाचे वय ६५ ते ७० वर्षे असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, या इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा नातेवाईकांना ओळख पटत असल्यास त्यांनी कोलाड पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

गर्दीत सोन्याच्या हाराची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या खरेदीसाठी पनवेल शहरातील बाजारपेठेत झालेल्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने ग्राहकाच्या पिशवीतील सुमारे दोन लाख रुपये किमतीचा सोन्याचा हार चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. फूल बाजार परिसरात ही घटना घडली. याप्रकरणी बोनशेत येथील ४५ वर्षीय व्यक्तीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



तक्रारदार दिवाळीच्या खरेदीसाठी पनवेल शहरात आले होते. त्यांनी सायंकाळी साडेसातच्या सुमारास आनंद ज्वेलर्स येथून पत्नीसाठी सोन्याचा हार खरेदी केला. त्यानंतर पूजेसाठी फुले आणि पत्नीसाठी घड्याळ घेण्यासाठी ते बाजारपेठेत गेले.

यावेळी बाजारातील गर्दी आणि खरेदीच्या गडबडीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पिशवीतील सोन्याचा हार लंपास केला. काही वेळाने हार चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी परिसरात शोध घेतला; मात्र हार न मिळाल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल केली.

दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये वाढलेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर चोरीच्या या घटनेने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पनवेल शहर पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत असून, पुढील तपास सुरू आहे.

सारडे विकास मंचाच्या किल्ले स्पर्धेला प्रतिसाद

● शिवकालीन इतिहासाचा जागर घडविणारा उपक्रम

। उरण । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराजांचा देदीप्यमान इतिहास आणि गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व नव्या पिढीला समजावे, त्यांच्यामध्ये दुर्गसंवर्धनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने सारडे विकास मंचाच्या वतीने दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत आयोजित करण्यात येणाऱ्या किल्ले स्पर्धेला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यंदाच्या स्पर्धेत तब्बल ६८ किल्ल्यांची नोंदणी झाली. बालचमूंच्या कल्पकतेतून साकारलेल्या या गडकिल्ल्यांनी उपस्थितांची मने जिंकली.



सह्याद्री प्रतिष्ठानचे प्रितेश कोळी, अभिषेक ठाकूर, अक्षय कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व किल्ल्यांचे परीक्षण करण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक राज घरत, द्वितीय क्रमांक स्वाद पाटील, उत्तेजनार्थ ईशान म्हात्रे, मोहित माळी यांनी पटकावला.

कार्यक्रमास प्रसाद पाटील, निवास गावंड, रविंद्र पाटील, ॲड. रनिता ठाकूर, उपेंद्र ठाकूर, रोशन घरत, गजानन ठाकूर, प्रकाश माळी, नितीन म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, विनोद पाटील, गणेश पाटील, अमोल पाटील, सिद्धेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन पाटील यांनी केले.

तळ्यात रांगोळी स्पर्धा उत्साहात

तळा : छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गड-किल्ल्यांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी किल्ले बांधणी व सुबक रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. रांगोळी स्पर्धेत १५ स्पर्धकांनी कलात्मक रांगोळ्या साकारल्या. यात समृद्धी क्षीरसागर हिने प्रथम, रिया अडसूळ हिने द्वितीय, कृपा पाटील हिने तृतीय तर सुजाता जाधव यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेचे परीक्षण विनोद कोलवणकर, आकाश शिंदे यांनी केले होते.

सायकलला दुचाकीची धडक ; तीस वर्षीय तरुण जखमी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

सायकलला दूचाकीने दिलेल्या धडकेत तीस वर्षीय परमानंद प्रकाश गायकर (रा. नितळस) हा जखमी झाला. या अपघाताप्रकरणी १२ नोव्हेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात काळ्या रंगाच्या इलेक्ट्रिक दुचाकी चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी परमानंद गायकर हा सायकलवरून घोट गाव येथे गणपती मंदिराच्या समोर सारांश कलेक्शन या दुकानासमोर रस्ता क्रॉस करत होता. यावेळी काळा रंगाच्या इलेक्ट्रिक दुचाकीवरील चालकाने त्याच्या ताब्यातील दुचाकी वेगाने चालवली आणि सायकलला समोरून ठोकर दिली. या अपघातात गायकर हे जखमी झाले आहेत. त्यानंतर दुचाकी चालक कोणतीही मदत न करता पळून गेला आहे.

साप्ताहिक राशिभविष्य दि. १५ ते २१ नोव्हेंबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

कठीण निर्णय घ्यावे लागतील

मेष : राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या वडिलांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न करा. यामुळे फक्त तुम्हाला नशिबाची साथच मिळणार नाही, तर तुमची प्रगती देखील होईल भरपूर होईल. या सप्ताहात तुम्हाला काही कठीण निर्णय घ्यावे लागतील. कदाचित यामुळे तुम्ही दुखावले जाऊ शकता. तुमच्याकडे प्रत्येक कठीण काळात आणि आपल्या मनोबलातून बाहेर पडण्याची क्षमता तुम्हाला सक्षम बनवू शकते. जरी आपल्याला असे निर्णय घ्यावे लागले तरीही घाबरू नका. कारण हे आपल्या भविष्यासाठी खूप चांगले आहे. एकंदरीत, हा कालावधी या राशीच्या लोकांना मिश्रित परिणाम देईल. आपण आपल्यातील काही कमतरता दूर करून यशस्वी व्यक्ती म्हणून उदयास व्हाल. **महिलांना :** हा असा एक सप्ताह असेल ज्यात आपल्यास साहस असेल प्रेम असेल आणि आपल्या प्रियजनांचा साथ ही असेल. आपल्याला आपली क्षमता त्याच्या पूर्ण संभाव्यतेसाठी आणि या कालावधीसाठी वापरावी लागणार आहे. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभ दिनांक :** १५,१६.

पैसा जपून ठेवण्यास शिका

वृषभ : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले बरीच महत्त्वपूर्ण पदांवर बसलेल्या लोकांशी संबंध स्थापित केले जातील. या कळवधीत आपण खूपच स्वतंत्र अनुभवाल आणि अनेक निर्णय घ्याल, पण आपणास हे लक्षात ठेवले पाहिजे की, कधीकधी आपले निर्णय चुकीचे असू शकतात, म्हणूनच काही ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच कार्य करा. अन्यथा नफ्याच्या ठिकाणी तोटा होण्याची शक्यता आहे. जर आपण चांगले व्यवस्थापन केले तर हा कालावधी आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम कालावधी पैकी एक असेल. म्हणून या दिवसांमध्ये आपण वाहन विकत घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, जेणेकरून आपण एका चांगल्या वाहनाचे मालक होऊ शकता. या दिवसांत आपण उच्चस्तरावर आनंदाचा आनंद घ्याल. आपल्या सुविधांवरही चांगला खर्च करा. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. **महिलांना :** हा कालावधी आपल्यासाठी पायघड्या घालून ठेवलेला असेल जे कराल त्यात यश मिळू शकते पैसा जपून ठेवण्यास शिका. **शुभ दिनांक :** १७,१८.

नवीन मित्र बनतील

मिथुन : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या जातकांना मिश्रित निकाल मिळेल. या कालावधीत आपले समंजस पणाचे कौशल्य वाढेल. नातेसंबंध वाढतील आणि आपण निसर्ग आणि आयुष्यातून बरेच काही शिकू शकाल. काही नवीन मित्रही बनतील. सुरुवातीला या काळात आपण भविष्यासाठी बऱ्याच योजना तयार करा. ज्यामध्ये आपणास यश मिळेल आणि आपल्या बऱ्यापैकी प्रलंबित इच्छा पूर्ण होतील. आपण या कालावधीत आपल्या जीवनात प्रेमाचे आणि प्रणयरम्यतेचे स्वागत करण्यास तयार असावे. जर आपण आधीपासूनच घरगूती नात्यात असाल किंवा एखाद्या माहितीचा शोध घेत असाल तर या प्रकरणात आपल्याला आनंद देण्यासाठी आपले ग्रह कार्य करतील. या कालावधीत आपले विवाह देखील होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक :** १९,२०.

अहंकार बाजूला ठेवा

कर्क : राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या राशीचे लोक प्रेमाच्या बाबतीत खुप रोमँटिक असतात. एखाद्यावर मनापासून प्रेम करतात. या व्यक्तींना आपल्या अहम आणि आवेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. कारण हेच सर्व पुढे तुमच्या लव्ह लाईफमध्ये अडचणी आणू शकतात. आपण त्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असावे म्हणून या सप्ताहात आपला अहंकार बाजूला ठेवा. आपल्या जोडीदारावर प्रेम करा. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. या सप्ताहात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका, झोप व खाणे वेळेवर करा. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक :** १५,२१.

इच्छा पूर्ण होण्याची शक्यता

सिंह : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला काही नवीन संधी मिळतील. त्या संधीमुळे आपल्याकडे संपूर्ण ऊर्जा आणि तग धरण्याची क्षमता देखील वाढलेली असेल. आपण आपला हात ज्या कार्यात ठेवाल त्यात आपल्याला यश मिळेल. आपले सर्व उद्योग सुरळीत चालू होतील. या कालावधीत सुरुवातीस आपण कमी अंतराच्या ट्रीप जास्त कराल. आपल्याला यामुळे फायदाही होईल. सप्ताहाच्या सुरुवातीस आपण यात्रेवर देखील जाऊ शकता. या व्यतिरिक्त, सामाजिक कार्याशी संबंधित कामकाजामुळे आपण काही सहली देखील करू शकता. आपले परदेशी जाण्याची चांगली शक्यता आहे. यावेळी आपल्या बऱ्याचदिवसांपासून प्रलंबित असलेल्या इच्छा पूर्ण होतील, ज्यामुळे तुमचे मनोबल देखील वाढेल. या दरम्यान आपण आपले घर तयार करण्यासाठी किंवा मालमत्ता खरेदीसाठी कर्ज घेऊ शकता. **महिलांना :** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभ दिनांक :** १५,१९.

अनावश्यक खर्चाला आळा घाला

कन्या : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यवसायामध्ये आपण नावलौकीक मिळवू शकता. चालू कालावधी आपल्यासाठी एक मैलाचा दगड ठरू शकेल. आपण आपल्या क्षेत्रात चांगले यशस्वी होण्याची अपेक्षा करू शकता. प्रत्येक संधीचे भांडवल करण्यास सज्ज व्हा आणि उच्च यश मिळवा. नोकरी मिळवण्यासाठी जर आपण या दिशेने प्रयत्न करीत असाल तर आपले प्रयत्न थोडेसे वाढवा आणि देवाच्या कृपेने आणि आशीर्वादाने आपण या कालावधीत एक चांगली नोकरी मिळेल. सोबत जीवनसाथी मिळवू शकाल. या राशीच्या लोकांच्या व्यवसाय भागीदारीमध्ये ग्रहांच्या प्रभावाचा बराच फायदा होईल. आपली आर्थिक गुंतवणूक करताना तुम्ही विचारपूर्वक केली पाहिजे. तरच तुम्ही त्या कामात यशस्वी व्हाल. **महिलांना :** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक :** १६,१८.

कठीण आव्हानांवर मात करा

तुळ : राशीसाठी या सप्ताहात शनी राशीच्या या कालावधीत परदेशी सहलींचे योग बनले आहेत, म्हणून तुम्ही आताच या दिशेने प्रयत्न करीत असाल तर या वेळेचा पुरेपूर फायदा घेण्यास तयार व्हा. जर आपण लहान व्यवसायीक असाल तरी आपल्याला या कालावधीत बदलीचे योग आहेत. आपण आपल्या घरापासून दूर काम करत असल्यास, यावर्षी आपण आपल्या घराजवळ येऊ शकता. जर आपला एखादा व्यवसाय असेल तर आपल्याला त्यासंदर्भात बरेच प्रवास करावे लागेल. आपला व्यवसाय संबंध दृढ होईल. आपण कोणत्याही सर्जनशील कामात व्यस्त असल्यास हा सप्ताह भरभराटीचा जाऊ शकतो. या कालावधीत आपल्याला काही किरकोळ त्रास आणि अडचणींना सामोरे जावे लागेल. काही कठीण आव्हानांवर मात करावी लागणार आहे. आपण खूप उत्साहित व्हाल आणि आपल्या ऊर्जेच्या मदतीने प्रत्येक आव्हानाचा सामना कराल. सुरुवातीला संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. **महिलांना :** घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभ दिनांक :** १७,२०.

कामाची प्रशंसा होईल

वृश्चिक : राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या कालावधीत आपण खूप आशावादी असाल. स्वत:च्या विश्वासामुळे पुढे जाण्यासाठी आपल्याला अनेकांकडून प्रोत्साहित केले जाईल. परंतु, त्यामध्ये कोणतेही काम करण्यापूर्वी आपण पुरेशी तयारी करणे आवश्यक आहे. या सप्ताहात आपल्याला मुख्यतः आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. कारण कदाचित ही तुमची कमकुवत बाजू असेल. अचानक बदलणारे वातावरण आपल्या आरोग्यावर परिणाम करू शकते. नियमित आणि चांगल्या दिनचर्या पाळा आणि निरोगी राहा. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, अत्यधिक आवेगाने कार्य केल्याने आपल्या सभोवतालच्या लोकांवर परिणाम होईल. संयमाने काम करा. आपल्याला बरेच कठीण कार्ये पूर्ण करावे लागतील. ज्यामुळे आयुष्यात पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळेल. **महिलांना :** दिवसांत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दोन दिवसात पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** १८,२१.

सकारात्मक विचारसरणी ठेवा

धनु : राशीसाठी या सप्ताहात आपण आपल्यासाठी हे दिवस संभाव्यतेचे आहेत. आपल्या स्वत:स प्रत्येक कठीण उद्दिष्ट साध्य करण्याची क्षमता निर्माण होणार आहे. आपल्या भावंडांशी चांगला संबंध ठेवा आणि वादविवाद होऊ देऊ नका. लक्षात ठेवा आपण फक्त भावंडांच्या मदतीने पुढे जाऊ शकाल. आपणास अशा मित्रांचे सहकार्य देखील मिळेल. आपल्याला सकारात्मक विचारसरणीसह पुढे जाण्यास प्रोत्साहित करतील. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आपली आई, मामाकडील माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल. महिलांना वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक :** १६,२०.

आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता

मकर :हा सप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता या कालावधीत बरेच रोमांचक अनुभव घ्यायला मिळतील. काहीतरी नवीन शिकण्यासही मिळतील. या सप्ताहात आपण बऱ्याच ठिकाणी सहली करणार असाल पण ट्रिप्समुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. आपण लक्षात ठेवले पाहिजे, म्हणून संपूर्ण नियोजनासह सहलीला जा. विशेषतः ही वेळ असेल जेव्हा आपण वाहन काळजीपूर्वक चालवावे. आपल्या खण्यापिण्यावर विशेष लक्ष द्यावे. त्याव्यतिरिक्त आपल्याला दुसऱ्याच्या भांडणात जाणे टाळावे. मांस, मद्यपान आणि धूम्रपान करण्यासारख्या व्यसनांपासून दूर राहावे लागेल. तरीही हा कालावधी आपल्यासाठी खूप चांगला आणि महत्त्वाचा दिसत आहे. काहीतरी नवीन शिकण्यासाठी आपल्याला काही नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. बऱ्याच प्रकरणांमध्ये आपल्याला बऱ्यापैकी मोकळेपणाने आणि नवीन गोष्टी शिकण्यात रस वाटेल. **महिलांना :** आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** १७,१८.

मतप्रदर्शन करण्यास टाळा

कुंभ : राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता काही अपूर्ण कामे पूर्ण झाल्यामुळे आराम मिळेल. काही नवीन कामेही सुरू करता येतील. तुम्ही बऱ्याच काळापासून असलेल्या संकटातून मुक्त व्हाल. एक नवा अध्यायाचा श्री गणेश कराल. या कालावधीत या राशीच्या जातकांना दु:खापासून आराम मिळेल. जीवनाच्या चक्रात आनंदाची प्राप्ती होईल. चालू कालावधी आपल्याला अनेक प्रकारच्या यात्रांमध्ये व्यस्त ठेवेल, परंतु ही यात्रा शुभ आणि कल्याणकारक असेल ही आनंदाची बाब आहे. आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह आकर्षक आणि सुंदर पर्यटन स्थळावर प्रवास कराल. आपण जीवनाच्या नवीन टर्निंग पॉइंटमध्ये प्रवेश कराल. आपणास पाहिजे तसे करण्यास भरपूर स्वातंत्र्य मिळेल. आपण आपल्या ऊर्जेसह आपल्या कामात यश मिळवाल. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. पर्स फुगलेली राहील, खर्चासाठी रक्कम येईल **शुभ दिनांक :**१९,२०.

दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका

मीन : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता या कालावधीत तुम्ही स्वत: बरोबरही वेळ घालवला पाहिजे कारण यामुळे तुम्हाला आंतरिक मजबुती मिळेल आणि तुमची इच्छाशक्ती वाढेल. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना या सप्ताहात काही चांगली बातमी मिळू शकेल आणि पूर्वी केलेल्या मेहनत आणि परिश्रमांचे निकाल आता सहज मिळू शकतात. काही लोकांना वडिलोपार्जित मालमत्ता मिळण्याचीही शक्यता आहे. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या, सप्ताहाचा मधला कालावधी व्यापारी वर्गासाठी चांगले राहील. परदेशी सहल देखील होऊ शकतात. जे लोक नोकरी करीत आहेत त्यांची अचानक बदली होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे ते थोडे विचलित होऊ शकतात. आपण कोणत्याही तीर्थयात्रासाठी देखील जाऊ शकता तसा योग आहे. गेल्या काही दिवसापासून सुरू असलेल्या काही समस्या कमी होतील. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. डोक्यातला राग दाबून ठेवू नका. **शुभ दिनांक :** १५,२१.

जगदंबा देवीची मूर्ती न बदलण्याची मागणी

। खरोशी । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील वाशी येथील श्री भवानी जगदंबा देवीच्या मंदिर परिसरात सध्या एका अत्यंत संवेदनशील व गंभीर विषयावरून भक्तांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिरातील अतिशय प्राचीन, जागृत आणि ऐतिहासिक महत्त्व असलेली मूळ जगदंबा देवीची मूर्ती बदलून त्या ठिकाणी नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्याचा विचार देवस्थानच्या काही प्रमुख लोकांकडून सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, हे देवस्थान केवळ काही लोकांची खाजगी मालमत्ता नसून, ते अधिकृतपणे नोंदणीकृत असलेले सार्वजनिक न्यास आहे. सार्वजनिक मालमत्ता असलेल्या या ऐतिहासिक देवस्थानचा अमूल्य वारसा जपण्याऐवजी, सर्वसामान्य भाविकांना व ग्रामस्थांना अंधारात ठेवून मूळ मूर्ती बदलण्याचा असा एकतर्फी निर्णय घेणे हे कायदेशीर, धार्मिक आणि पुरातत्त्वीय



दृष्टिकोनातून देखिल पूर्णपणे अयोग्य असल्याचे मत अभ्यासक व सुजाण नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

जगदंबा देवीची ही मूळ मूर्ती म्हणजे प्रत्यक्ष साक्षात देवता तत्त्व आहे. कोणत्याही ठोस धर्मशास्त्रीय आधाराशिवाय किंवा अपरिहार्य कारणा शिवाय शतकांची परंपरा लाभलेली ही पूजनीय मूर्ती विस्थापित करणे किंवा या मूर्तीचे अस्तित्व नष्ट करणे म्हणजे समस्त भक्तांच्या धार्मिक भावनांवर आणि अथांग श्रद्धेवर आघात करण्यासारखे आहे. अशा पुरातन देवता तत्त्व असणाऱ्या मूर्ती समुद्र देखील पोटात घेत नाही, अशी आख्यायिका आहे. कारण कितीही दुसऱ्या मूर्तीत प्राण प्रतिष्ठापना केली तरी मूळ मूर्तीतले सत्व जात नाही. कायद्याच्या दृष्टीने विचार करता, सार्वजनिक न्यासातील असा कोणताही मोठा फेर बदल करण्यासाठी धर्मादाय आयुक्त कार्यालयाची अधिकृत कायदेशीर पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असते. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ग्रामपंचायतीलाही या सार्वजनिक विषयाची पूर्ण कल्पना असणे आवश्यक असते. भक्तांना विश्वासात न घेता किंवा प्रशासकीय परवानग्या न घेता परस्पर असा निर्णय लादणे हे कायद्याच्या आणि लोकशाहीच्या तत्त्वांमध्ये बसत नाही. आजच्या आधुनिक व प्रगत युगात जर काळाच्या ओघात एखाद्या प्राचीन मूर्तीवर भौतिक किंवा नैसर्गिक परिणाम झाले असतील, तर ती मूर्ती थेट बदलण्याऐवजी केमिकल कन्झर्वेशन (वैज्ञानिक संवर्धन) या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मूळ मूर्ती आहे तशीच सुस्थितीत सुरक्षित ठेवणे सहज शक्य आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाचे तज्ज्ञ आणि मूर्ती शास्त्रज्ञ अशा प्राचीन ऐतिहासिक मूर्तींना कोणताही धक्का न लावता त्यांचे मूळ स्वरूप कायम टिकवून ठेवण्याचे काम अत्यंत कौशल्याने करतात. त्यामुळे ''मूर्ती जुनी झाली आहे'' या क्षुल्लक कारणावरून शेकडों वर्षांचा आध्यात्मिक वारसा नष्ट करणे आणि नवीं मूर्ती बसवणे हा सुजाण पणा नसून तो सांस्कृतिक वारशाचा ऱ्हास ठरेल. म्हणूनच मूर्ती बदलण्याऐवजी तिच्या शास्त्रोक्त संवर्धनाचा आग्रह धरणे हीच काळाची गरज असल्याचे स्थानिक भक्तांमधून बोलले जात आहे.

श्री जगदंबा देवीची प्राचीन मूळ मूर्ती हीच पेणसह वाशी विभाग परिसराची खरी ओळख, अस्मिता आणि पूर्वजांचा अमूल्य ठेवा आहे. या देवीच्या मूर्तीला वाचवण्यासाठी देवीच्या सर्व भाविक भक्तांनी एकत्र येऊन या निर्णयाचा शांततामय मार्गाने पुनर्विचार करण्याची मागणी केली पाहिजे. देवस्थान व्यवस्थापनाने देखील सर्व भक्तांच्या भावनांचा, कायद्याचा आणि धर्मशास्त्राचा सन्मान करून मूळ मूर्ती बदलण्याचा विचार तात्काळ कायमचा सोडून द्यावा आणि केवळ मूळ मूर्तीच्या वैज्ञानिक संवर्धनावर लक्ष केंद्रित करावे. सर्व भाविकांनी आपापल्या सह्या चे निवेदन धर्मादाय आयुक्त (अलिबाग) आणि स्थानिक प्रशासनाला देऊन या बेकायदेशीर व एक तर्फी प्रक्रियेला स्थगिती देण्याची मागणी करावी, जेणे करून आपल्या प्राचीन संस्कृतीचे आणि जगदंबा देवीच्या ऐतिहासिक मूर्तीचे रक्षण होऊ शकेल, असे आवाहन जगदंबा देवीवर नितांत श्रद्धा असणाऱ्या विचारवंत व भाविक भक्तांकडून केली जात आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. जयेश बाळाराम पाटील, रा.कणे, ता पेण, जि.रायगड यांनी खालील वर्णनाची शेत जमिन मिळकत जमिनीचे विद्यमान मालक यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे माझे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांच बरोबर साठेकरार झालेला आहे तसेच मिळकतीच्या मोबदल्याची ठरलेली रक्कम अदा केलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मिळकतीचे वर्णन:- मौजे महलमिरा डोंगर, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेत जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं./ गट नं.	क्षेत्र आर.चौ.मी सें मी.	आकार रु. पै.
श्री दामोदर कृष्णा जेधे वगैरे ४ रा. चांदेपट्टी, पो दिवाणमाळ ता. पेण, जि.रायगड	३२६/१ पो ख एकूण	०.४३.०० ०.०३.०० ०.४६.००	०.१२

या जमिन मिळकतीपैकी दामोदर कृष्णा वगैरे ४ यांचे मालकीची व ताबेकब्जे वहिवाटीतील ०.२६.०० हे. आर हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर मिळकती बाबत कोणीही जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर कोणताही खरेदी विक्रीचा व्यवहार करु नये. या उपर देखील कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार केल्यास तो माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच खरेदीच्या व्यवहाराने कोणाचेही आर्थिक नुकसान झाल्यास त्यास माझे अशिल जबाबदार नाहीत असे या नोटीसीने कळविले.

पेण.
दिनांक : १५/११/२०२६

सही/-
ॲड. आर. आर. म्हात्रे
परमार प्लाझा, गाळा नं.९
पेण पोलीस स्टेशन जवळ,
ता. पेण, जिल्हा-रायगड
मो.नं.९४२२६८९५९८, ७३५०८११०५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक मे.शांती डेव्हलपर्स तर्फे भागिदार आर्या टोल इन्फ्रा लि., यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी विद्यमान मालकांनी माझे अशिलांबरोबर केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे गुंजीस, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र. ९/१/५/१, ९/१/५/२, ९/१/५/३, ९/१/५/४, ९/१/५/५, ९/१/५/६, ९/१/५/७, ९/१/५/८, ९/१/५/९, ९/१/५/१० एकूण क्षेत्र ६८०० चौ.मी. बिनशेती भूखंड मिळकतीमध्ये बांधलेल्या मँगो कंट्री इमारतीमध्ये खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिका खरेदी-विक्री बाबत.

निवास सदनिकेचे वर्णन

अ.क्र.	मालमत्ता क्र.	क्षेत्रफळ (चौ.मी.)
१.	१६१/१	१५५.४२
२.	१६१/२	१५२.४२
३	१६१/९	१५२.४२
४	१६१/१०	१२४.४३
५.	१६१/२०	१२४.४३
६.	१६१/३०	१५२.४३
७.	१६१/३१	१५२.४२

सदर विद्यमान मालकांच्या मिळकतीत वा त्यांना प्राप्त झालेला त्यांचा प्रमाणयोग्य मालकी हक्कांबाबत त्यांचेशिवाय अन्य कोणाचाही करारनामा, विसार पावती, साठेखत समजुतीचा करार, विकसन करार, कुलमुखत्यारपत्र, भाडेपट्टा, लिव्ह ॲण्ड लायसन्स, गहाण/तारण, दान, लीन, पोटगी, अविभक्त हिस्सा, वारसा हक्क, ताबा/कब्जा, वहिवाट इ. अथवा कोणतेही न्यायालयीन खटले/दावे वा आदेश अथवा न्यायालयीन जप्ती इ.प्रकारे कोणत्याही प्रकारचे हित, हक्क, संबंध वा अधिकार असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर प्रत्यक्षात अस्सल कागदोपत्रांच्या प्रमाणित नकला देऊन आपली हरकत नोंदवून रितसर खात्री पटवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत/हरकती न आल्यास त्यांनी तथाकथित हक्क व अधिकार शाबीत न केल्यास सदर मिळकती ह्या पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व निष्कर्जी असून सदर मिळकतींत कोणाचाही कुठल्याही प्रकारे हित, हक्क, संबंध वा अधिकार वा हरकत नाही असे समजून आमचे अशिल सदर नमूद मिळकतींचेबाबत नोंदणीकृत खरेदीखत हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाचीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १४/११/२०२६

सही / -
(ॲड.व्ही.एन.साईनी)
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग

महापालिकेत पंडित नेहरूंना अभिवादन

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

भारताचे पहिले पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या उभारणीचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि.१४) पनवेल महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान दिले. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाच्या विकासाचा भक्कम पाया रचला. औद्योगिकीकरण, वैज्ञानिक दृष्टिकोन, शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि लोकशाही मूल्यांच्या जोपासनेवर त्यांनी विशेष भर दिला. मुलांवरील विशेष प्रेमामुळे त्यांचा जन्मदिवस देशभरात बालदिन म्हणूनही साजरा केला जातो. यावेळी प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, सहायक आयुक्त बाळाराम रातांबे, सामान्य प्रशासन विभागप्रमुख कीर्ती महाजन, लिपिक विष्णू सांगळे तसेच अग्निशमन दलाचे कर्मचारी, सुरक्षा रक्षक उपस्थित होते.

बनावट संमतीपत्राद्वारे योजनेचा लाभ

मुरुड,: बनावट संमतीपत्र तयार करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ घेतल्याचा प्रकार मुरुडमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात मुरुड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या नावावर संबंधित जमीन नसतानाही त्याने दुसऱ्याच्या मालकीच्या जमिनीबाबत फिर्यादी आणि त्यांच्या आईच्या बनावट सह्या करून संमतीपत्र तयार केले. हे संमतीपत्र खरे असल्याचे भासवून मुरुड नगर परिषदेकडे सादर केले आणि संबंधित जागेवर घराचे बांधकाम केले. ही घटना २२ ऑक्टोबर २०२४ रोजी घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मेंगाळ करीत आहेत.

नागोठण्यातून नऊ बकऱ्या चोरीला

। रोहा । प्रतिनिधी ।

नागोठणे येथील रामनगर परिसरात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी नऊ बकऱ्या चोरून नेल्याची घटना दि.१३ नोव्हेंबर रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. फिर्यादीच्या घराशेजारी असलेल्या झोपडीचे बांबूचे गेट उघडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. बकऱ्या बांधण्यासाठी वापरलेले दोर कापून फिर्यादीच्या मालकीचे तीन बोकड, तीन बकऱ्या आणि एक पिल्लू, तसेच त्यांच्या शेजारील साक्षीदाराच्या आईच्या मालकीच्या दोन बकऱ्या असा एकूण नऊ बकऱ्या चोरून नेल्या. चोरीला गेलेल्या पशुधनाची किंमत सुमारे २५ हजार रुपये आहे. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार म्हात्रे करीत आहेत.



● रोहा-कोकबन येथील श्रेयस पाटेकर व अर्श सुभेदार यांनी दिपावलीनिमित्त बनविलेली पन्हाळा किल्ल्याची प्रतिकृती. (छायाचित्रः राजीव नेवासेकर)

किल्ल्यांच्या स्पर्धेत 'कोंढाणा' प्रथम

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील चिंचवली येथे सालाबादप्रमाणे किल्ले बनविण्याची स्पर्धा आयोजित केली होती. ग्रामपंचायत हद्दीमधील सर्व गावांमधील बच्चे कंपनीने या किल्ले बनविण्याच्या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत एकसलं येथील मुलांनी बनवलेला किल्ला कोंढाणा सर्वोत्तम ठरला. दरम्यान, या किल्ले बांधणी स्पर्धेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. यावेळी प्रथम क्रमांक एकसळ येथील स्मित बोराडे, सिद्धी बोराडे, अथर्व बोराडे, यशस्वी बोराडे यांनी बनवलेल्या कोंढाणा या किल्ल्याला देण्यात आला. तसेच, दुसऱ्या बक्षिसाचा मानकरी डिकसळ येथील फ्लॉरेन्सचा राजा सार्वजनिक



गणेशोत्सव मंडळ प्रतिष्ठा कांबळे, तृतीय बक्षिसाचा मानकरी चिन्मय पाटील आणि स्मिता पाटील यांनी बनवलेला प्रतापगड किल्ला, तर चौथ्या क्रमांकाचे बक्षीस बार्डी तरुणांना तसेच चिंचवली येथील दर्शील भगत व हर्षिता भगत यांनी बनवलेल्या प्रतापगड किल्ल्याला मिळाले. एक विशेष पारितोषिक वारे येथील भाविक म्हसे यांनी बनवलेल्या जंजिरा किल्ल्याला देण्यात आले.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे उमरोली, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती. मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

मिळकतींचे वर्णन

अ.क्र.	मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)	मालकाचे नाव
१	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	५४४	क्षेत्र ०.९३.७० पो.ख. ०.०६.२० एकूण ०.९९.९० पैकी क्षेत्र ०.२२.५०	०.३४ २.००	नजमा कासीम हलडे शादाब कासीम हलडे
२	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	५४४	क्षेत्र ०.९३.७० पो.ख. ०.०६.२० एकूण ०.९९.९० पैकी क्षेत्र ०.५०.९० पो.ख. ०.०६.२० एकूण ०.५७.१०	८.३४ ४.५३	पांडुरंग लक्ष्मण नांदगावकर
३	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	५४४	क्षेत्र ०.९३.७० पो.ख. ०.०६.२० एकूण ०.९९.९० पैकी क्षेत्र ०.२०.३०	८.३४ १.८१	अरूण कुमार प्रेम सिंह
४	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	५४३	जिरायत ०.२१.४० पो.ख. ०.०१.१० एकूण ०.२२.५०	४.०३	अरूण कुमार प्रेम सिंह
५	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	५४१	वरकस ०.१३.०० पो.ख. ०.१२.०० एकूण ०.२५.००	०.०९	सतीश महादेव म्हात्रे भगवान गोमा म्हात्रे
६	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	५४२	वरकस ०.४०.०० पो.ख. ०.०७.०० एकूण ०.४७.००	०.३२	गौरीबाई कमळ्या मुरूडकर मंजुळाबाई महादेव पुगावकर
७	उसरोली ता. मुरूड जि. रायगड	४५५	जिरायत ०.१४.७० वरकस ०.३१.७० पो.ख. ०.०१.३० एकूण ०.४७.००	२.४८	दत्ताराम सखाराम बेलोसे

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसारपावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १४/११/२०२६

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु. नांदईपाडा, पो. झिराड
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. अर्जुन लक्ष्मण कडु, श्री. छगन लक्ष्मण कडु, श्री. शरद लक्ष्मण कडु याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे एकसळ, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १८/५ एकुण १.२६.२० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.६०.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १५/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री अर्जुन लक्ष्मण कडु, श्री. छगन लक्ष्मण कडु, श्री. शरद लक्ष्मण कडु याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे एकसळ, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १८/५ एकुण १.२६.२० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.६०.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १५/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती छाया रमेश चंदन श्री. श्रेयस रमेश चंदन यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे गणेगाव चिंचवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७२/१२/ब एकुण ००.१९.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १५/११/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दूरध्वनी कार्यालय:-०२२-२७४५८०४०,४१,४२ फॅक्स - ०२२- २७४५२२३३
ई-मेल :-panvelcorporation@gmail.com वेबसाईट - www.panvelcorporation.com

कार्यालय जा.क्र.पमपा/पापुवि/९९२६/प्र.क्र.०१/८९८/२६ दि.१३/११/२०२६

नागरिकांना जाहिर आवाहन

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील होणारा पाणी पुरवठा मंगळवार दि. १७/११/२०२६ सकाळी ९:०० ते बुधवार दि. १८/११/२०२६ रोजी रात्री ९:०० वाजेपर्यंत ३६ तासांचा शटडाऊन असल्यामुळे पनवेल शहरातील पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

तसेच पुढील २ ते ३ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घेऊन मिळणारे पाणी जपून वापरावे. पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे, हि विनंती.

सही/-
(विलास चव्हाण)
उप अभियंता (पापु)
पनवेल महानगरपालिका

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● घरकामासाठी अर्धवेळसाठी बाई पाहिजे. पगार- ५००० रुपये, संपर्क : ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९

● ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०

● अलिबाग आवास परिसरामध्ये MST (Multy Skiled Techician+ Housekeeping + Gardner अर्जन्ट पाहिजेत मो. नं 8261066056 / 9370579163

● नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२

● बागायती वाडी विक्री-१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक-सुहास माळी गाव-थळ गुंजाळ आळी अलिबाग रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो.८७७९८०५३५३

● अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229

● पाहिजेत-अलिबागमध्ये ऋतुजा इन्फ्रास्टकचर्स या कंपनी करीता टॅली/जी.एस.टी. कामासाठी मुलगा/मुलगी पाहिजेत संपर्क-९८२३४९२६२६/७९९८६१९१९१ विद्यानगर-अलिबाग

● जमिन तसेच, जुने/नवीन घर विकत/भाड्याने पाहिजे. 7378480151

● दुकानगाळा भाड्याने देणे आहे विक्री करणे आहे २० गुंठे जागा अलिबाग पासून २ किमीवर ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



राशीभविष्य

- **मेष** : लाभदायी कालावधी आहे. महत्त्वाची कामं पूर्ण होण्याबाबत काळजी घ्यावी. प्रकृती अस्वास्थ राहील.
- **वृषभ** : इच्छित फळं मिळण्यासाठी अनुकूलता राहील. नव्या विचारांना चालना मिळेल. समाधानी रहाल.
- **मिथुन** : जुनी येणी पुन्हा रखडतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा. शिक्षण क्षेत्रात प्रगती करू शकाल.
- **कर्क** : व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल. बाकी चिंता नसावी.
- **सिंह** : अर्थार्जनाच्या नव्या संधी लाभतील. उपजत कला-गुणांचा विकास होईल. डोळ्यांची काळजी घ्या.
- **कन्या** : कामाचा ताण वाढेल. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. अनुभवींचं मार्गदर्शन लाभदायी राहील.
- **तूळ** : आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. विचाराने रहायला हवं.
- **वृश्चिक** : दिलासादायक घटना घडतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल.
- **धनु** : मुलांची चिंता सतावेल. उधार-उसनवार व्यवहार टाळावेत. प्रवासात मौल्यवान वस्तुची काळजी घ्या.
- **मकर** : साऱ्या गोष्टी मनाप्रमापणे घडतील. मोठ्या खरेदीचे व्यवहार होतील. जोडीदाराशी वाद घालू नये.
- **कुंभ** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. व्यवसायात नव्या संधी लाभतील. आत्मविश्वासानं कार्यरत रहाल.
- **मीन** : मनाविरूध्द घटना संभवतात. शिक्षण, कला क्षेत्रात अनुकूलता राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

१५ नोव्हेंबर — दिन विशेष

१९४९ : महात्मा गांधींचे मारेकरी नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना गांधींची हत्या आणि खुनाचा कट रचल्याबद्दल अंबाला तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली.
१९८२ : आचार्य विनोबा भावे यांनी पवनार येथील पराधाम आश्रमात उपोषण करून देहत्याग केला.
१९८९ : सचिन तेंडुलकरचे भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण.
२००० : लुआंडाहून निघालेले ए. एन २४ प्रकारचे विमान कोसळले.

आरोग्यमंत्र — शिळं अन्नही गुणकारी

घरात आदल्या दिवशीच्या शिल्लक असलेल्या अन्नाचं काय करायचं असा प्रश्न अनेक महिलांना सतत पडत असतो. कितीही मोजका स्वयंपाक करायचा ठरवलं तरी काही प्रमाणात का होईना अन्न उरतंच. असं अन्न टाकून देणं योग्य वाटत नाही. पूर्वी आदल्या दिवशीची शिल्लक राहिलेली पोळी, भाकरी वा भात दुसऱ्या दिवशी आवडीनं खाल्ला जात होता. आताही काही प्रमाणात असं दिसतं. परंतु सर्वसाधारपणे शिळं आदल्या दिवशीचं शिळं अन्न न खाण्याकडेच कल दिसून येतो.



या पार्श्वभूमीवर अलिकडेच समोर आलेला निष्कर्ष विचारात घेण्यासारखा आहे. आसामच्या ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटीने केलेल्या संशोधनानुसार शिळा भात रात्रभर पाण्यात भिजवून दुसऱ्या दिवशी सकाळी खाल्ल्यास ते आरोग्यासाठी लाभदायक ठरतं. अर्थात, या संदर्भात पुढील कृती लक्षात घ्यावी. सर्वप्रथम रात्री उरलेला भात एका मातीच्या भांड्यात पाणी घेऊन त्यात टाकावा. यामुळे भात फर्मेंट होईल. यानंतर सकाळी हा भात मातीच्या भांड्यातून काढून फोडणी द्यावी. अथवा हा भात दह्याबरोबरच खाता येईल. अशा पध्दतीने फर्मेंट केलेल्या शिळ्या भातात लोहाचं प्रमाण सुमारे ७० टक्क्यांनी वाढत असल्याचं आढळलं. त्याच प्रमाणे या भातातील सोडियम, पोटॅशियम तसंच कॅल्शियमचं प्रमाणही वाढतं. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे या भातातील फायबर्समुळे बध्दकोष्ठता तसंच अल्सरसंबंधी त्रास कमी होण्यास मदत होते, असं संशोधकांचं म्हणणं आहे. शिळ्या भाताचे हे आरोग्यदायी लाभ अवश्य लक्षात घ्यायला हवेत.

जाणून घ्या — सिटी ऑफ जॉय

मुलांनो, आपल्या देशातलं प्रत्येक शहर वेगळं आहे. तिथले खाद्यपदार्थ, पर्यटनस्थळं यात विविधता आढळते. चला तर मग सिटी ऑफ जॉय म्हणजेच कोलकाताची माहिती घेऊ.

* १९११ पर्यंत कलकत्ता म्हणजे आजचं कोलकाता ही भारताची राजधानी होती. व्यापाराच्या दृष्टीने या शहराचं बरंच महत्त्व असल्यामुळे ब्रिटिशांनी कोलकात्याला राजधानीचा दर्जा दिला होता. * कोलकात्यातल्या लोकांना फूटबॉल प्रचंड आवडतं. मात्र क्रिकेटवरही त्यांचं प्रेम आहे. * दक्षिणेश्वर काली मंदिर, व्हिक्टोरिया मेमोरियल, मार्बल पॅलेस, फोर्ट विलियम आणि हावडा ब्रिज ही कोलकात्यातली महत्त्वाची पर्यटनस्थळं आहेत. * कोलकाता हे खवय्यांचं शहर आहे. इथे चविष्ट बंगाली मिठाया मिळतात. तसंच माछेर झोल, मिष्ठी दही, गोलगप्पा इथे आवडीने खाल्ले जातात. * कोलकात्यात पुस्तक महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवाला लोक मोठ्या संख्येने येतात. असं हे कोलकाता पश्चिम बंगालची राजधानी आहे. देशातल्या चार महानगरांमध्ये कोलकाताची गणना होते.

फॅशन पॅशन

पुढच्या काही दिवसात थंडी सुरू होणार आहे. सध्या मोनोक्रोम लूकही चलती असली तरी थंडीच्या या दिवसात तुम्ही निरनिराळ्या प्रिंट्स ट्राय करू शकता. थंडीसाठी शॉपिंग करण्याच्या विचारात असाल तर या प्रिंट्सचा नक्की विचार करा.

* पोलका डॉट हा प्रकार चांगलाच इन आहे. मुलीच नाही तर मुलंही पोलका डॉट कॅरी करू शकतात. वेगवेगळ्या ऑकेजन्सला पोलका डॉटवाले शर्ट आणि टी शर्ट कॅरी करता येतील. अगदी कामाला जातानाही पोलका डॉटवाला शर्ट घालता येईल. पण यासाठी शर्टवरचे पोलका डॉट्स छोट्या आकाराचे असावेत. (क्रमश:)

डाएट अँड न्यूट्रिशन — कसं खावं सॅलड?

सॅलड खाण्याच्या ठराविक पद्धती आहेत. सॅलड खाण्याची योग्य पद्धत कोणती? जाणून घेऊ.

* काकडी, टोमॅटो, मुळा, बीट, लेट्यूस, गाजर, यांचा वापर सॅलड म्हणून केला जातो. सॅलडमध्ये फायबर म्हणजे तंतूमय पदार्थांचं प्रमाण बरंच जास्त असतं. फायबरमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. त्यामुळे जेवणाच्या तासभर आधी सॅलड खायला हवं. यामुळे जेवताना कमी भूक लागेल आणि शरीरात कर्बोदकं कमी प्रमाणात जातील. * सॅलडमध्ये नेहमीच्या मिठाऐवजी काळं किंवा सैंधव मीठ घालावं. * फ्रूट सॅलड जेवणानंतर खाल्लं जातं. मात्र फ्रूट सॅलड जेवणाआधी किंवा नंतरही खाऊ नये. दोन जेवणांच्या मध्ये फ्रूट सॅलड खाता येईल. जेवणाआधी किंवा नंतर फ्रूट सॅलड खाल्ल्यामुळे रक्तातल्या शर्करेचं प्रमाण अचानक वाढतं. यामुळे त्रास होऊ शकतो. तसंच फ्रूट सॅलडऐवजी फळ खाणं अधिक योग्य ठरतं. * मोड आलेली कडधान्यंही सॅलड म्हणून खाल्ली जातात. हे सॅलड मधल्या वेळचं खाणं म्हणून योग्य ठरतं. यात काकडी, कांदा, टोमॅटो घालून खाता येईल. * सॅलडवर क्रीम ड्रेसिंग किंवा मायोनिज सॉस घालू नये. तसंच चाट मसालाही घालू नये.

पंचांग

रविवार, १५ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, कार्तिक शु. ६, चंद्रराशी : मकर, नक्षत्र : उत्तराषाढा, योग : गंड, सूर्योदय ६.४८, सूर्यास्त ५.५८

फॉरवर्ड्स

ज्यादातर लोगो का..
ब्लड तो पॉजिटिव होता है...!

लेकिन...
सोच निगेटिव...!

करिअरवाटा — कॅम्पस इंटरव्ह्यूतील यशासाठी...

आजकाल मनाजोगी नोकरी मिळवण्यासाठी वा आवडत्या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी पूर्वीपासून प्रचलित असलेले प्रयत्न गरजेचे ठरत नाहीत. त्यासाठी काही नव्या गोष्टी जाणून घेणं गरजेचं आहे. विशेषत: आजकाल कॅम्पस इंटरव्ह्यू या नावानं परिचीत असणाऱ्या या संकल्पनेला



विद्यार्थी वर्गाचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असल्याचं दिसून येतं. दुसरीकडे जाऊन अर्ज देणं, मुलाखतीसाठी जाणं यात पैसा तसंच वेळ वाया जातो. त्याऐवजी कॉलेजच्या आवारातच नोकरीच्या संधी उपलब्ध होणं महत्त्वाचं ठरतं. मात्र, या मुलाखतीसाठी आवश्यक तयारी गरजेची ठरते. आत्मविश्वास, उत्तम संवादकौशल्य तसंच देहबोली आणि सकारात्मकता या बळावर मुलाखतीत यश मिळणं शक्य होतं. शिवाय कारकिर्द करण्याची इच्छा असणाऱ्या क्षेत्राची नीट माहिती असावी. कारण कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये त्या क्षेत्राशी संबंधित प्रश्न आवर्जून विचारले जातात. अशा मुलाखतींमध्ये तुमच्या वीक पॉईंट्सबद्दल विचारलं जाण्याची शक्यता असते. त्याविषयी संकोच न करता मोकळेपणाने बोलणं हितावह ठरतं. या मुलाखतींमध्ये अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्न विचारले जातात. शिवाय तुम्ही कोणत्या विषयात कमी पडता हे पाहिलं जातं. अशा वेळी उत्तरं देताना आत्मविश्वास कामी येतो. या साऱ्या बाबी लक्षात घेतल्यास कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये यश सोपं जाईल.

खेचाखेची — पार्किंग

संता आपल्या रिक्षाचे एक चाक काढत होता.

ते पहाणाऱ्या एकाने त्याला विचारले, संता, असं का करतोय?

संता त्याला रागावून म्हणाला, दिसत नाही का? इथे पार्किंग फक्त दोन चाकी वाहनांसाठी आहे.

वेगळं काही

इंजिनिअरींगची पदवी मिळवणं सोपं नाही. बरीच मेहनत करून प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर इंजिनिअरींगला प्रवेश मिळतो. बारावीनंतर इंजिनिअरींगला प्रवेश घेता येतो. पण बेल्जियमच्या नऊ वर्षांच्या लॉरेन्स सिमन्सने इंजिनिअरींगला प्रवेश घेतला. तो जगातला इंजिनिअरींचा सर्वात लहान वयाचा विद्यार्थी असल्याचं बोललं जातं. त्याला डिसेंबरमध्ये इंजिनिअरींगची पदवी मिळेल. त्याने लॉरेन्स इंडोवन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीमधून शिक्षण घेतलं. लॉरेन्सचा आयक्यू १४५ आहे. त्यामुळे शिक्षकांनी शिकवलेलं त्याच्या डोक्यात अगदी सहज शिरतं. लॉरेन्सच्या हुशारीबद्दल आपल्याला सासू-सासऱ्यांकडून कळल्याचं त्याची आई लेडिया सांगते.

सौंदर्यसाधना — लिपस्टिकची परफेक्ट निवड

हल्ली महिलावर्गात सौंदर्यप्रसाधनांचा वापर बराच वाढला आहे. ब्युटी पार्लरमध्ये महिलांची गर्दी वाढतानाच घरच्या घरी मेकअप करणाऱ्या महिलांची संख्याही अधिक आहे. यात लिपस्टिकशिवाय मेक अप पूर्ण होत नाही. बाजारात लिपस्टिकचे अनेकविध प्रकार मिळतात. मॅट, ग्लॉसी, शायनी, लिक्विड आदींमधून परफेक्ट शेड निवडताना गोंधळ उडतो. आपल्या चेहऱ्याला, रंगाला साजेशी लिपस्टिक हवी. यासाठीचा हा कानमंत्र लक्षात घ्यावा.



* बाजारात क्रीम, मॅट, फ्रॉस्ट फिनिश, शिमर असे प्रकार मिळतात. यापैकी कोणती लिपस्टिक निवडवी हे ठरवा.

* लिपस्टिक निवडताना ओठांची रचना आणि त्वचेचा रंग या महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्या. लिपस्टिकचा रंग ओठांवर प्रभाव टाकतो. डीप शेडमुळे ओठ मोठे दिसतात तर ब्राईट शेडमुळे लहान वाटतात.

* आपल्याला प्रत्येक शेड शोभून दिसतेच असं नाही. त्यामुळे खरेदी करण्याआधी लिपस्टिक ट्राय करून बघा. तुम्हाला टेस्टर्स दाखवले जातात. ते ओठांवर लावू नका. यामुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो. न्यूड शेड्च्या लिपस्टिक्स ऑनलाईन खरेदी करू नका. त्यातले घटक तपासून घ्या. पेराबेन्सयुक्त उत्पादन घेऊ नका.

सुडोकू १७५


८		९	१					
	५			८			४	६
			३				१	८
			५		९		२	४
९		८		४		१		५
७	४		८		१			
६	९				७			
४	१			३			६	
					६	४		९

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत

सुडोकू १७४ चे उत्तर

७	३	५	१	६	४	२	९	८
८	९	२	५	७	३	६	४	१
१	४	६	८	९	२	५	३	७
९	५	३	७	४	८	१	६	२
६	८	१	९	२	५	३	७	४
४	२	७	६	३	१	९	८	५
३	६	८	२	५	७	४	१	९
२	७	४	३	१	९	८	५	६
५	१	९	४	८	६	७	२	३

शब्दकोडे क्रमांक १७५



आडवे शब्द :-
१) कृष्णपक्षात मंगळवारी येणारी चतुर्थी
४) सभेत लोकांसमोर न घाबरता बोलणारा
८) एकूणएक सर्व
११) छोटी लढाई
१२) पळून जाणे
१४) मासा पकडण्याचे एक साधन
१५) दारावरील खुणेचा आवाज
१८) नांगराची ओळ
२०) ताजमहालाचा दगड
२१) अंदाज, तर्क
२२) पत्र
२४) अट, परंतु
२५) मध्यान्ह
२६) शूर
२७) वारण, कुंजर
२८) जयघोष
३२) उसाचे पीक, रिकामपण
३३) व्रत
३४) नमस्कार
३५) मृत्यू नसलेला
३७) निकट
३९) चंद्र
४०) रामदासस्वामींनी लिहिलेला ग्रंथ
४२) घाव, आघात
४३) घनदाट अरण्य
४५) भविष्यकथनाचा एक प्रकार
४७) मुख्य पुरुष(फारसी)
४८) मत्स्य
४९) घसा
५१) आरोप
५२) आंबट, तुरट चवीचे छोटे फळ
५३) स्वयंपाकी
५४) वायु, वैताग
५५) बनारस
५६) भेदता न येणारे
५७) सरिता
५९) राष्ट्र
६०) एक विटेची भिंत
६१) हुक्की, लहर
६३) मिठी
६५) सामना गाजविणारा खेळाडू
६७) एक ज्वालाग्रही पदार्थ
६८) कुटण्याचे घरगुती जोड साधन
६९) मगज
७०) संतोष, आनंद

उभे शब्द :-
२) गवई
३) बांबू
४) रणक्षेत्र
५) शपथ,
६) गाडीचे छत
७) कावळा
९) कापड विणण्याचे साधन
१०) वांतीपूर्वीची अवस्था
१३) मिंधा
१५) प्रफुल्लित
१६) डोक्याचा केशविरहित भाग
१७) भारताचा नागरिक
१९) पादत्राण
२०) धनदौलत
२१) पुष्कळ
२३) ओटा, कट्टा
२५) दुकानाचा मालक
२७) स्त्रीभूत
२८) ज्या प्रमाणे
२९) ** गण ** आपले राष्ट्रगीत
३०) मृत्युदेवता
३१) चानी
३२) जाणे येणे, राबता, शेत
३३) कापड
३५) कमी बोलणारा
३६) पुष्परस
३७) आगबोट
३८) पर्जन्यकाळ
३९) समारंभ
४१) अगदी सारखे प्रमाण
४२) फसवणूक
४४) आकाशाला भेदणारा
४६) जाणता अजाणता
४८) आईची बहीण
५०) खानेसुमारी
५१) कुंभाराची भट्टी
५२) नभ
५६) सुपारी कातरण्याचे साधन
५८) दिवा
५९) परमेश्वर
६१) युद्ध
६२) काव्य करणारा
६३) उकळी
६४) कातडी
६५) लाकडाची एक जात
६६) आवड, द्रवपदार्थ
६७) कृष्णसखी

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

मं	द	वा	स	र			मो	र		स	र	स	क	ट
ग	र	ज		ज	ल	द		ति	क	डे		र	ब	र
ळ		त	र्ज	नी		ल	गा	म		तो	क	डा		फ
वा	ड	गा		श	र	द		द	ग	ड			का	ल
र		ज	ल		ज	ल	या	न			स	क	ल	
	वा	त	हा	र	क		ता		रा			र	व	ण
स	र		न	ग		ज	या	अं	गी	मो	ठे	प	ण	
क	स	क	स		प	र	त		ट		च	णे		स
स	दा		हा	तो	हा	त		गो		बो	का		स	म
	र	त	न		ट	र	का		स	र	ळ		म	स्त
न		या		मी			ज	वा	न		णे		क	
क	द	र	दा	न		आ	वा		ग	ज		रा	क्ष	स
ला	वा		भ		ता	रा		त	र	त	री	त		रो
का		म	ण	का		ध		न		ना		सा	क	व
र	य	त		या	त	ना	म	य		मा	स्त	र		र

मुलांना घडवायचे की केवळ नियंत्रित करायचे?



सुनील गवळी

प्रेम, संवाद, समजूतदारपणा आणि स्वातंत्र्य तसेच जबाबदारी यातून सक्षम पिढी घडविण्याचा प्रवास म्हणजे संतुलित शिक्षण मुलांचे संगोपन ही केवळ त्यांना चांगल्या सवयी लावण्याची किंवा शिस्त शिकवण्याची प्रक्रिया नाही, तर त्यांच्या मनाचा, विचारांचा, भावनांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्याची एक सर्जनशील जबाबदारी आहे. प्रत्येक पालकाला आपले मूल हुशार, यशस्वी, शिस्तप्रिय आणि समाजात प्रतिष्ठा मिळवणारे व्हावे असे वाटते. प्रत्येक शिक्षकाला आपले विद्यार्थी अभ्यासात प्रगती करावेत, आदर्श वर्तन करावे आणि जीवनात मोठे यश संपादन करावे असे वाटते. परंतु या सर्व अपेक्षांच्या प्रवासात एक मूलभूत प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे, की आपण मुलांना जीवन जगण्यास सक्षम बनवत आहोत की केवळ आपल्या अपेक्षांनुसार वागण्यास शिकवत आहोत?

मुलांच्या विकासातील सर्वांत मोठा विरोधाभास असा आहे की, त्यांना योग्य मार्ग दाखविण्याच्या प्रयत्नात आपण कधी कधी त्यांच्यासाठी विचार करतो; पण त्यांना स्वतः विचार करण्याची संधी देत नाही. त्यांच्यासाठी निर्णय घेतो; पण निर्णय घेण्याची क्षमता विकसित होऊ देत नाही. त्यांना चुका करू नयेत म्हणून सतत सावध करतो; परंतु चुकांमधून शिकण्याची संधी हिरावून घेतो. परिणामी, बाहेरून आज्ञाधारक दिसणारे मूल स्वतःच्या निर्णयांबाबत असुरक्षित बनू शकते, तर सतत विरोध करणारे मूल आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी संघर्ष करत असू शकते. प्रत्येक मुलाचा अनुभव वेगळा असतो; त्यामुळे त्याच्या वर्तनाचा अर्थ समजून घेण्याची तयारी असणे हीच खऱ्या संगोपनाची सुरुवात आहे.

मुलांचे वर्तन हा केवळ शिस्तीचा प्रश्न नसून त्यांच्या भावनिक जगाकडे जाणारा एक मार्ग आहे. एखादे मूल अभ्यास करत नाही, वारंवार रागावते, सूचना ऐकत नाही किंवा प्रत्येक गोष्टीला विरोध करते, तेव्हा आपण लगेच त्याला आळशी, हट्टी किंवा बेशिस्त ठरवतो. मात्र, त्या वर्तनामागे अभ्यास समजत नसणे, अपयशाची भीती, स्वतःकडून असलेल्या अवास्तव अपेक्षा, थकवा, भावनिक असुरक्षितता किंवा आपले म्हणणे कोणी ऐकत नसल्याची भावना असू शकते. अर्थात, प्रत्येक चुकीच्या वर्तनामागे एखादी अपूर्ण गरजच असते असे नाही; परंतु कारण समजून घेण्याचा प्रयत्न केल्याशिवाय केवळ शिक्षा देणे ही समस्या सोडविण्याची अपुरी पद्धत ठरते. वर्तनावर प्रतिक्रिया देण्यापूर्वी त्यामागील परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

घरामध्ये अनेकदा शिस्तीचा अर्थ आज्ञापालन असा घेतला जातो. मोठ्यांनी सांगितलेले प्रश्न न विचारता स्वीकारणे, स्वतःचे मत न मांडणे आणि प्रत्येक निर्णयाला होकार देणे म्हणजे चांगले वागणे, अशी समजूत निर्माण होते. परंतु खऱ्या अर्थाने शिस्त म्हणजे स्वतःच्या वर्तनाची जाणीव, निर्णयांचे परिणाम समजून घेण्याची क्षमता आणि योग्य जबाबदारी स्वीकारण्याची तयारी. मुलांना नियमांची आवश्यकता असते; मात्र नियमांचा उद्देश त्यांच्यावर सत्ता गाजवणे नसून त्यांना सुरक्षितता, दिशा आणि स्वनियंत्रण शिकवणे हा असला पाहिजे.

समजा, एखादे मूल नियमितपणे अभ्यासाची वेळ टाळते. पालक रागावतात, तुलना करतात आणि अभ्यास पूर्ण होईपर्यंत खेळण्यास मनाई करतात. काही वेळा या दबावामुळे मूल अभ्यासाला बसेलही; परंतु त्याला अभ्यासाचे नियोजन, अडचणींचे निराकरण किंवा स्वतःच्या वेळेची जबाबदारी शिकण्याची संधी मिळालीच असेल असे नाही. याउलट, पालकांनी शांतपणे त्याच्याशी संवाद साधला, त्याला कोणता विषय कठीण वाटतो हे विचारले आणि अभ्यासासाठी योग्य वेळ ठरविण्यात त्याचा सहभाग घेतला, तर समस्या सोडविण्याची प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण होऊ शकते. येथे पालकांनी आपली जबाबदारी सोडलेली नसते; त्यांनी केवळ आदेश देण्याच्या भूमिकेतून मार्गदर्शकाच्या भूमिकेकडे वाटचाल केलेली असते.

मुलाला निर्णयात सहभागी करून घेणे म्हणजे त्याला अमर्याद स्वातंत्र्य देणे नव्हे; तर स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीची जाणीव विकसित करणे होय. झोपण्याची वेळ, अभ्यासाचे नियोजन, स्क्रीनचा वापर, घरातील छोटी कामे आणि वैयक्तिक सवयी यांसारख्या बाबतीत वयानुसार योग्य पर्याय देता येतात. काही नियम मात्र सुरक्षिततेसाठी आणि आरोग्यासाठी निश्चित असणे आवश्यक असते. अशा वेळी नियम का आवश्यक आहेत, त्यांचे उल्लंघन झाल्यास काय परिणाम होतील आणि त्यांची अंमलबजावणी कशी होईल, हे मुलांना समजावून सांगावे. त्यामुळे नियम हे केवळ मोठ्यांच्या इच्छेचे प्रतीक न राहता परस्पर समजुतीतून स्वीकारलेली जबाबदारी बनतात.

मुलांच्या भावनिक विकासात पालक आणि शिक्षकांच्या प्रतिक्रियांना विशेष महत्त्व असते. मूल तीव्र रागात असताना त्याला मोठमोठे उपदेश करणे, त्याच्या भावना चुकीच्या ठरवणे किंवा त्याच्याकडून ताबडतोब तर्कशुद्ध वर्तनाची अपेक्षा करणे नेहमीच उपयोगी पडत नाही. तीव्र भावनेच्या क्षणी मुलाला आधी शांत होण्यासाठी वेळ, सुरक्षित वातावरण आणि समजून घेणारा संवाद आवश्यक असू शकतो. अशा वेळी, ''तुला खूप राग आला आहे, हे मला समजते. आपण थोडे शांत झाल्यावर याबद्दल बोलूया,'' असे म्हणणे उपयुक्त ठरू शकते. याचा अर्थ चुकीच्या वर्तनाला मान्यता देणे नव्हे. भावना स्वीकारता येतात; परंतु त्या व्यक्त करताना इतरांना दुखावणे किंवा नुकसान करणे योग्य नाही, ही मर्यादाही स्पष्ट केली पाहिजे.

याच ठिकाणी एक महत्त्वाचा फरक लक्षात घ्यावा लागतोभावना आणि वर्तन या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. राग येणे चुकीचे नाही; पण रागाच्या भरात मारहाण करणे चुकीचे आहे. निराश होणे स्वाभाविक आहे; परंतु निराशेमुळे प्रयत्नच सोडून देणे ही अडचण बनू शकते. मतभेद असणे गैर नाही; परंतु दुसऱ्याचा अपमान करून आपले मत मांडणे योग्य नाही. मुलांना या फरकाची जाणीव करून दिल्यास ते स्वतःच्या भावनांना नाकारण्याऐवजी त्यांचे नियमन करायला शिकतात. भावनिक परिपक्वतेचा अर्थ कधीच राग न येणे नसून रागाच्या वेळी योग्य कृती निवडता येणे हा आहे.

पालक आणि शिक्षकांनी मुलांबाबत वापरलेल्या शब्दांचाही विचार केला पाहिजे. ''तू काहीच करू शकत नाहीस'', ''तू नेहमी चुका करतोस'', ''तुझ्यात शिस्तच नाही'' किंवा ''तुझ्यापेक्षा अमुक मूल चांगले आहे'' अशी विधाने मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम करू शकतात. सततच्या टीकेमुळे काही मुले स्वतःबद्दल नकारात्मक समज तयार करतात, तर काही मुले टीकेपासून बचाव करण्यासाठी चुका लपवू लागतात. त्याऐवजी व्यक्तिमत्त्वावर शिक्षा मारण्याऐवजी विशिष्ट वर्तनावर बोलणे अधिक परिणामकारक ठरते. ''तू निष्काळजी आहेस'' असे म्हणण्याऐवजी ''आज गृहपाठ अपूर्ण राहिला आहे; तो पूर्ण करण्यासाठी आपण काय बदल करू शकतो?'' असे विचारता येते. पहिल्या विधानात व्यक्तीला दोष दिला जातो; दुसऱ्या विधानात समस्येवर उपाय शोधण्याची संधी असते.

प्रशंसेबाबतही अशीच सजगता आवश्यक आहे. मुलाला प्रत्येक वेळी केवळ ''तू खूप हुशार आहेस'' असे सांगण्यापेक्षा त्याने केलेला प्रयत्न, वापरलेली पद्धत, दाखवलेला संयम आणि चुका सुधारण्याची तयारी यांची दखल घ्यावी. उदाहरणार्थ, ''हा प्रश्न सोडवण्यासाठी तू वेगवेगळे मार्ग वापरलेस, हे चांगले केलेस,'' अशी प्रतिक्रिया मुलाला प्रक्रियेचे महत्त्व समजावते. यामुळे त्याचे संपूर्ण आत्ममूल्य एका परीक्षेतील गुणांवर किंवा इतरांच्या कौतुकावर अवलंबून राहण्याऐवजी प्रयत्न, शिकणे आणि प्रगती यांच्याशी जोडले जाण्यास मदत होऊ शकते.

शाळा ही केवळ ज्ञान मिळविण्याची जागा नाही; ती सामाजिक वर्तन, सहकार्य, मतभेदांचे निराकरण आणि स्वतःची जबाबदारी स्वीकारण्याचे प्रशिक्षण देणारी संस्था आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सांगण्याऐवजी विचार करण्यासाठी प्रश्न विचारले, गटामध्ये काम करण्याची संधी दिली आणि त्यांच्या मतांचा आदर केला, तर वर्गातील शिकण्याची प्रक्रिया अधिक सक्रिय होऊ शकते. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीचे उत्तर दिले, तर त्याची खिल्ली उडवण्याऐवजी त्याने असा विचार का केला, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. चुकीचे उत्तर हे कधी कधी विद्यार्थ्याच्या विचारप्रक्रियेची माहिती देणारे साधन ठरते. शिक्षकाचे काम केवळ चूक दाखविणे नसून योग्य समज विकसित करण्यासाठी विद्यार्थ्याला मदत करणे हेही आहे.

यासाठी शिक्षकांनी वर्गात प्रश्न विचारण्याची, मतभेद व्यक्त करण्याची आणि शंका मांडण्याची सुरक्षित संस्कृती निर्माण केली पाहिजे. विद्यार्थी प्रत्येक वेळी बरोबरच बोलतील अशी अपेक्षा ठेवण्याऐवजी ते प्रामाणिकपणे विचार करतील, आपले मत स्पष्ट करतील आणि नवीन माहितीच्या आधारे मत बदलण्याची तयारी दाखवतील, याला महत्त्व द्यावे. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ उत्तरपत्रिकेत योग्य उत्तरे लिहिणे नसून जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नांकडे विवेकाने पाहण्याची क्षमता विकसित करणे हा आहे. विद्यार्थ्यांनीही या प्रक्रियेत स्वतःची भूमिका ओळखली पाहिजे. आपल्या प्रत्येक अडचणीसाठी पालक किंवा शिक्षकांनीच उपाय शोधावा, अशी अपेक्षा ठेवण्याऐवजी स्वतःला काही प्रश्न विचारण्याची सवय लावावी. मला नेमकी कोणती अडचण येत आहे? मी आतापर्यंत कोणते प्रयत्न केले? माझ्या हातात काय आहे? कोणाची मदत घेता येईल? आज मी कोणते छोटे पाऊल उचलू शकतो? असे प्रश्न स्वतःला विचारल्याने समस्या अधिक स्पष्ट होतात आणि कृतीची दिशा मिळते. स्वतःच्या भावनांची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे सर्व समस्या एकट्याने सोडवणे नव्हे; गरज पडल्यास योग्य व्यक्तीची मदत मागणे हेसुद्धा परिपक्वतेचे लक्षण आहे.

याचबरोबर मुलांना अपयशाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रयत्न यशस्वी होईलच असे नाही. काही वेळा मेहनत करूनही अपेक्षित गुण मिळणार नाहीत, मित्रांशी मतभेद होतील, एखादी संधी हातातून निसटेल किंवा ठरवलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण होणार नाही. अशा वेळी मुलाला केवळ धीर देणे पुरेसे नसते; त्या अनुभवातून पुढे काय शिकता येईल, हे शोधण्यासाठी त्याला मदत करावी लागते. अपयशामुळे व्यक्तीची किंमत कमी होत नाही. अपयश ही परिस्थितीविषयी माहिती देणारी घटना असते. त्यातून पुढील प्रयत्नांची दिशा ठरवता येते. मात्र, प्रत्येक अपयशाकडे केवळ सकारात्मक म्हणून पाहण्याऐवजी त्यातील वास्तविक अडचणी, आवश्यक बदल आणि उपलब्ध मदत यांचेही वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले पाहिजे.

कुटुंब आणि शाळा यांच्यातील सुसंवाद या संपूर्ण प्रक्रियेला बळ देतो. घरी पालक मुलाला जबाबदारी शिकवत असतील आणि शाळेत त्याला केवळ भीतीच्या आधारे नियंत्रित केले जात असेल, तर त्याच्यासमोर परस्परविरोधी अनुभव निर्माण होऊ शकतात. त्याचप्रमाणे शाळेत सहकार्य शिकवले जात असेल; पण घरी प्रत्येक गोष्टीत तुलना केली जात असेल, तर मुलाच्या मनात गोंधळ निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पालक आणि शिक्षकांनी मुलाच्या गुणांबरोबरच त्याच्या भावनिक स्थिती, शिकण्याच्या अडचणी, सवयी आणि प्रगती यांविषयीही संवाद साधावा. दोषारोप करण्याऐवजी एकत्रितपणे उपाय शोधण्याची भूमिका स्वीकारावी.

आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक मूल एकाच गतीने शिकत नाही, प्रत्येकाला सारखी प्रेरणा मिळत नाही आणि प्रत्येकाची क्षमता एकाच क्षेत्रात प्रकट होत नाही. एखादे मूल अभ्यासात उत्कृष्ट असेल, तर दुसरे कला, क्रीडा, संवादकौशल्य, तांत्रिक काम किंवा सामाजिक सहकार्य यात चमकू शकते. सर्व मुलांना एकाच साच्यात बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची वैशिष्ट्ये दुर्लक्षित होऊ शकतात. मुलांच्या क्षमतांना योग्य दिशा देणे, आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि कमकुवत बाजूंवर संवेदनशीलतेने काम करणे हे पालक व शिक्षकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे.

शेवटी, मुलांचे संगोपन आणि शिक्षण यांचा केंद्रबिंदू भीती नसून विश्वास, अंध आज्ञापालन नसून समजूतदारपणा आणि केवळ बाह्य शिस्त नसून अंतर्गत जबाबदारी असली पाहिजे. नियम आवश्यक आहेत, पण त्यामागे कारणही असले पाहिजे. स्वातंत्र्य आवश्यक आहे, पण त्यासोबत मर्यादांची जाणीवही असली पाहिजे. प्रेम आवश्यक आहे, पण प्रेमाच्या नावाखाली प्रत्येक चुकीकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. शिस्त आवश्यक आहे, पण शिस्तीच्या नावाखाली मुलाच्या आत्मसन्मानाला धक्का पोहोचवणेही योग्य नाही. या सर्वांचा समतोल साधता आला, तर मुलांना स्वतःचा विचार करणारे, इतरांचा आदर करणारे आणि आपल्या कृतींची जबाबदारी स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास मदत होईल.

मुलांना आपल्या म्हणण्याप्रमाणे वागविणे हे तात्पुरते यश असू शकते; परंतु योग्य-अयोग्याचा विचार करून स्वतः योग्य निर्णय घेता येतील, अशी क्षमता विकसित करणे हे खऱ्या संगोपनाचे यश आहे. पालकांनी मुलांना समजून घेणारे कान द्यावेत, शिक्षकांनी विचारांना दिशा देणारे प्रश्न विचारावेत आणि विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विकासाची जबाबदारी स्वीकारावी. या तिन्ही घटकांनी एकमेकांशी स्पर्धा न करता परस्परांना पूरक ठरावे. कारण शेवटी समाजाला केवळ नियम पाळणारी पिढी नको आहे; समाजाला नियमांचे महत्त्व समजणारी, अन्यायाविरुद्ध विवेकाने उभी राहणारी, स्वतःच्या चुका मान्य करणारी आणि इतरांच्या भावनांचा आदर करणारी पिढी हवी आहे. अशा पिढीची निर्मिती केवळ उपदेशातून होत नाही. ती घडते घरातील संवादातून, वर्गातील वातावरणातून, शिक्षकांच्या वर्तनातून, पालकांच्या संयमातून आणि मुलांना दिलेल्या विचारस्वातंत्र्यातून.

मुलांना नियंत्रित करण्यापेक्षा त्यांना समजून घ्या; त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला गप्प करण्याऐवजी विचार करण्याची दिशा द्या; त्यांच्या चुका मोजण्यापेक्षा त्या सुधारण्याची क्षमता विकसित करा. कारण मुलांच्या हातात भविष्य देण्यापूर्वी त्यांच्या मनात विचारांची ताकद, हृदयात संवेदनशीलता आणि कृतीत जबाबदारी रुजवणे अधिक महत्त्वाचे आहे. ●

आभासी दिखावा की नात्यांचा ओलावा?

चला, आपल्या मुलांकडे परतूया...!

धनंजय शेटये



''बाबा, बघा ना! आज तुमचे किती देखणे छायाचित्र 'स्टेटस'ला ठेवले आहे...''

वडिलांच्या चेहऱ्यावर मात्र कौतुकापेक्षा एक हळवी खंत तरळली. ते शांतपणे म्हणाले, ''बाळा, आज माझा वाढदिवस आहे. चार प्रेमाचे शब्द माझ्यासमोर बसून बोलला असतास, तर मला त्याचा अधिक आनंद झाला असता. मला या आभासी शुभेच्छा नकोत रे! आम्ही काय तुला एखाद्या 'ॲप'मधून डाऊनलोड केले आहे का?'' या एका वाक्यातून आजच्या बदलत्या नातेसंबंधांचे विदारक वास्तव किती प्रभावीपणे अधोरेखित होते! आज हेच चित्र घरोघरी पाहायला मिळते. एकाच छताखाली राहूनही मनामनांतील अंतर मात्र कोसो दूर गेले आहे. समोर बसलेल्या आई-वडिलांना प्रेमाने ग्लासभर पाणी देण्याची ज्यांना उसंत नाही, तीच मंडळी समाजमाध्यमांवर 'मदर्स डे' आणि 'फादर्स डे'च्या निमित्ताने भावनांचा पूर आणत नात्यांचे आभासी प्रदर्शन मांडताना दिसतात. तासन्तास भ्रमणध्वनीच्या (मोबाईलच्या) पडद्यावर फिरणाऱ्या बोटांना आता माणसांच्या स्पर्शातील ऊब, संवादातील गोडवा आणि आपुलकीच्या शब्दांतील ओलावा पारखा झाला आहे.

खरे तर, आपली भारतीय संस्कृती ही नात्यांची, कृतज्ञतेची आणि संस्कारांची अक्षय्य गंगोत्री आहे. जन्मदात्यांपासून गुरूजनांपर्यंत, निसर्गापासून समाजापर्यंत प्रत्येकाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे संस्कार आपल्या परंपरेत पूर्वापार रुजलेले आहेत. मग या संस्कारांचा अमृतकुंभ आपल्या अंगणात असताना, पाश्चात्त्य अंधानुकरणाच्या मृगजळामागे धावण्याचा हा अट्टहास कशासाठी?

आईच्या वात्सल्याची महती सांगणारी 'मातृनवमी' आणि मातृशक्तीचा गौरव करणारी आपली परंपरा असताना 'मदर्स डे'च्या दिखाव्याची गरज तरी काय? ज्ञानदानाचे ऋण व्यक्त करण्यासाठी 'गुरुपौर्णिमेसारखा' पवित्र दिवस असताना 'टीचर्स डे'च्या औपचारिकतेचे प्रयोजन काय? बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचा धागा जपणारे 'रक्षाबंधन' आणि 'भाऊबीज' आपल्या संस्कृतीत असताना 'सिस्टर्स डे' आणि 'ब्रदर्स डे'च्या आभासी उत्सवांची आवश्यकता काय? आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारी 'धन्वंतरी जयंती' आणि सृजन, कौशल्य व श्रमांचा गौरव करणारी 'विश्वकर्मा जयंती' असताना वेगळ्या दिवसांच्या औपचारिकतेचा सोस कशासाठी? कन्यापूजनातून स्त्रीशक्तीचा सन्मान करणारे 'नवरात्र', निसर्गाशी नाते सांगणारी 'आवळीनवमी' आणि 'तुळशीविवाहासारख्या' परंपरा आपल्या संस्कृतीचे वैभव असताना पर्यावरण संवर्धनाच्या केवळ औपचारिक सोहळ्यांवर समाधान का मानायचे? मकरसंक्रांतीचा स्नेहगोडवा, गणेशोत्सवाचा सामूहिक उत्साह, दसऱ्याचे सोनेरी औदार्य आणि दिवाळीचा मांगल्यपूर्ण प्रकाश... आपला प्रत्येक सण हा केवळ आनंदोत्सव नाही, तर माणसांना माणसांशी जोडणारा, नात्यांना नवी पालवी फोडणारा आणि निसर्गाशी आपले ऋणानुबंध दृढ करणारा संस्कारसोहळा आहे. आपल्या सण-उत्सवांच्या मुळाशी केवळ धार्मिकता नाही, तर कुटुंबव्यवस्था, सामाजिक बांधिलकी, सहजीवन आणि कृतज्ञतेची उदात्त भावना दडलेली आहे.

आज मात्र आभासी माणसांचे चेहरे धूसर होत चालले आहेत. शुभेच्छांचे संदेश हजारोंच्या संख्येने पाठवले जातात; पण एखाद्याच्या दुःखात सहभागी होण्यासाठी चार पावले चालण्याची तयारी दिसत नाही. वाढदिवसाला समाजमाध्यमांवर शुभेच्छांचा वर्षाव होतो; मात्र वृद्ध आई-वडिलांच्या डोळ्यांतील मूक अपेक्षा ओळखण्यासाठी क्षणभरही उसंत मिळत नाही. नात्यांचे अस्तित्व केवळ कोरड्या शब्दांत, छायाचित्रांत आणि 'स्टेटस'मध्येच उरले आहे; प्रत्यक्ष जगण्यातला जिव्हाळा मात्र हळूहळू हरवत चालला आहे.

अगदी दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, आज आपलेपणाचे अश्रूही आटत चालले आहेत. जिवंतपणी माणसांच्या सुख-दुःखात सहभागी न होणारी माणसे, स्मशानभूमीतही डोळ्यांच्या कडा ओलावतील इतकी आत्मीयता जपू शकत नाहीत, ही आपल्या संवेदनशील समाजासाठी अत्यंत चिंतेची बाब आहे.

म्हणूनच आता थोडे थांबण्याची, आत्मपरीक्षण करण्याची आणि आपल्या मुळांकडे परतण्याची वेळ आली आहे. आभासी जगातील पोकळ दिखावा बाजूला सारून आपल्या सांस्कृतिक सण-उत्सवांच्या निमित्ताने एकत्र येऊया. आई-वडिलांच्या सहवासातील अमूल्य क्षण जपूया. नाती केवळ भ्रमणध्वनीच्या पडद्यावर नाही, तर मनाच्या गाभाऱ्यात जिवंत ठेवूया. प्रत्यक्ष भेटूया, सुख-दुःख वाटून घेऊया, प्रेमाचे दोन शब्द बोलूया आणि आपल्या पुढच्या पिढीला संस्कारांचा समृद्ध वारसा देऊया. कारण, नाती 'स्टेटस'वर झळकवून मोठी होत नाहीत, ती प्रेमाने जगली की समृद्ध होतात! शुभेच्छांच्या संदेशांपेक्षा मायेचा स्पर्श लाखमोलाचा असतो आणि आभासी जगातील हजारो मित्रांपेक्षा संकटसमयी खांद्याला खांदा लावून उभे राहणारे आपले माणूस अधिक मोलाचे असते.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते...

आभासी जगात हरवण्यापेक्षा
वास्तवातील माणसे जपूया...
दिखाव्यापेक्षा जिव्हाळ्याला महत्त्व देऊया...
परंपरांचा केवळ अभिमान न बाळगता
त्या आचरणात आणूया...
आणि आपल्या समृद्ध संस्कृतीचा वारसा
पुढच्या पिढीकडे अभिमानाने सोपवूया!

कारण, काळ कितीही बदलला, तरी नात्यांमधील ओलावा कधीच आटता कामा नये! ●

चला, मराठी शिकण्याचा प्रवास पुन्हा सुरू करूया!

विजयकुमार कट्टी

अक्षरांपासून साहित्यापर्यंत...

स्वतःला व्यक्त करण्याचा एक नवा प्रयत्न आपण मराठी बोलतो, वाचतो आणि लिहितो. आपल्या दैनंदिन व्यवहारात मराठीचा सहज वापरही करतो. मात्र, कधी स्वतःला विचारले आहे का, आपण मराठी भाषा खरोखर समजून घेतली आहे का? एखादा शब्द लिहिताना चूक का होते, एखादे वाक्य अपेक्षित अर्थ का व्यक्त करू शकत नाही किंवा एखाद्या साहित्यकृतीतील शब्दांच्या पलिकडचा भाव आपल्याला का समजत नाही?

अशाच काही साध्या प्रश्नांनी माझ्या मनात मराठी भाषेचा अभ्यास नव्याने करण्याची प्रेरणा निर्माण केली.

गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती आणि नागरिकांच्या सहभागातून विविध उपक्रम राबवण्याचे काम मी करत आलो आहे. या कामातून मिळालेले अनुभव, निरीक्षणे आणि शिकवण नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वृत्तपत्रांमधूनही सातत्याने लिहित आलो आहे. पर्यावरणापासून पाणी, कचरा, प्लास्टिक, जैवविविधता आणि नागरिकांची सामाजिक जबाबदारी अशा अनेक विषयांवर लिहिताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली एखादा विचार कितीही महत्त्वाचा असला, तरी तो योग्य भाषेत आणि समोरच्या व्यक्तीला समजेल अशा पद्धतीने मांडता आला तरच त्याचा खरा उपयोग होतो.

या प्रवासात अनेक वाचकांनी माझ्या कामाला प्रतिसाद दिला. काहींनी सूचना केल्या, काहींनी चुका दाखवून दिल्या, काहींनी मार्गदर्शन केले, तर अनेकांनी नव्या विषयांवर लिहिण्यासाठी प्रोत्साहन दिले. माझ्या पर्यावरणविषयक उपक्रमांपासून ते वृत्तपत्रीय लेखांपर्यंत मिळालेला हा पाठिंबा माझ्यासाठी नेहमीच प्रेरणादायी राहिला आहे. अनेकदा वाचकांच्या एका प्रतिक्रियेतूनही नव्या विचाराची दिशा मिळाली. आज याच वाचकांसमोर मी एका वेगळ्या विषयासह येत आहे.

पर्यावरणातून भाषेकडे... एक नवा अभ्यासप्रवास

पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करताना अनेकदा असे अनुभव आले की, चांगले संशोधन, अभ्यासपूर्ण संकल्पना आणि योग्य उपाय उपलब्ध असूनही त्यांची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणे होत नाही. त्यामागे केवळ साधनसंपत्तीची कमतरता नसते; अनेकदा योग्य संवाद, विषयाचे आकलन आणि लोकांपर्यंत विचार पोहोचवण्याची पद्धतही महत्त्वाची ठरते.

यातूनच भाषेचे महत्त्व अधिक खोलवर जाणवू लागले. आपण काय सांगतो याइतकेच ते कसे सांगतो, हेही महत्त्वाचे आहे. लेखन करताना शब्दांची निवड, वाक्यरचना, अर्थाची स्पष्टता आणि वाचकांशी निर्माण होणारा संवाद या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. माझ्या स्वतःच्या लेखन प्रवासातही अनेक चुका झाल्या. काही वेळा वाक्य अपेक्षित अर्थ व्यक्त करू शकले नाही, काही वेळा शब्दांची निवड सुधारण्याची गरज जाणवली, तर काही वेळा एखादी गोष्ट अधिक सोप्या पद्धतीने सांगता आली असती, असे लक्षात आले. या अनुभवांकडे केवळ चुका म्हणून न पाहता त्यातून शिकण्याची संधी म्हणून पाहण्याचा प्रयत्न केला.

याच विचारातून मराठी भाषेच्या आकलनासाठी एका क्रमबद्ध अध्ययन साहित्याची निर्मिती करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

अक्षरांपासून साहित्यापर्यंत...

या पुस्तक मालिकेचा प्रवास अगदी मूलभूत गोष्टींपासून सुरू होतो. अक्षरांची ओळख, स्वर आणि व्यंजने, बाराखडी, मात्रा, जोडाक्षरे, शब्दरचना, वाक्यरचना, व्याकरण, शब्दांचे अर्थ, भाषेतील बारकावे आणि साहित्याचे आकलन अशा परस्परांशी जोडलेल्या टप्प्यांतून वाचकाला पुढे नेण्याचा प्रयत्न आहे.

यामध्ये केवळ नियम आणि व्याख्या सांगण्यापेक्षा एखादी गोष्ट कशी समजून घ्यावी, तिच्यामागील कारण काय आहे आणि तिचा व्यवहारात उपयोग कसा करावा, यावर भर दिला आहे.

या मालिकेचे वैशिष्ट्य म्हणजे शिकण्याची सुरुवात प्रश्नांपासून करण्याचा प्रयत्न. एखादे अक्षर, शब्द किंवा वाक्य आपल्याला काय सांगते, त्याचा अर्थ संदर्भानुसार कसा बदलतो, एखादी चूक का होते आणि ती सुधारण्यासाठी आपण काय करू शकतो, याचा शोध वाचकाने स्वतः घ्यावा, अशी रचना आहे.


ही मालिका केवळ शालेय विद्यार्थ्यांसाठी मर्यादित नाही. विद्यार्थी, शिक्षक, पालक, महाविद्यालयीन तरुण, नोकरदार आणि अनेक वर्षांनंतर पुन्हा मराठी लेखनाकडे वळू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी ती उपयुक्त ठरावी, अशी अपेक्षा आहे. वय किती आहे यापेक्षा शिकण्याची इच्छा आणि प्रश्न विचारण्याची तयारी अधिक महत्त्वाची आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांमुळे भाषेचा अभ्यास करण्याच्या अनेक नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शुद्धलेखन तपासणे, वाक्यरचना सुधारणे, शब्दांचे अर्थ समजून घेणे आणि लेखनाचे मूल्यमापन करणे अधिक सोपे झाले आहे. मात्र, एखादे साधन आपली चूक दुरुस्त करते म्हणून आपल्याला भाषा समजली असे होत नाही. चूक का झाली, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे या अध्ययन मालिकेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सहाय्यक म्हणून करण्याचा विचार आहे; स्वतंत्र विचारशक्तीची जागा त्याला देण्याचा नाही. या अध्ययन साहित्याच्या निर्मितीच्या प्रवासात मनोज सुमन शिवाजी सानप यांचे सहकार्य आणि प्रोत्साहन मोलाचे ठरले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. कोणत्याही ज्ञानप्रवासात योग्य वेळी मिळालेले प्रोत्साहन पुढे जाण्याची नवी उमेद देते, याचा अनुभव या निमित्ताने आला.

प्रत्येक प्रकरण तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न!

या पुस्तक मालिकेतील प्रत्येक विभाग आणि प्रत्येक प्रकरण स्वतंत्रपणे समजून घेता यावे, यासाठी अध्ययन साहित्य पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा माझा मानस आहे. संपूर्ण पुस्तक मालिकेची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. आपल्याला ज्या विषयात किंवा प्रकरणात विशेष रुची आहे, त्यापासूनही आपण सुरुवात करू शकता. गेल्या काही वर्षांत माझ्या पर्यावरणविषयक कामांना आणि वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झालेल्या लेखांना आपण दिलेला प्रतिसाद, केलेले मार्गदर्शन, सूचना आणि प्रोत्साहन मी विसरू शकत नाही. माझ्या विचारांशी सहमत असो वा नसो, अनेकांनी आपले मत व्यक्त केले. त्यातून माझे विचार अधिक स्पष्ट झाले आणि कामाकडे पाहण्याची दृष्टी अधिक व्यापक झाली. आज मराठी भाषेच्या अध्ययन साहित्याच्या माध्यमातून मी एका नव्या क्षेत्रात पाऊल टाकत आहे. या विषयातही मला आपल्याकडून अशाच सहकार्याची अपेक्षा आहे. आपण ही प्रकरणे वाचावीत, त्यातील चुका किंवा त्रुटी निदर्शनास आणाव्यात, आवश्यक त्या सुधारणा सुचवाव्यात आणि आपल्या अनुभवातून मार्गदर्शन करावे, अशी मनापासून विनंती आहे. आपण शिक्षक असाल तर आपल्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने याचे मूल्यमापन करा. पालक असाल तर मुलांना यातून काय शिकता येईल, हे पाहा. विद्यार्थी असाल तर आपल्या शंका आणि प्रश्न मोकळेपणाने मांडा. मराठी भाषेवर प्रेम कर

जननायक बिरसा मुंडा!

१५ नोव्हेंबर हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीचा दिवस. ब्रिटिशांच्या अन्यायकारक सत्तेविरुद्ध आदिवासी समाजाला संघटित करून जल, जंगल आणि जमिनीच्या हक्कांसाठी त्यांनी मोठा लढा उभारला. अत्यंत कमी आयुष्य लाभूनही त्यांनी केलेले कार्य भारतीय इतिहासात अजरामर झाले आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त विशेष लेख



जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील रांची परिसरातील उलिहातू या गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगना मुंडा, तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या गरीब होते. घरची परिस्थिती असूनही त्यांना शिक्षणाची होती. त्यांनी सालगा प्राथमिक शिक्षण घेतले. चाईबासा येथील शाळेत १८८६ ते काळात शिक्षण घेतले. इंग्रजी शिक्षण घेत असतानाही त्यांना आपल्या आदिवासी संस्कृतीचा आणि परंपरांचा अभिमान होता.

बिरसा मुंडा यांचे बालपण आदिवासी समाजावर होणारा अन्याय आणि शोषण पाहण्यात गेले. ब्रिटिश राजवटीत आदिवासींच्या पारंपरिक जमिनी आणि जंगलांवरील हक्क हिरावून घेतले जात होते. जमीनदार, सावकार आणि जहागीरदार आदिवासींचे आर्थिक शोषण करत होते. जंगलातून लाकूड, फळे, कंदमुळे आणि जनावरांसाठी चारा मिळविण्यावरही अनेक बंधने आली होती. ब्रिटिशांच्या वनविषयक धोरणांमुळे आदिवासींच्या पारंपरिक जीवनपद्धतीवर मोठा परिणाम झाला. त्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला होता. आदिवासींच्या या हालअपेष्टा पाहून बिरसा मुंडा अस्वस्थ झाले. आदिवासी समाजाला त्याच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे काम त्यांनी सुरू केले. १८९४-९५ च्या सुमारास त्यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी जनजागृती केली. दुष्काळ आणि साथीच्या आजारांच्या काळात त्यांनी गरजू आदिवासी बांधवांना मदत केली. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजात त्यांच्याविषयी आदर आणि विश्वास निर्माण झाला.

ब्रिटिश सरकार आणि जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविल्यामुळे १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. त्यांना दोन वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. हजारीबागच्या तुरुंगात शिक्षा भोगल्यानंतर १८९७ मध्ये त्यांची सुटका झाली. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा आदिवासी समाजाला संघटित करण्याचे काम सुरू केले.

बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात सामाजिक आणि धार्मिक जागृती निर्माण करण्यासाठीही प्रयत्न केले. त्यांनी 'बिरसाईत' या धार्मिक-सामाजिक चळवळीची सुरुवात केली. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता आणि सामाजिक अनिष्ट प्रथांपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. आदिवासींनी आपली संस्कृती, परंपरा आणि अस्मिता जपावी, असा संदेश दिला. त्यांच्या विचारांमुळे आदिवासी समाजामध्ये नवी चेतना निर्माण झाली. त्यांचे अनुयायी त्यांना 'धरती आबा' म्हणजेच धरतीचा पिता असे संबोधू लागले.

१८९९ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध मोठे आंदोलन उभे राहिले. या आंदोलनाला 'उलगुलान' म्हणजेच महान उठाव असे म्हणतात. या आंदोलनाचा मुख्य उद्देश आदिवासींच्या जमिनीवरील पारंपरिक हक्क पुन्हा मिळवणे, जमीनदार आणि सावकारांच्या शोषणाला विरोध करणे आणि ब्रिटिशांची अन्यायकारक सत्ता संपविणे हा होता.

या आंदोलनात हजारो आदिवासी सहभागी झाले. भाले, धनुष्यबाण आणि इतर पारंपरिक शस्त्रांच्या साहाय्याने आदिवासींनी ब्रिटिश सैन्याचा प्रतिकार केला. जानेवारी १९०० मध्ये डोंबारी बुरू येथे ब्रिटिश सैन्याने आदिवासी आंदोलकांवर गोळीबार केला. या संघर्षात अनेक आदिवासी स्त्री-पुरुषांना आपले प्राण गमवावे लागले. मात्र, एवढ्या मोठ्या दडपशाहीनंतरही आदिवासींच्या मनातील स्वातंत्र्याची आणि हक्कांची भावना संपली नाही.

बिरसा मुंडा यांचा शोध घेण्यासाठी ब्रिटिश सरकारने मोठी मोहीम हाती घेतली. अखेर ३ मार्च १९०० रोजी त्यांना चक्रधरपूर परिसरातील जंगलात अटक करण्यात आली. त्यांची रवानगी रांचीच्या कारागृहात करण्यात आली. कारागृहात असतानाच ९ जून १९०० रोजी वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. अधिकृत नोंदीनुसार त्यांचा मृत्यू कॉलरा या आजारामुळे झाला. मात्र, त्यांच्या मृत्यूविषयी विषप्रयोगाचा संशयही काही स्तरांतून व्यक्त केला जातो. त्यांच्या मृत्यूमागील या संशयाला ठोस ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही.

बिरसा मुंडा यांचे आयुष्य अवघे २५ वर्षांचे होते. मात्र, या अल्पायुष्यात त्यांनी आदिवासी समाजाला अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या आंदोलनामुळे ब्रिटिश सरकारला आदिवासींच्या जमीनविषयक प्रश्नांची दखल घ्यावी लागली. पुढे १९०८ मध्ये लागू झालेल्या छोटानागपूर कास्तकारी कायद्याने आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणावर महत्त्वपूर्ण निर्बंध घातले. त्यांच्या संघर्षाचे हे एक महत्त्वाचे फलित मानले जाते. बिरसा मुंडा यांचे योगदान केवळ आदिवासी समाजापुरते मर्यादित नाही, तर ते संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृतीचा सन्मान म्हणून १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड राज्याची स्थापना करण्यात आली. तसेच २०२१ पासून केंद्र सरकारने त्यांची जयंती 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला.आजही देशातील आदिवासी समाज जल, जंगल आणि जमिनीच्या हक्कांसाठी संघर्ष करताना दिसतो. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरते. त्यांनी आदिवासी समाजाला केवळ अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली नाही, तर स्वाभिमानाने जगण्याचा मार्गही दाखविला. आजच्या तरुण पिढीने बिरसा मुंडा यांच्या जीवनातून अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि आपल्या संस्कृतीविषयीचा अभिमान यांची प्रेरणा घ्यायला हवी. त्यांच्या कार्याची माहिती केवळ जयंतीपुरती मर्यादित न ठेवता शालेय अभ्यासक्रमातून आणि विविध माध्यमांतून नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करणारे, ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारे आणि आपल्या अल्पायुष्यात इतिहास घडविणारे महान जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार


दिवस चालले आहेत...

आयुष्याच्या संध्याकाळी, प्रत्येकजण एकांतात असताना, भूतकाळातील आठवणीत रमतो. हे स्मरणरंजन काहींना इतके भावते की, ते त्यामध्येच गुंतून जातात. मात्र वर्तमानकाळ महत्त्वाचा. त्याकडे दुर्लक्ष अयोग्य ठरते. सत्तरीनंतर तब्येत चांगली असणे, हे एक वरदान ठरते. रोजचा दिनक्रम काहीना कंटाळवाणा वाटतो, तर काहींना त्यातच आनंद मिळतो. मी कदाचित त्यापैकी दुसऱ्या गटातील!

प्रत्येक दिवशी सूर्योदयापूर्वी, घरातील अंथरुणातून जागे होताना, उठताना, आयुष्यातील आणखी एक 'नवा दिवस' लाभल्याची सुखद जाणीव होते. पूर्वेकडील खिडकीतून हळूहळू सूर्योदयापूर्वीची स्थिती असल्याने, आकाशातील रंग झाडमाडांच्या पार्श्वभूमीवर बदलताना पाहून आनंद होतो. भल्या पहाटे काही ठराविक प्रौढ, मध्यमवर्गीय फिरायला जातात. दिवसभरात नंतर फारसे चालणारे दिसत नाहीत! काही कचरावेचक स्त्रिया येतात. त्यांच्या पाठीवरचे ओझे जवळजवळ त्यांच्याच उंचीचे असते. सुयोग्य कचरा उचलण्याची त्यांची धडपड जगण्यासाठीच तर असते! आपल्या भोवतालच्या रस्त्यांवर, सुजाण नागरिकांनी, नित्यनेमाने फेकलेला कचरा त्यांना जगवतो. मात्र त्यांच्याकडे सामान्यजन नेहमीच साशंक नजरेने पाहतो. फारच थोडी शाळाकरी मुले, शाळेत चालत जातात. बहुसंख्य मुले सायकलवरून, आईच्या स्कूटरवरून-काही मागे तर काही पुढे बसून जातात. हल्ली शाळकरी मुलेमुली सर्रास स्कूटरवरून जाताना दिसतात. त्यांना, त्यांच्या पालकांना आणि आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांना, अगदी आजूबाजूला राहणाऱ्या पोलिसांनाही दररोज कायदे मोडणाऱ्यांविषयी फारसे काही वाटतच नाही! तरी आपण नेहमी म्हणतो ''कायदा गाढव आहे!''... पण आपण?

सकाळची आन्हिके आटपून वाचन आणि लेखन करण्यासाठी मी अभ्यासिकेत, दिवसातला जास्तीत जास्त वेळ असतो. नंतर सकाळी दहानंतर भंगारवाले हाकारू लागतात. नेहमी येणाऱ्यांचे आवाज आणि चेहरा यांची लगेच ओळखही पटते. ते चालत असले, तरी त्यांच्या समोर चारचाकी ढकलगाडी असते. त्यावर कमीअधिक भंगार असते. एकापाठोपाठ एक याप्रमाणे चार-पाचजण दुपारपर्यंत येऊन जातात. काही परिचित दरवेळी, 'भंगार आहे का?' असे विचारतात. तेव्हा सांगावेसे वाटते ''आता आम्हालाच भंगारात काढायची वेळ झाली आहे...!'' सकाळच्या वेळात घरकाम करणाऱ्या, मध्यम वयाच्या स्त्रिया मोबाईलवर मोठमोठ्याने बोलत जाताना दिसतात. तोच त्यांचा आनंद, विरंगुळा असावा! कधी एकमेकींना भेटल्या तर मालकिणीविषयी कदाचित तक्रारी सांगत असतील. बालवाडीमध्ये शिकणारी छोटी मुले, आईबरोबर जातात. बहुतेक युवामाता, त्यावेळी आपल्या मोबाईलमध्येच दंग असतात. मुलांना शाळेत सोडताना, त्यांना घरी आणताना आईला त्यांच्याशी भरपूर गप्पा मारण्याची संधी असते. पण मोबाईलमुळे ही संधी गमावली जाते. आपल्या आईचा हात धरून, ओढली जाणारी ही मुले फारच केविलवाणी वाटतात. मात्र आपल्या मुलांना सोडायला, अगदी क्वचितच पुरुष पालक जाताना दिसतात. कारण हल्ली सर्वच युवा आणि वयस्कर मातांची जबाबदारी सातत्याने वाढतेच आहे. बिचारे पुरुष तरी काय करणार?

युवा पिढीच्या हातातील मोबाईल, त्यांना इतका रमावतो की समोरून येणाऱ्या माणसांचे, वाहनांचे त्यांना काहीच वाटत नाही. स्कूटरवरून जाताना, येताना मागे बसणाऱ्या व्यक्तीही मोबाईल पाहण्यात दंग असतात. आजूबाजूची घरे, माणसे, झाडे पाहण्यात ते आपला वेळ फुकट घालवत नाहीत. कालव्यवस्थापनाची ही नवी व्यवस्था असावी! स्कूटर किंवा कार, वाहन कोणतेही चालवताना समोरचा रस्ता पाहणे, अन्य वाहनांचा, पादचाऱ्यांचा विचार करणे, हे सर्व करण्याऐवजी त्यांच्या कानाला मोबाईल चिकटलेला असतो. वाटल्यास पादचाऱ्यांनी आपल्या जीवाला जपावे. आता आपले सारेच जीवन राम भरोसे!!



मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

दुपारच्या जेवणापूर्वी, माझी काही ठरलेली घरकामे करण्यात वेळ चांगला जातो. झाडांना पाणी, कपडे वाळत घालणे, गरजेनुसार पाणी भरणे, जेवणापूर्वीची तयारी करणे. त्यावेळीही चिंतन करता येते. विचारचक्र चालू ठेवणे, मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक असतेच. जेवणानंतरची वामकुक्षी हवीच. त्यानंतर पुन्हा वाचन-लेखन असे चक्र संध्याकाळपर्यंत सुरू असते. त्यानंतर बाहेर जाण्याचे, त्यानिमित्ताने भटकण्याचे कामही कधी असते. ते झाल्यावर रात्री टीव्हीवरील कार्यक्रम पाहण्याचेही कर्तव्यकर्म निभवावे लागते. वृत्तपत्रांमध्ये आणि दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवरील कार्यक्रमांत, सातत्याने अधूनमधून दाखविल्या जाणाऱ्या जाहिराती अपरिहार्य असतात. त्यामुळे सुजाण प्रेक्षकांना ब्रेकही घेता येतो. जाहिराती कोणत्या वस्तूंच्या असतात, त्या समाजाला कोणता संदेश देतात. त्यांचा कितपत उपयोग होतो, हा एक वेगळाच विषय आहे. दिवसभराचे वाचन सुरू असतानाच, रोजची काही वृत्तपत्र वाचणे अपरिहार्य असते. त्यामुळे जीवनातील स्थानिक, देशभरातील, जगातील घडामोडी समजतात.. टीकाटिप्पणींसह. अन्य नियतकालिकेही खूप माहितीपूर्ण असतात. तीही सुजाण वाचकाला खुणावत असतात. तर हा असा वाचनानंद, याचे रूपांतर माझ्या छंदात झाले आहे. त्यामुळे लेखनही शक्य होते. दर आठवड्याला प्रकाशित होणाऱ्या लेखाची तयारी करणे, पाठवणे त्यावरील प्रतिक्रिया पाहणे. मग पुढील लेखांची तयारी. यामध्ये दिवस, महिने, वर्षे कशी जातात, समजत नाही आणि जीवन आनंददायी झाले.

दिवस असे होते, दिवस चालले आहेत आणि पुढील दिवस कसे असतील, हे सर्व आपल्या भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांच्याशी निगडित आहे. ज्याचा जसा दृष्टिकोन तसे त्याला जीवन लाभावे म्हणजे आनंद निर्माण होईल. येणाऱ्या भावी जीवनाच्या संध्याकाळची भीती वाटणार नाही आणि म्हणता येईल, 'संध्याछाया रमविती हृदया!'

जीवन आणि मृत्यू या दरम्याने प्रत्येक व्यक्तीला जे आयुष्य लाभले आहे, ते कसे जगायचे हे आपल्या निर्णयांवर अवलंबून असते. प्रत्येक क्षण हा आयुष्याचा एक छोटा अंश असतो. अशा अनेक क्षणांनी मिळून आपले जीवन बनते. गेलेला क्षण कधीही परत येत नाही. आपले आयुष्य दररोज आपण नव्याने जगतो आहे, असे मानल्यास, आपल्या जीवनाकडे अधिक डोळसपणे पाहिल्यास त्याचा निश्चितच योग्य वापर करता येईल. जीवनाच्या विविध टप्प्यांवर आपल्या जबाबदाऱ्या बदलत असतात. जीवनाच्या संध्याकाळी वृद्धापकाळात, अनेकांना मृत्यूची भीती वाटू लागते. परंतु मृत्यू हे वास्तव असून, ते अटळ आहे, याची जाणीव ठेवल्यास जीवनाच्या उरलेल्या क्षणांचा, आपल्या ध्येयप्राप्तीसाठी निश्चितच उपयोग करता येतो. आपण जीवन कशासाठी जगतो, हे महत्त्वाचे आहे. आपल्या जीवनातील अर्थ शोधण्याला फार महत्त्व आहे. सुखदुःख मानवी जीवनात येणारच. मन:स्वास्थ्यासाठी आणि आनंदासाठी आपल्याला काय आवडते, ते समजून त्याप्रमाणे वागल्यास आणि ते साध्य करण्याचा प्रयास केल्यास, निश्चितच आनंदाची प्राप्ती होऊ शकते. निवृत्तीनंतरच्या जीवनात विविध छंद जोपासणे शक्य आहे. वाचन आणि लेखन हा साधा सोपा छंद आहे. विविध पुस्तके वाचून, आपली वाचनाविषयीची आवड ठरते. मग आपले वाचनही बहरते. आपल्याला लेखनाचीही प्रेरणा मिळू शकते.आज विविध समाजमाध्यमे उपलब्ध आहेत. त्यावर आपण व्यक्त होऊ शकतो. यादृष्टीने आपल्या जीवनाकडे पाहिल्यास आणि वेळोवेळी त्याचा आढावा घेतल्यास, आपले आणि इतरांचे जीवन आनंददायी ठरू शकते. निसर्गामध्ये वृक्षांची पाने पानगळीच्या हंगामात खाली पडतात. पानगळीच्या हंगामात विदेशात आणि भारतातही काही प्रदेशांत, या पानांना प्राप्त होणारे विविध रंग पाहण्यासाठी, जगभरातील प्रवासी तेथे गर्दी करतात. काही वर्षांपूर्वी या रंगीबेरंगी पानगळीचे दर्शन नैनितालला झाले होते. नंतर वृक्षांवर नवी पालवी येते. निसर्गाचे हे चक्र सुरूच राहते. मानवी जीवनही असेच आहे. आपल्या जीवनकाळात आपल्याबरोबरच, अवतीभवतीच्या लोकांचे जीवन आनंददायी करण्याचा प्रयास केल्यास, त्यामुळे त्यांनाही आनंद होईल. साने गुरुजींनी यथार्थपणे सांगितले होते,

खरा तो एकची धर्म,
जगाला प्रेम अर्पावे !

भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

प्राणी प्रकाशसंश्लेषण करू शकतात का?

त्या दिवशी सचिन आणि मनिषा 'ज्ञानदीप'मध्ये आले, तेव्हा उत्तराकाकी विज्ञानखेळघरात संगणकावर काही सूक्ष्म जीवांची चित्रं पाहत होत्या.

सचिनने खुर्ची ओढून त्यांच्या शेजारी बसत विचारलं,

''काकी, मागच्या वेळी माझ्या शरीरात क्लोरोप्लास्ट बसवून सूर्यप्रकाशावर जगण्याचा प्रयोग फसला.''

मनिषा म्हणाली, ''आणि तुझा डबाही वाचला नाही!''

''ते जाऊ दे. पण जाता जाता मी एक प्रश्न विचारला होता निसर्गात एखादा प्राणी खरंच प्रकाशसंश्लेषण करतो का?''

''आज त्याच प्रश्नाचा शोध घेऊया,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''पण आधी हे बघा.''

पडद्यावर एक हिरवट एकपेशीय जीव दिसत होता.

''हा युग्लिना!'' मनिषा म्हणाली. ''याच्यात क्लोरोफिल असतं ना?''

''हो. युग्लिनाच्या पेशीत क्लोरोप्लास्ट असतात. प्रकाश मिळाला तर तो प्रकाशसंश्लेषण करून सेंद्रिय पदार्थ तयार करू शकतो.''

''मग मिळालं उत्तर!'' सचिन म्हणाला. ''प्राणी प्रकाशसंश्लेषण करू शकतात.''

''इतक्या लवकर निष्कर्ष काढू नकोस,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''युग्लिना प्राणी नाही. तो एकपेशीय प्रोटिस्ट आहे.''

प्रोटिस्ट म्हणजे काय?'' मनिषाने विचारलं.

''तुम्ही अमीबा आणि पॅरामेशियमची नावं ऐकली आहेत ना? तेही प्रोटिस्ट आहेत. ज्यांच्या पेशींमध्ये केंद्रक असतं, पण जे प्राणी, वनस्पती किंवा बुरशी या गटांत बसत नाहीत, अशा विविध सजीवांना प्रोटिस्ट म्हणतात. त्यांपैकी बहुतेक एकपेशीय असतात,'' उत्तराकाकी म्हणाल्या.



''म्हणजे युग्लिना प्राणीही नाही आणि वनस्पतीही नाही?'' सचिनने विचारलं.

''बरोबर. पण त्याच्यात वनस्पतींसारखी प्रकाशसंश्लेषण करण्याची क्षमता आहे.''

''पण तो वनस्पतीसारखा प्रकाशसंश्लेषण करतो?''

''हो. आणि आणखी गंमत म्हणजे काही युग्लिना प्रकाश नसताना सभोवतालच्या पाण्यात उपलब्ध असलेल्या सेंद्रिय पदार्थांपासून पोषण मिळवू शकतात. म्हणजे परिस्थितीनुसार त्यांची पोषणाची पद्धत बदलू शकते.''

सचिन म्हणाला, ''म्हणजे प्रकाश मिळाला तर सोलर पॉवर; नाही मिळाला तर बाहेरचं अन्न!''

''साधारण तसंच,'' उत्तराकाकी म्हणाल्या.

मनिषाने विचारलं, ''पण आपला प्रश्न प्राण्यांचा आहे. खऱ्या प्राण्यांमध्ये असं काही आहे का?''

''आहे. आता हे बघा.''

विद्यालंकार घारपूरे

उत्तराकाकींनी पडद्यावर एका हिरव्या समुद्री स्लगचं चित्र दाखवलं.

''हा तर पानासारखा दिसतोय!'' सचिन म्हणाला.

''काही समुद्री स्लग शैवाल खातात. पण ते शैवालांमधले सगळे क्लोरोप्लास्ट पचवून टाकत नाहीत. काही क्लोरोप्लास्ट स्वतःच्या शरीरातील पेशींमध्ये टिकवून ठेवतात.''

''आणि ते तिथे प्रकाशसंश्लेषण करतात?'' मनिषाने विचारलं.

''हो. काही काळ ते कार्यक्षम राहून प्रकाशसंश्लेषण करू शकतात. त्यातून तयार होणाऱ्या पदार्थांचा स्लगला फायदा होऊ शकतो.'' सचिन म्हणाला, ''म्हणजे दुसऱ्याच्या घरावरचं सोलर पॅनेल काढून स्वतःच्या घरावर बसवल्यासारखं!''

समाधानकाका म्हणाले, ''ही उपमा मात्र अगदी चपखल आहे.''

''या प्रकाराला म्हणतात,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''म्हणजे चोरून घेणं. पण लक्षात ठेवात्या स्लगने क्लोरोप्लास्ट स्वतः तयार केलेले नसतात. ते त्याला शैवालांकडून मिळालेले असतात.''

''म्हणजे तो प्रकाशसंश्लेषणाचा फायदा घेतो; पण त्याच्याकडे स्वतःची वनस्पतीसारखी प्रकाशसंश्लेषण यंत्रणा नाही,'' मनिषा म्हणाली.

''बरोबर.''

सचिनने विचारलं, ''पण हे समुद्रातलं झालं. जमिनीवर राहणाऱ्या प्राण्यांत असं काही आहे का?'' ''एक फारच रंजक उदाहरण आहे.''

पडद्यावर काळसर शरीरावर पिवळे ठिपके असलेला प्राणी दिसला.

''सरडा!'' सचिन म्हणाला.

''सरडा नाही,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''सॅलॅमॅंडर हा उभयचर प्राणी आहे. आणि आपल्याला विशेष रस आहे तो त्याच्या अंड्यांमध्ये.''

''अंड्यांमध्ये?''

''हो. त्याच्या अंड्यांच्या आत, विकसित होणाऱ्या भ्रूणाभोवतीच्या द्रवात नावाचा हिरवा शैवाल मोठ्या संख्येने आढळतो. त्यात क्लोरोफिल असतं आणि तो प्रकाशसंश्लेषण करतो.''

सचिनने विचारलं, ''म्हणजे शैवाल भ्रूणाच्या बाहेरच राहतो?''

''बहुतेक शैवालपेशी भ्रूणाभोवतीच्या द्रवात असतात. पण गंमत एवढ्यावर थांबत नाही. संशोधकांना काही शैवालपेशी विकसित होणाऱ्या सॅलॅमॅंडरच्या ऊतकांत आणि अगदी काही भ्रूणपेशींच्या आतही आढळल्या आहेत.''

''अरे वा! प्राण्याच्या पेशींच्या आत शैवाल!'' मनिषा म्हणाली.

''आणि या भागीदारीचा दोघांनाही फायदा होतो,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''शैवालाच्या प्रकाशसंश्लेषणातून तयार होणाऱ्या ऑक्सिजनचा भ्रूणाला फायदा होऊ शकतो. संशोधनात शैवालाने प्रकाशसंश्लेषणातून तयार केलेल्या कार्बनयुक्त पदार्थांपैकी काही कार्बन भ्रूणापर्यंत पोहोचत असल्याचाही पुरावा मिळाला आहे. दुसरीकडे भ्रूणाच्या चयापचयातून मिळणारे काही पदार्थ शैवालाला उपयोगी पडतात.''

''म्हणजे दोघांची भागीदारी!'' सचिन म्हणाला.

''हो. पण इथे शब्द जपून वापरायचे,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''सॅलॅमॅंडर स्वतः क्लोरोफिल तयार करत नाही. प्रकाशसंश्लेषण करणारा शैवाल त्याच्याबरोबर राहतो.''

मनिषा काही क्षण विचार करून म्हणाली, ''म्हणजे आपल्या तीन उदाहरणांत तीन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. युग्लिनाकडे स्वतःचे क्लोरोप्लास्ट आहेत. समुद्री स्लग शैवालांचे क्लोरोप्लास्ट स्वतःच्या पेशींमध्ये टिकवून ठेवतो. आणि सॅलॅमॅंडरच्या भ्रूणाबरोबर प्रकाशसंश्लेषण करणारा शैवाल राहतो.''

''शाब्बास!'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''हाच सगळ्यात महत्त्वाचा फरक.''

सचिनने विचारलं, ''मग परीक्षेत 'वनस्पती प्रकाशसंश्लेषण करतात आणि प्राणी करत नाहीत' असं लिहिलं तर ते चुकीचं आहे का?''

''मूलभूत फरक समजावून सांगण्यासाठी ते उपयोगी विधान आहे,'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''बहुतेक प्राण्यांच्या स्वतःच्या पेशींमध्ये वनस्पतींसारखे क्लोरोप्लास्ट नसतात. त्यामुळे ते स्वतःची प्रकाशसंश्लेषण यंत्रणा वापरून अन्न तयार करत नाहीत. पण निसर्गात काही जीवांनी प्रकाशसंश्लेषणाचा फायदा घेण्याचे विलक्षण मार्ग विकसित केले आहेत.'' समाधानकाका म्हणाले, ''पाठ्यपुस्तकात निसर्ग समजावून सांगण्यासाठी कप्पे करावे लागतातवनस्पती इकडे, प्राणी तिकडे.''

''पण निसर्गाला आपल्या कप्प्यांची माहिती नसते!'' मनिषा म्हणाली.

''अगदी!'' उत्तराकाकी म्हणाल्या. ''पाठ्यपुस्तक आपल्याला निसर्गाचा साधा नकाशा देतं. प्रत्यक्ष निसर्ग त्या नकाशापेक्षा अधिक गुंतागुंतीचा आणि अधिक मजेदार असतो.'' सचिन म्हणाला, ''म्हणजे माझ्या शरीरात क्लोरोप्लास्ट बसवण्याची कल्पना अगदीच हवेतली नव्हती!''

मनिषा लगेच म्हणाली,

''हो. पण उद्या शाळेत डबा घेऊन यायला विसरू नकोस!''

'ज्ञानदीप'मध्ये पुन्हा हशा पिकला.

- मोहित उल्वाचा विजयी चौकार
- आशिया चषकावर उमटवली मोहोर

भारताचा पाकिस्तानवर थरारक विजय

| अल अमेरात | वृत्तसंस्था |

१९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेचे विजेतेपद भारताच्या युवा संघाने जिंकले आहे. शेवटच्या चेंडूपर्यंत रोमांचक झालेल्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तावर एक गडी राखून थराराक विजय मिळवला आहे. त्यासोबतच गेल्यावर्षीच्या अंतिम सामन्यात झालेल्या आणि यावर्षीच्या साखळी सामन्यातील पराभवाचीही त्यांनी परतफेड केली. या सामन्यात आर्यवीर सेहवाग आणि लक्ष्य रायचंदानी यांच्या अर्धशतकानंतर मोहित उल्वाने शेवटी स्फोटक खेळ करत भारताला विजयापर्यंत पोहचवले.

१९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेचा अंतिम सामना शनिवारी (दि.१४) भारत विरुद्ध पाकिस्तान संघात खेळवला गेला. या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पाकिस्तानकडून उस्मान खान आणि हयाम खान यांनी चांगली सुरुवात करताना सलामीला ६२ धावांची भागीदारी केली. मात्र, हयाम काव्य पटेलच्या गोलंदाजीवर यष्टीरक्षक अन्वय द्रविडकडे झेल देत २१ धावांवर बाद झाला.त्यानंतर उस्मान खान आणि अब्दुल कादिर या दोघांनी शतकी भागीदारी केली. अखेर त्यांची १३५ धावांची भागीदारी अर्जुन राजपूतने तोडली. यावेळी अब्दुल कादिरला ८० धावांवर माघारी परतावे लागले. त्यानंतरही उस्मानला कर्णधार फरहान युसफने साथ दिली. यादरम्यान, उस्मानने त्याचे शतकही पूर्ण केले आणि तो १०७ धावांवर बाद झाला. त्यानंतर फरहान (६०) आणि अहमद हुसैन (१७) बाद झाले. त्यानंतर पाकिस्तानने झटपट गडी गमावले; मात्र, त्यांनी त्याधीच ३०० धावा पार केल्या होत्या. हमझा झहूरने १० धावा केल्या, तर हुसैन अब्बास दर (२), मोहम्मद सय्यम (७), नकाब शफिक (११) हे स्वस्तात बाद झाले. त्यामुळे पाकिस्तानने ५० षटकात ९ बाद ३३७ धावा केल्या. भारताकडून गोलंदाजी करताना काव्य पटेलने सर्वाधिक ४ बळी घेतले, तर चिगुरुपती वेंकटने ३ बळी आणि अर्जुन राजपूतने १ बळी घेतला..



या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताकडून कर्णधार लक्ष्य रायचंदानी आणि आर्यवीर सेहवाग यांनी डावाची सुरुवात केली. त्यांच्यात ९५ धावांची भागीदारीही झाली. त्यानंतर आर्यवीरने अर्धशतकही केले. मात्र, रायचंदानी आणि आर्यवीर यांची रंगलेली भागीदारी अखेर १८ व्या षटकात तुटली. आर्यवीरने ५८ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतरही लक्ष्यला व्हीके विनीत आणि अर्जुन राजपूत यांनी साथ देण्याचा प्रयत्न केला. परंतु, विनीत २४ धावांवर आणि अर्जुन १६ धावांवर बाद झाला. यशवर्झन चौहानही ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर एका बाजूने लक्ष्य लढत होता. परंतु, तोही ८० धावा करून बाद झाला. लगेचच आर्यन सावसानी (९) आणि काव्य पटेल (०) हे देखील स्वस्तात बाद झाले. त्यानंतर मात्र मनल चौहान आणि मोहिल उल्वा यांनी चांगली लढत देत सामन्यात रोमांच भरला. त्यांनी शेवटी अत्यंत आक्रमक खेळी करत ५७ धावांची भागीदारीही केली. त्यानंतर मनल ४७ धावांवर असताना बाद झाला. मात्र, मोहित उल्वाने भारताच्या आशा कायम ठेवत ६ चेंडूत ८ धावा असे समीकरण तयार करून दिले. त्यानंतर शेवटच्या चेंडूवर ३ धावांची गरज होती. अशावेळी त्याने चौकार ठोकला आणि भारताला विजयापर्यंत पोहचवले. तो ४९ धावांवर नाबाद राहिला. त्याला दुसऱ्या बाजूने चिगुरुपती वेंकटने दमदार साथ देत ११ धावा केल्या.

ज्युनिअर सेहवागची स्फोटक खेळी

या सामन्यान आर्यवीर सेहवागने आपल्या फलंदाजीने लक्ष वेधून घेतले. भारताचा माजी स्फोटक सलामीवीर वीरेंद्र सेहवागचा मुलगा असलेल्या आर्यवीरने ३३८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दमदार सुरुवात केली. कर्णधार लक्ष्य रायचंदानीसोबत त्याने पहिल्या बळीसाठी ९५ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. या भागीदारीमुळे भारताच्या डावाला चांगला पाया मिळाला. या दोघांचा फॉर्म भारताला अंतिम सामन्यापर्यंत घेऊन आला. पाकिस्तानच्या गोलंदाजाने टाकलेला चेंडू आर्यवीरच्या हातावर आदळला, तरीही वेदनेसह तो मैदानावर उभा राहिला. त्याने ५१ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. या स्पर्धेतील ही त्याची चौथी ५०+ धावांची खेळी ठरली. यावेळी आर्यवीरने ६१ चेंडूंत ९ चौकारांसह ५८ धावा केल्या.

निवडक

गुरनूर ब्रार सामन्यातून बाहेर

नवी दिल्ली : न्यूझीलंडविरुद्धच्या चौथ्या एकदिवसीय सामन्यातील लाजीरवाण्या पराभवानंतर भारतीय संघात बदल करण्यात आला; परंतु, हा सर्वांना आश्चर्यचकित करणारा निर्णय ठरला. मालिकेतील ३ सामन्यातं प्रभावी गोलंदाजी करून ९ बळी घेणाऱ्या गुरनूर ब्रार याला पाचव्या एकदिवसीय सामन्यापूर्वी संघातून रिलिज केले गेले. गुरगूनरला १९ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेसाठीच्या संघात बोलावणे आले आहे. त्यामुळे तो पाचव्या एकदिवसीय सामन्यासाठी उपलब्ध नसणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून भारत 'अ' संघाकडून नियमितपणे खेळणाऱ्या २६ वर्षीय खेळाडूला कसोटी संघात प्रथमच निवडले गेले आहे. त्याच्या नावावर २२ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ७१ बळीं आहेत. त्यामुळे पाचव्या एकदिवसीय सामन्यात गुरनूरच्या जागी कोणाला संधी मिळेल याची उत्सुकता आहे. मोहम्मद सिराज, जो चार सामने बाकावर बसून आहे, त्याला पाचव्या एकदिवसीय सामन्यातील प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते. कुलदीप यादवच्या जागी तिलक वर्माला संधी मिळू शकते.



सुर्यकुमार यादवचे वादळी पुनरागमने

मुंबई : सय्यद मुश्ताक अली चषक टी-२० स्पर्धेत मुंबई संघाचे नेतृत्व करताना सुर्यकुमार यादवने पहिल्याच सामन्यात वादळी अर्धशतक झळकावले. त्याने १५ चेंडूंत अर्धशतक झळकावताना चौकार-षटकारांची आतषबाजी केली आणि हैदराबादच्या गोलंदाजांचा त्याने अक्षरशः पालापाचोळा केला. यावेळी हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १७२ धावा केल्या. मुंबईच्या मॅक्सवेल स्वामिनाथनने २३ धावांत ३ बळी घेतले. त्याला शिवम दुबे व साईराज पाटील यांनी प्रत्येकी दोन बळी घेत उत्तम साथ दिली. हैदराबादच्या अभिरथ रेड्डीने सर्वाधिक ३५ धावा केल्या. कोडिमेला हिमतेजा (२५) व चमा मिलिंद (२२) यांनी हातभार लावला. यावेळी लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईला ४१ धावांवर पहिला धक्का बसला. अंगकृश रघुवंशी २७ धावांची खेळी करून बाद झाला. हार्दिक तामोरेनेही २२ धावांची खेळी केली. मुशीर खान व सूर्यकुमार यादव यांनी ६५ धावांची खेळी करताना मुंबईचा विजय पक्का केला. मुशीरने ५१ धावांची वादळी खेळी केली आणि त्यानंतर सूर्यकुमार बरसला. सूर्याने १५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. सहा महिन्यानंतर क्रिकेटच्या मैदानावर परतलेल्या सूर्याने पहिलाच सामना गाजवला. तो ६० धावांवर नाबाद राहिला, तर शिवमने नाबाद १३ धावा करून संघाला १३.१ षटकांत विजय मिळवून दिला. मुंबईने ३ बाद १७४ धावा करून ७ गडी राखून हैदराबादला नमवले.



महाराष्ट्र संघाला पराभवाचा धक्का

नवी दिल्ली : सय्यद मुश्ताक अली टी-२० चषकाला शनिवारी (दि.१४) सुरुवात झाली असून, पहिल्या फेरीत महाराष्ट्राचा सामना पॉंडिचेरीविरुद्ध झाला. या सामन्यात पॉंडिचेरीने तुलनेने बलाढ्य असलेल्या महाराष्ट्र संघाला १५ धावांनी पराभवाचा धक्का दिला. या सामन्यात पॉंडिचेरीने महाराष्ट्रासमोर २०५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. परंतु, या लक्ष्याचा पाठलाग करताना महाराष्ट्राला २० षटकात ५ बाद १८९ धावाच करता आल्या. पॉंडिचेरीकडून गोलंदाज बादल रावतने विजयात मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राकडून कर्णधार पृथ्वी शॉ आणि अर्शिन कुलकर्णी यांनी डावाची सुरुवात केली. अर्शिनने आक्रमक सुरुवात दिली, परंतु तो ३३ धावा करून बाद झाला. त्यानंतर साहिल पारखने अर्धशतक साजरे केले. मात्र, मोक्याच्या क्षणी तोही ५७ धावांवर बाद झाला. त्यानंतर पृथ्वी शॉही ३२ धावांवर बाद झाला. त्यानंतर रामकृष्ण घोष (१) आणि किरण चोरमाळे (११) हे देखील स्वस्तात बाद झाले. त्यानंतर मात्र राहुल त्रिपाठी (३५) आणि सुरज शिंदे (१६) यांना आवश्यक धावगतीनुसार धावा करता आल्या नाहीत, त्यामुळे अखेर महाराष्ट्राला पराभवाचा सामना करावा लागला.

१९ वर्षांखालील मुलांसाठी क्रिकेट स्पर्धा
उत्कृष्ट खेळाडूंना जिल्ह्याच्या संघात संधी

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने जिल्ह्यातील १९ वर्षांखालील मुलांसाठी ४० षटकांच्या एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जिल्ह्यातील विविध मैदानांवर करण्यात आले आहे. खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी या स्पर्धेचे प्रायोजकत्व स्वीकारले आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील एकूण २८ क्रिकेट अकॅडमी व क्लबच्या संघांनी सहभाग नोंदविला आहे. ही स्पर्धा प्रथम साखळी पद्धतीने आणि त्यानंतर बाद फेरीच्या स्वरूपात खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मंगळवारी (दि.१७) पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट मैदानावर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची जिल्ह्याच्या संभाव्य संघासाठी निवड करण्यात येणार आहे. तसेच, टॅलेंट हंटसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून गुणवंत खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना पुढील सराव सामने व प्रशिक्षण शिबिरांमध्ये संधी दिली जाणार आहे. त्यानंतर रायगड जिल्ह्याचा अंतिम संघ निवडण्यात येणार असल्याचे आरडीसीएकडून जाहीर करण्यात आले आहे. खेळाडूंची निवड अनुभवी व तज्ज्ञ निवडकर्त्यांच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने केली जाणार असून, अंतिम संघ निवडीचे अधिकारही त्यांच्याकडेच असणार आहेत. निवड झालेला रायगड जिल्ह्याचा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या इन्व्हिटेशन क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंना रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, कार्याध्यक्ष यशवंत साबळे, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

विराटची नकोशा विक्रमाशी बरोबरी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

विराट कोहलीने आत्तापर्यंत अनेक महत्त्वाचे आणि मोठे विक्रम केले आहेत. त्याने अनेकदा मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकरचे विक्रमही मोडले आहेत. मात्र, एका नकोशा विक्रमाच्या यादीतही शुक्रवारी विराट कोहलीने सचिन तेंडुलकरची बरोबरी केली आहे. शुक्रवारी माऊंट मौंगानुई येथे भारत आणि न्यूझीलंड संघात चौथा एकदिवसीय सामना पार पडला. या सामन्यात भारताचा निराशाजनक पराभव झाला. या सामन्यात ५ व्या चेंडूवर विराट कोहली ४ चेंडूत शून्यावर बाद झाला. त्यामुळे आता तो एकदिवसीय मालिकेत सर्वाधिकवेळा शून्यावर बाद होणारा भारतीय फलंदाज ठरला आहे. याबाबतीत त्याने सचिन तेंडुलकरची बरोबरी केली आहे. सचिन देखील एकदिवसीय समान्यात २० वेळा शून्यावर बाद झाला आहे. या यादीत रोहित शर्माही शुक्रवारी तिसऱ्या क्रमांकावर आला. तो १८ वेळा शुन्यावर बाद झाला आहे.





पिस्तुल स्पर्धेतील चुरस सुरू

| मांद्रे | प्रतिनिधी |

महाराष्ट्रातील नेमबाजांचा जोरदार प्रतिसाद लाभलेली ४१वी राज्य नेमबाजी स्पर्धा पिस्तुल प्रकारातील स्पर्धेने शुक्रवारी (दि.१३) सुरू झाली. जवळपास साडेआठशे प्रवेशिका असलेल्या दहा मीटर एअर पिस्तुलच्या प्राथमिक फेरीला शनिवारी (दि.१४) सुरुवात झाली. त्याचवेळी अन्य रेंजवर स्पर्धकांचा सराव सुरू होता.

प्रथमच महाराष्ट्राबाहेर होत असलेल्या या स्पर्धेच्या निमित्ताने शूटिंग रेंज नेमबाजांच्या उपस्थितीने फुलून गेली होती. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी दहा मीटरच्या रेंजवर एअर पिस्तुल प्रकारातील स्पर्धक लक्ष्यवेध साधत होते. त्याचवेळी २५ मीटर आणि ५० मीटरच्या रेंजवर स्पर्धकांचा सराव सुरू होता. या सरावाच्या वेळी प्रामुख्याने रेंजचा अभ्यास करून लक्ष्यवेध साधण्यावर त्यांचा भर होता. या स्पर्धेसाठी राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील नेमबाज सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत सर्वाधिक प्रतिसाद अर्थातच दहा मीटर एअर पिस्तुल तसेच दहा मीटर एअर रायफल प्रकारांना आहे. त्यापैकी दहा मीटर एअर पिस्तुलची स्पर्धा सुरू झाली. दिवसभर स्पर्धक लागोपाठ लक्ष्यवेध साधत होते.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारपासून २५ मीटर रेंजवरील स्पर्धा सुरू होतील. रॅपिड फायर पिस्तुल प्रकारातील स्पर्धा सर्वप्रथम होणार आहे. त्याचवेळी ५० मीटरच्या रेंजवर फ्री पिस्तुल आणि त्यानंतर रायफल प्रोन प्रकारात चुरस अनुभवता येईल. सुमारे आठ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेची १९ नोव्हेंबरला सांगता होईल. या स्पर्धेत राज्यातील अनेक नवोदित नेमबाज आपला ठसा उमटवण्याची दाट शक्यता आहे. त्याचबरोबर अंतिम फेरीतील कडव्या स्पर्धेला सामोरे जाण्याचा अनुभवही त्यांना मिळणार आहे.

वैभव सूर्यवंशीचा जागतिक विक्रम

सौराष्ट्राने केला बिहारचा कार्यक्रम

| नवी दिल्ली | वृत्तसंथा |

सय्यद मुश्ताक अली टी-२० चषक स्पर्धेत १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी बिहार संघाचे नेतृत्व करत आहे. बिहारचा पहिला सामना जयदेव उनाडकट कर्णधार असलेल्या सौराष्टविरुद्ध झाला. या सामन्याच्या नाणेफेकीसाठी वैभवमैदानातउतरताच इतिहासही घडला. दरम्यान, कर्णधार म्हणून इतिहास घडवला असला, तरी कर्णधार म्हणून त्याच्यासाठी सुरुवात निराशाजनक ठरली. सौराष्ट्रने बिहारला २१ चेंडू आणि ५ गडी राखून पराभूत केले.

सौराष्ट्राला विश्वराजसिंह जडेजा आणि हर्विक देसाई यांनी चांगली सुरुवात करून दिली होती. परंतु, जडेजा १८ धावा करून, तर हार्विक देसाई २१ धावा करून बाद झाला. मात्र, हरवंश सिंहने ३३ धावा केल्या. त्यामुळे विजय सौराष्ट्रासाठी सोपा झाला. लगेचच प्रेरक मंडक १६ धावांवर आणि समर गज्जर ४ धावांवर बाद झाले. त्यानंतर रुचित अहीर आणि सिद्धांत राणा यांनी सौराष्ट्राला विजयापर्यंत पोहचवले. यावेळी रुचित २१ धावांवर, तर सिद्धांत १८ धावांवर नाबाद राहिला. तत्पूर्वी, या सामन्यात वैभवने नाणेफेक जिंकतथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीवीर अलोक कुमार ४ धावांवरच बाद झाला. त्यानंतर वैभव सूर्यवंशी आक्रमक खेळण्याचा प्रयत्न करत होता; परंतु, १८ धावांवर सरळ शॉट मारला आणि झेल बाद झाला. त्याच्यापाठोपाठ आयुषही ९ धावांवर बाद झाला, त्यानंतर अल्तमिशला २४ आणि राघवेंद्र प्रतापला १४ धावाच करता आल्या. पृथ्वी राजने ३८ धावा केल्या. परंतु, सुरज कश्यप (८), मयंक कुमार (६), प्रशांत सिंग (२) हे देखील स्वस्तात बाद झाले. चेतन साकारिया आणि प्रेरक मांकड यांनी बिहारच्या फलंदाजांना फारसं वरचढ होण्याची संधीच दिली नाही. त्यामुळे बिहारला २० षटकात ९ बाद १३७ धावाच करता आल्या.



ख्वाजाच्या पुस्तकाने ऑस्ट्रेलियात युद्ध

सिडनी : उस्मान ख्वाजाच्या पुस्तकाने ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये एक युद्ध सुरू केले आहे. २०१८च्या दक्षिण आफ्रिकाविरुद्धच्या सँडपेपर प्रकरणावरून ख्वाजाने पुस्तकात केलेला खुलास्याने कसोटी संघाचा कर्णधार पॅट कमिन्सला पत्रकार परिषद घ्यावी लागली. चेंडूसोबत छेडछाड करण्यासाठी सँडपेपर वापरण्याची कल्पना संपूर्ण संघाला माहित असल्याचा दावा ख्वाजाने त्याच्या पुस्तकातून केला आणि त्यावरून आता वाद सुरू झाला आहे. त्यात डेव्हिड वॉर्नरही आता कर्णधार कमिन्सच्या विरोधात उभा राहिला आहे.

विवेक यादवची गोलंदाजी निर्णायक

| मुंबई | प्रतिनिधी |

विवेक यादवच्या अचूक वेगवान गोलंदाजीमुळे दादर पारसी झोरास्ट्रियन क्रिकेट क्लबने अजित नाईक स्मृती १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेतील सोव्हेनियरविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात शुक्रवारी पहिल्या डावात निर्णायक आघाडी घेतली. वरळी स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या या स्पर्धेत दादर पारसी झोरास्ट्रियनची अंतिम फेरीत लढत एम. व्ही. स्पोर्ट्स क्लबविरुद्ध होईल.

मुंबई क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने होत असलेल्या या स्पर्धेत दादर पारसी झोरास्ट्रियनच्या मैदानावर सोव्हेनियरसमोर पहिल्या डावातील आघाडीसाठी २३० धावांचे लक्ष्य होते. वीरेन अटोले आणि स्वराज मोरेने चौथ्या बळीसाठी ८३ धावा जोडत सोव्हेनियरचा प्रतिकार सुरू केला. वीरेन आणि राजवीर काशीदने संघाला ५ बाद १९८ या सुस्थितीत नेले होते. याच धावसंख्येवर वीरेन बाद झाला, तर त्यानंतर नऊ धावांनी राजवीर बाद झाला. विवेक यादवने अखेरच्या दोन बळी घेत संघाला निर्णायक आघाडी मिळवून दिली. वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर दुसऱ्या दिवशी आरव दीक्षित आणि अनुज चौधरी यांनी दुसऱ्या बळीसाठी १५० धावांची भागीदारी केली. या भागीदारीमुळे एम.व्ही. स्पोर्ट्स क्लबने शिवाजी पार्क जिमखान्याची १४३ धावसंख्या मागे टाकली. त्यानंतर आरव यादवने दमदार शतकी खेळी करीत शिवाजी पार्क जिमखान्याच्या प्रतिकाराच्या आशा संपवल्या. त्याने पाचव्या गडीसाठी लॅविश सिंगसह ९२ आणि आठव्या गडीसाठी अतुल चौधरीसह ५२ धावांची भागीदारी केली.



वैदवीचे क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय यश **मुंबईच्या यु-१५ टॅलेंट हंट संघात निवड**

पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्याजोरावरधानसरगावातील वैदवी वावेकर हिने क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या १५ वर्षांखाली टॅलेंट हंट संघात तिची निवड झाली आहे. ग्रामीण भागातून क्रिकेटचे धडे गिरवत मुंबईच्या संघात स्थान मिळवणाऱ्या वैदवीने पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १० मध्ये येणाऱ्या धानसर गावातील वैदवीने क्रिकेटमधील आपली गुणवत्ता आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. क्रिकेटची आवड जोपासताना तिने नियमित सराव, शिस्त आणि जिद्द यांना प्राधान्य दिले.सुरवातीला रोडपाली येथील ए.जे. क्रिकेट अकॅडमीत प्रशिक्षण घेतल्यानंतर सध्या ती टेंभोडे येथील एफ.एस.सी.सी. या खासगी क्रिकेट अकादमीत प्रशिक्षण घेत आहे. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर तिने मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या १५ वर्षांखालील टॅलेंट हंट संघात स्थान मिळवले आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या टॅलेंट हंट संघात निवड होणे ही वैदवीच्या क्रिकेट कारकिर्दीतील महत्त्वाची कामगिरी मानली जात आहे. तिच्या या यशामुळे धानसर गावासह पनवेल परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मुलींनीही क्रिकेटसारख्या खेळात मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्यावी, याचे वैदवीने उदाहरण घालून दिले आहे.

वैदवीच्या या यशाची दखल पनवेल महानगरपालिकेचे महापौर घेणार असून, तिची भेट घेऊन तिचे विशेष कौतुक करणार आहेत. ग्रामीण भागातील खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या जोरावर मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या टॅलेंट हंट संघात स्थान मिळवणे ही पनवेलसाठी अभिमानाची बाब आहे. वैदवीच्या या यशामुळे परिसरातील अन्य होतकरू खेळाडूंनाही प्रेरणा मिळणार आहे. तिच्या पुढील क्रिकेट प्रवासासाठी धानसर ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी आणि पनवेलकरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



महापौर करणार विशेष कौतुक

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अंडर-१५ टॅलेंट हंट संघात निवड झालेल्या धानसरच्या वैदवी वावेकर हिच्या यशाची पनवेल महानगरपालिकेचे महापौर दखल घेणार आहेत. महापौर वैदवीची भेट घेऊन तिचे अभिनंदन आणि विशेष कौतुक करणार आहेत. ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंच्या यशाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महापौरांकडून होणारा हा गौरव महत्त्वाचा ठरणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)